# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार १९ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







## शिंदेंना संपवण्याची सुपारी



**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि सरकारच्या शिष्टमंडळामध्ये झालेल्या चर्चेनंतर जरांगे यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे. या पार्श्वभूमीवर मराठा समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखे पाटील यांनी पत्रकार परिषद घेउन गंभीर आरोप केले आहेत. हे आंदोलन मराठा समाजासाठी आहे की राजकीय अजेंडा? विखे पाटील यांना समजून आणि सांभाळून घ्या असे जरांगे म्हणाले, त्यामुळे जरांगेचे आंदोलन मराठा समाजाच्या आरक्षणासाठी नाही तर राजकीय सुपारी घेउन विखे पाटील यांना प्रमुख आणि प्रोजेक्ट करणे हेच आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले की, एकनाथ शिंदे यांचे चारित्र्यहनन करण्यासाठी जरांगे यांचे हे आंदोलन आहे. एकनाथ शिंदे यांनी न्यायमूर्ती शिंदे समिती नेमून दस्तावेज शोधण्याचे काम केले असून राज्यातील ५८ लाख नोंदी ह्या १९६७ पासूनच्या नोंदी आहेत. या आंदोलनातून घटनाबा मागण्या केल्या जात आहेत. हैदराबाद गॅझेटमध्ये कुणबी आणि मराठा असा वेगळा उल्लेख आहे, त्यामुळे पाटोद्यात वैधानिक मूर्खपणा करण्यात आला. हैदराबाद संस्थानात पंजाबराव देशमुख यांनी चालवलेली चळवळ मराठ्यांना मान्य नव्हती. बेकायदेशीररीत्या जमाव जमवून टोळ्या निर्माण करून बेकायदेशीर आंदोलने केली जात आहेत आणि त्यात विखे पाटील सुद्धा सहभागी आहेत. एक वर्ष २० दिवस झाले तरी हैदराबाद गॅझेटप्रमाणे एकही प्रमाणपत्र मिळाले नाही आणि मिळू शकत नाही, त्यामुळे हैदराबाद गॅझेटियरप्रमाणे मिळालेले सर्टिफिकेट मराठ्यांनी स्वीकारू नये, असे त्यांनी म्हटले. (पान २ वर)

## शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी डॉ. अंजली साळवेंची निवड निश्चित!

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीमध्ये (महिला विंग) लवकरच संघटनात्मक फेरबदल होणार असून पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाची धुरा आता विदर्भाकडे सोपवली जाण्याची शक्यता आहे. गेल्या ३ वर्षांपासून या पदावर रोहिणी खडसे अत्यंत प्रभावीपणे कार्य करीत आहेत.पक्षातील फुटीनंतर आणि राजकीय स्थित्यंतरांच्या अत्यंत कठीण काळात रोहिणी खडसे यांनी राज्यभरात दौरे करून महिला आघाडीचे संघटन मजबूत केले. खान्देशातून संपूर्ण महाराष्ट्रात पक्षाची पाळेमुळे घट्ट करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. रोहिणी खडसे यांनी महिला प्रदेशाध्यक्षपदाचा ३ वर्षांचा कार्यकाळ यशस्वीरीत्या पूर्ण केल्यामुळे पक्षांतर्गत नियमांनुसार आता नवीन नेतृत्वाला संधी दिली जात आहे. या बदलामुळे आता पक्षाकडून रोहिणी खडसे यांच्यावर कोणती नवी मोठी राजकीय जबाबदारी सोपवली जाते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. आगामी स्थानिक आणि राज्यस्तरीय राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर विदर्भातील महिला संघटन अधिक बळकट करण्यासाठी शरद पवारांनी नागपूर विभागाला हे सर्वोच्च पद देण्याचा निर्णय घेतला आहे.




## निठारीचा आरोपी सुरेंद्र कोलीची आत्महत्या

**हरिद्वार :** निठारी हत्याकांडातील आरोपी सुरेंद्र कोलीने शुक्रवारी हरिद्वारमध्ये फाशी घेउन आत्महत्या केली. ही घटना उत्तर हरिद्वारमधील भूपतवाला येथे घडल्याचे सांगितले जात आहे. तब्बल १९ वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या प्रकरणातही त्याची निर्दोष सुटका केली होती. त्यानंतर तो तुरुंगाबाहेर आला होता. नोएडातील निठारी येथे २००५-०६ मध्ये मुले आणि महिला बेपत्ता झाल्यानंतर कोलीचे नाव समोर आले होते. २९ डिसेंबर २००६ रोजी त्याच्या कोठीमागील नाल्यात मानवी अवशेष सापडल्यानंतर देशभरात खळबळ उडाली होती. त्यानंतर सीबीआयने तपास केला आणि कोलीवर अनेक प्रकरणांमध्ये खटले चालवण्यात आले. एकेकाळी त्याला १३ प्रकरणांमध्ये मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, २०२३ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने १२ प्रकरणांत त्याची निर्दोष मुक्तता केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या प्रकरणातही त्याला दोषमुक्त केले होते.



# रिलिजन म्हणजे धर्म नाही

**अवंतिका /म.प्र./वृत्तसंस्था :** तुम्ही विश्वास ठेवा किंवा ठेवू नका, सर्व काही धर्माच्या नियमांनुसार चालते. धर्म समजून घेण्यासाठी तुम्ही प्रथम तुमच्या मनात रेंगाळणा-या विचारांपासून स्वतःला मुक्त केले पाहिजे. विश्वाच्या निर्मितीपासून धर्म अस्तित्वात आहे आणि विश्वाच्या विनाशापर्यंत धर्म अस्तित्वात राहील. सर्व काही त्याच्यामुळेच टिकून आहे. माझ्यासाठी, माझा धर्म माझ्या जन्मापासून स्थापित आहे आणि माझ्या मृत्यूपर्यंत तसाच राहील. धर्म हे सर्व सुखाचे उगमस्थान आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले.



सरसंघचालक मोहन भागवत

मध्य प्रदेश येथील अवंतिका परिसरात तीन दिवसीय युवा धर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, याचे उद्घाटन सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. या भाषणात मोहन भागवत यांनी धर्माशी निगडीत अनेक मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका मांडली. हा कार्यक्रम गीता भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या युवा धर्म संसदेत देशभरातील २४ हून अधिक राज्यांमधून सुमारे १,६०० ते १,७०० युवक, विद्यार्थी, शिक्षक आणि धार्मिक नेते सहभागी होत आहेत.

**धर्म आणि रिलिजन यात अनेकदा गल्लत-** मोहन भागवत म्हणाले की, धर्म आणि रिलिजन यात अनेकदा गल्लत केली जाते. परंतु, या दोन्हींमध्ये फरक आहे. धर्म हा एखाद्या विशिष्ट श्रद्धेशी, पंथाशी किंवा धार्मिक परंपरेशी जोडला जाउ शकतो, परंतु धर्माची व्याप्ती त्यापेक्षा अधिक व्यापक आहे. जर आपण धर्माबद्दल बोललो, तर असे म्हटले जाते की, ती एक जुनी गोष्ट आहे. पण धर्म तो आहे, जो अस्तित्वाच्या सुरु वातीपासून ते अंतापर्यंत अस्तित्वात आहे. सध्या ज्या गोष्टींना धर्म (पान २ वर)

## 5 ऑक्टोबरनंतर दुष्काळी परिस्थितीवर निर्णय घेऊ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीले अपु-या पावसामुळे जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शेतक-यांच्या विविध प्रश्नांकडे शरद पवारांनी या पत्रातून लक्ष वेधले असून मुख्यमंत्र्यांकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. शरदद पवारांच्या या पत्राची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असतानाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच निर्णय घेतले असून मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळी परिस्थिती आणि शेतक-यांना मदत करण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे फडणवीस यांनी सांगितले. शेतक-यांसाठी कर्जमाफीची योजना आधीपासूनच सुरू असून दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही राज्य सरकारकडून करण्यात येणार आहेत. ५ ऑक्टोबरनंतर (पान २ वर)



# निवडणूक आयोग सत्ताधा-यांचा गुलाम-वडेट्टीवार

**मुंबई/नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील आगामी निवडणुकांच्या तोंडावर मतदार याद्यांमधील संभाव्य घोळावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. राज्यातील तब्बल २ कोटी ६६ लाख मतदारांच्या नोंदींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, राज्यातील निवडणूक आयोग सत्ताधा-यांचा गुलाम बनल्याचा वडेट्टीवार यांनी आरोप केला आहे.मतदारांबाबत निवडणूक आयोगाने पारदर्शक आणि सविस्तर माहिती जाहीर करावी, अशी मागणी विरोधी पक्षाकडून करण्यात आली आहे. यासंदर्भात बोलताना वडेट्टीवार म्हणाले की महाराष्ट्रातील विशेष सखोल पुनर्निरीक्षणनुसार स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंदी असलेले मिळून जवळपास २ कोटी ६६ लाख ८८ हजार ४७८ मतदारांवर प्रश्न निर्माण झाला आहे. याचाच अर्थ राज्यातील तब्बल २१.४१ टक्के मतदार अंतिम यादीतून वगळले जाण्याची दाट शक्यता आहे.या आकडेवारीचे सविस्तर विश्लेषण करताना त्यांनी सांगितले की यापैकी ७६ लाख ७६ हजार १३५ मतदार स्थलांतरित आणि ७५ लाख ४१ हजार ५२० मतदार गैरहजर म्हणून दाखवण्यात आले आहेत. विसंगतीच्या नावाखाली ६२ लाख ४८ हजार २८१ मतदार दाखवले आहेत. हा सगळा एकत्रित आकडा दोन कोटींच्या पुढे जातो, जो अत्यंत संशयास्पद आहे.अरे लाज तरी ठेवा, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक पदावर बसून तुम्ही सत्ताधा-यांचे गुलाम झाल्यासारखे वागताय. अशा प्रकारची भाषा वापरणे आयोगाला शोभते का?, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. काही विशिष्ट मतदारसंघांत २१ टक्के आणि मुस्लिम बहुल क्षेत्रात २९ टक्के मतदान कमी झाल्याचे दाखवून आयोग कोणाच्या इशा-यावर काम करत आहे, असा सवालही त्यांनी विचारला. या नव्या आकडेवारी आणि आरोपांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.





**अल्पसंख्याक, एससी-एसटींना केले लक्ष्य-** वडेट्टीवार यांनी निवडणूक आयोगाच्या हेतूवरच शंका उपस्थित केली. ते म्हणाले राज्यातील ३८ अल्पसंख्याक किंवा मुस्लिम बहुल मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदार वगळले गेले आहेत. हा आकडा (पान २ वर)

## ममता बॅनर्जींनी पाठिंबा दिला अन् तासाभरात काँग्रेसच्या उमेदवाराला अटक

### विधानसभा पोटनिवडणुकीत मोठा 'खेला'

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमध्ये होत असलेली विधानसभा पोटनिवडणूक खूपच वादळी ठरू लागली आहे. पोटनिवडणुकीत उतरलेल्या ममता बॅनर्जी यांना दोन झटके बसले. उमेदवारानेच माघार घेतल्यामुळे ममतांचा पक्ष निवडणुकीतून आपोआप बाहेर गेला. त्यानंतर ममतांनी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर काही वेळातच काँग्रेसच्या उमेदवाराला अटक झाली.



बंगालमधील नंदीग्राम विधानसभा मतदारसंघात होत असलेली निवडणूक प्रचंड उलथापालथीची होताना दिसत आहे. ६ ऑक्टोबरला निवडणूक होत असून, त्यापूर्वीच मोठे राजकीय हादरे बसू लागले आहेत. ममतांपाठोपाठ काँग्रेसलाही एक झटका बसला आहे.

**उमेदवार मिलन प्रधान यांना अटक** -नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवत असलेले काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना अटक करण्यात आली आहे. मिलन प्रधान यांना (पान २ वर)

## राज्यातून उद्योग फरार!-आ.दानवे

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणा-या छत्रपती संभाजीनगर येथील बिडकीन डीएमआयसीला एक मोठा धक्का बसला असून अमेरिकन लुब्रिझोल या बहुराष्ट्रीय कंपनीने आपली तब्बल १,९१४ कोटी रु पयांची गुंतवणूक मागे घेतली आहे. या मोठ्या औद्योगिक नुकसानीवरून विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी शिंदे-फडणवीस-पवार सरकारवर ताशेरे ओढले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत परदेशात आहेत आणि इकडे राज्यातून उद्योग फरार होत आहेत असा सणसणीत टोला दानवे यांनी लगावला आहे.

अंबादास दानवे यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्मवर एक पोस्ट करत सत्ताधा-यांच्या कार्यपद्धतीचे वाभाडे काढले आहेत. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये ध्वजारोहण करून भाषण केले होते. याचाच संदर्भ देत दानवे म्हणाले की १७ सप्टेंबरच्या मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी मुख्यमंत्री भाषण करत असताना मराठवाड्याला हेच रिटर्न गिफ्ट मिळाले का? एका बाजूला विकासाच्या बाता मारायच्या आणि दुसरीकडे हातात आलेले मोठे उद्योग राज्याबाहेर घालवायचे, असा थेट आरोप त्यांनी यातून केला आहे.



**१,९१४ कोटींचा फटका, रोजगार बुडाला**

बिडकीन येथील ऑरिक सिटीमध्ये लुब्रिझोल कंपनीचा मोठा प्रकल्प उभा राहणार होता. यातून तब्बल १,९१४ कोटी रु पयांची थेट परकीय गुंतवणूक मराठवाड्यात येणार होती, ज्यामुळे हजारो तरुणांना रोजगाराच्या (पान २ वर)

## तुरुंगात मी प्रचंड डिप्रेशनमध्ये गेलो होतो

### जामीन मिळाल्यानंतर संतोष पंडित यांची पहिली व्हिडीओ पोस्ट

### ■ हात जोडून मागितली माफी ■

**पुणे/प्रतिनिधी :** समाजमाध्यमात उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, नगरसेविकेविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले समाजमाध्यम प्रभावक संतोष गजानन पंडित यांना न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्यांनी येरवडा कारागृहातून सुटका करण्यात आली. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर पंडित यांनी पहिली व्हिडीओ पोस्ट केली आहे. सगळ्या परिस्थितीत मी प्रचंड डिप्रेशनमध्ये गेलो होतो, असा खुलासा पंडित यांनी केला आहे. तसेच, कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी मनापासून माफी मागतो, असा पुरुच्चार त्यांनी केला. गेल्या १०-१५ दिवसांत माझ्याबरोबर जो प्रसंग घडला, मी १०-१५ दिवस लाकअपमध्ये होतो. या सगळ्या परिस्थितीत मी प्रचंड डिप्रेशनमध्ये गेलो होतो. तुरुंगात बाहेरची माहिती मिळत नव्हती त्यामुळे सगळं काम थांबवावे लागतंय की काय? या चिंतेत मी होतो. पण, बाहेर आल्यानंतर सोशल मीडियाची मला साथ मिळाली आणि माध्यमांनी देखील सहकार्य केले, असे संतोष पंडित म्हणाले.



**हात जोडून मागितली माफी-**मी जनसामान्यांच्या भल्यासाठी काम करत असतो. यात जनसामान्यांच्या भावना दुखाव्यात असा माझा कोणताही उद्देश नसतो पण, जनसामान्यांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी मनापासून, हात जोडून माफी मागतो. माझ्या तुमच्या भावना दुखावण्याची इच्छा नाही, अशा शब्दात संतोष पंडित यांनी भूमिका मांडली.

**संवैधानिक अधिकार बजावत राहणार- पंडित**

दरम्यान, यापूर्वी त्यांनी तुरुंगातून सुटका झाल्यानंतर, माझा उद्देश कोणाच्या भावना दुखावण्याचा नव्हता, पण कोणाला चुकीचे (पान २ वर)

### कंटेनरची दुचाकीला जोरदार धडक

## भीषण अपघातात माय लेक ठार

**बुलढाणा :** ज्येष्ठा गौरीचे आगमन झाले असून आज घरोघरी पूजन व महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले. यापूर्वी गणरायाचे आगमन झाले असल्याने सर्वत्र पवित्र वातावरण निर्माण झाले आहे. या धामधूमीत बुलढाणा शहरानजीक झालेल्या दुर्दैवी अपघातात माय लेकराचा मृत्यू ओढावला.

**दुचाकीला कंटेनरची धडक-** आज शुक्रवारी ज्येष्ठा गौरीपूजनाच्या दिवशी बुलढाणा ते धाड मार्गावरील शिवसाई नगर नजिक ही दुर्घटना घडली. जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा नजीकच्या कोलापूर येथील युवक आपल्या आईला घेउन मोटार सायकल( एम एच २१ बी बी २८४२) ने बुलढाणा शहराकडे येत होता. कंटेनर चालक बुलढाणा येथून धाड (तालुका बुलढाणा) कडे जात होता. भरधाव कंटेनरने शिवसाई नगर समोर दुचाकीला जोरदार धडक दिली.

**महिला जागीच ठार-** यामुळे झालेल्या भीषण अपघातात महिला जागीच ठार झाली तर तिच्या मुलगा गंभीररित्या जखमी झाला. त्याला नजीकच्या रुग्णालयात भरती करण्यात आले. मात्र तिथे मृत्यूशी झुंज देताना तो दगावला. आनंदाबाई रामदास जाधव (वय ६५ रा. कोलापूर, जिल्हा जालना) आणि अंकुश रामदास जाधव ( वय २७, राहणार कोलापूर ) अशी मृत मायलेकाची नावे आहे.

**चालकाला ग्रामस्थांनी पकडले-** भीषण अपघातानंतर आरोपी कंटेनर चालकाने पळ काढला होता. मात्र संतप्त नागरिकांनी त्याला पकडले आणि बुलढाणा शहर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

## सोयाबीन पिकाची अंत्ययात्रा! शेतक-याने तब्बल आठ एकर क्षेत्रावर फिरवला नांगर, पावसाच्या खंडामुळे पीक उद्ध्वस्त

**अकोला /प्रतिनिधी :** पश्चिम विदर्भात पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. वाशीम जिल्ह्यात ४५ ते ५० दिवसांपासून पावसाने दडी मारली. त्यामुळे सोयाबीन पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. निराश होउन शेतक-याने आठ एकर क्षेत्रावर नांगर फिरवला. स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतक-यांनी उद्ध्वस्त सोयाबीनची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढत स्मशानभूमीत अंत्यविधी केला. यावेळी शेतक-यांनी तीव्र रोष व्यक्त केला.



**पाउस नसल्याने पिकांनी माना टाकल्या**

पश्चिम विदर्भाला एल-निनोचा मोठा फटका बसला आहे. गेल्या सुमारे दीड महिन्यापासून पावसाने दडी मारली. त्यामुळे सिंचन प्रकल्पातील पाणी साठ्यामध्ये घट होत आहे. पाउसच नसल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था दयनीय झाली. पावसाअभावी सोयाबीनची पिके वाळून गेली आहेत. शेंगा भरण्याच्या निर्णायक टप्प्यातच पिकांनी माना टाकल्याचे चित्र आहे. डोळ्यांसमोर उभे पीक करपताना पाहून शेतक-यांच्या डोळ्यात अश्रू अन् संताप दिसून येतो. दरम्यान, सोयाबीन पिक करपल्यामुळे वाशीम जिल्ह्यात शेतक-याने आठ एकर क्षेत्रावर ट्रॅक्टर फिरवला.

**उद्ध्वस्त सोयाबीनचा प्रतीकात्मक अंत्यविधी-**वाशीम जिल्ह्यातील राजुरा येथील नुकसानग्रस्त शेतक-यांनी उद्ध्वस्त सोयाबीनची प्रतीकात्मक अंत्यविधी करून लक्ष वेधले. हेक्टरी एक लाख रुपये मदत, पीक विम्याचा लाभ, कृषी पंपांचे वीज बिल माफ करावे आणि कर्जमाफी करावी, अशा मागण्या यावेळी शेतक-यांनी केल्या. सोयाबीनसोबतच तूर, कापूस, उडीद आणि हळद पिकांवरही दुष्काळाचे गंभीर सावट आहे. त्यामुळे तातडीने पंचनामे करून वाशीम जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतक-यांनी लावून धरली.

**खरीपाचे पीक हातचे गेले**

अनियमित व पावसाचा प्रदीर्घ खंडामुळे खरीप हंगामातील हातचे पीक गेले. त्यामुळे शेतक-यांपुढे नवे संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी आता रब्बीचे सुद्धा पीक येणार नाही. त्यामुळे वर्षभर संसाराचा गाढा कसा ओढायचा? या आर्थिक विवंचेत बळीराजा सापडला आहे. सरकारने येत्या काळात शेतक-यांकडे गांभीर्याने लक्ष देउन भरीव मदत करण्याच्या मागणीने जोर धरला आहे.

**कृषीमंत्री आज बांधावर, शेतक-यांशी साधणार संवाद-**पावसाच्या खंडामुळे शेतीपिकांवर निर्माण झालेल्या परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे दोन दिवसांच्या दौ-यावर येणार आहेत. वाशीम जिल्ह्यात शेतक-यांच्या बांधावर जाउन पिकांची ते पाहणी करणार आहेत. शेतक-यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतील. या दौ-यादरम्यान विभागांतील पिकांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी बैठक घेतली जाणार आहे.




# बाजारपेठेतील वाहतूक कोंडीला आळा घाला; नियोजित पार्किंगची व्यापाऱ्यांची मागणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर पोलीस स्टेशन ते हिरापुरा गेट तसेच देवळी पोलीस चौकी ते सराफा लाईन या शहरातील प्रमुख व्यापारी मार्गांवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, या मार्गांचे नियोजनबद्ध रुंदीकरण आणि शिस्तबद्ध पार्किंग व्यवस्था तातडीने करण्याची मागणी व्यापारी व नागरिकांनी अचलपूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा थेट परिणाम व्यापारावर होत असल्याने हा प्रश्न केवळ वाहतुकीपुरता मर्यादित न ठेवता शहराच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने सोडविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

अचलपूर शहरातील अचलपूर पोलीस स्टेशन ते हिरापुरा गेट तसेच देवळी पोलीस चौकी ते सराफा लाईन हा परिसर शहराच्या प्रमुख व्यापारी केंद्रांपैकी एक आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर व्यापारी प्रतिष्ठाने, सराफा दुकाने, विविध व्यवसायांची केंद्रे तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंची दुकाने आहेत. त्यामुळे सकाळपासून रात्रीपर्यंत या मार्गांवर नागरिक, ग्राहक, व्यापारी आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.

मात्र, अरुंद रस्ते आणि नियोजित पार्किंगचा अभाव यामुळे या महत्त्वाच्या बाजारपेठेला वाहतूक कोंडीचा विळखा पडला आहे. वाहनचालकांकडून रस्त्याच्या कडेला वाहने उभी केली जात असल्याने उपलब्ध रस्त्याची रुंदी आणखी कमी होते. परिणामी वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होऊन पादचारी, दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

विशेष म्हणजे, बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना वाहन उभे करण्यासाठी योग्य जागा उपलब्ध होत नसल्याने त्यांची गैरसोय होते. ग्राहकांची बाजारपेठेत ये-जा सुलभ नसेल तर त्याचा परिणाम स्थानिक व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे रस्त्यांचे नियोजन, वाहतुकीचे शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारणे ही काळाची गरज असल्याचे व्यापाऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

रस्त्यांच्या विकासासोबतच पार्किंगचे नियोजन, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग यांचा एकत्रित विचार करण्यात यावा, अशी मागणी व्यापारी व नागरिकांनी केली आहे. या कामासाठी संबंधित प्रशासनाशी समन्वय साधून ठोस कार्यवाही करावी आणि अचलपूरच्या प्रमुख बाजारपेठांना वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आमदारांकडे व्यक्त करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या वेळी प्रफुल्ल विखार, रोशन सिरोया, मंगेश प्रांजळे, सोपास डागा, नरेंद्र तिडके, प्रदीप वहेकर, नितीन करुले, जयेश काशीकर, राहुल अग्रवाल, साकेत खंडेलवाल, गोविंद खंडेलवाल, दीपक तांबे, राजू शर्मा, मिलिंद तुळसकर, दिलीप राऊत, कैलास वानखडे, शंकर वानखडे, राहुल पाचपोर, विजू चरपटे, योगेश उघडे, प्रवीण घाटे, प्रज्वल पिहुलकर, सुशांत पाटणकर, राम ककरांनी, प्रमोद अग्रवाल, विनोद वानखडे, साबीर खान, मेहबूब भाई, अफसर भाई, वसीम भाई, श्रावण खोलापुरे, दिनेश दुबे, धीरज रावत, स्वप्निल मडगे यांच्यासह अनेक व्यावसायिक व नागरिक उपस्थित होते.



# ऑनलाइन चक्री जुगाराचा पर्दाफाश

## गुन्हे शाखा व खोलापुरी गेट पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हे शाखा युनिट-२ आणि खोलापुरी गेट पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करत ऑनलाइन चक्री जुगाराचा पर्दाफाश केला. बुधवारा भाजीबाजार परिसरातील एका बंदिस्त दुकानात सुरू असलेल्या ऑनलाइन जुगारावर धाड टाकून पोलिसांनी ३६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.रूपेश मदनलाल आलेकर (वय ५१, रा. बुधवारा) आणि नितेश दिपकराव प्रधान (वय ३४, रा. महाजनपुरा) अशी अटक आरोपींची नावे आहे.गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बुधवारा भाजीबाजार परिसरात नुतन ड्रायफुट दुकानासमोरील शटरच्या बंदिस्त दुकानात ऑनलाइन जुगार सुरू आहे.मिळालेल्या माहितीची खातरजमा केल्यानंतर गुन्हे शाखेचे पथक आणि खोलापुरी गेट पोलीस ठाण्याचे कर्मचारी यांनी संयुक्तपणे संबंधित ठिकाणी छापा टाकला.या कारवाई दरम्यान दुकानात टीव्ही स्क्रीनवर 'फन टार्गेट' वेबसाइटवरील ऑनलाइन चक्रीचा खेळ सुरू असल्याचे आढळून आले. या ठिकाणी पैशांची देवाण घेवाण करून ऑनलाइन जुगार खेळला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार कलम ४ आणि ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोउपनि अनिता हुलावळे यांच्या सह गुन्हे शाखा आणि खोलापुरी गेट पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### शक्तिपीठ महामार्गात जाणा-या जमिनींना चौपट मोबदला

**कोल्हापूर :** शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन आणि भरपाईसाठी शासनाने मार्गदर्शक नियमावली नुकतीच जाहीर केली आहे. त्यात बाधित शेतक-यांना जमिनीचा मोबदला देताना भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा, २०१३ आणि महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील लागू तरतुदींचा आधार घेतला जाणार आहे. २०१३ च्या कायद्यानुसार ग्रामीण भागातील भरपाई बाजारमूल्याच्या चौपट, तर शहरी भागात दुप्पट मिळणार असल्याचे सध्या तरी स्पष्ट झाले आहे.शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादन करताना प्रथम संबंधित जमिनीचे बाजारमूल्य निश्चित केले जाणार आहे. ग्रामीण भागात लागू कमाल गुणक दोन असल्यास भरपाई बाजारमूल्याच्या चौपट जाउ शकते. मात्र, प्रत्येक शेतक-याला सरसकट चौपट रक्कम मिळेल, असा याचा अर्थ नाही. जमिनीचा प्रकार, बाजारमूल्य आणि लागू तरतुदीनुसार अंतिम मोबदला ठरवण्यात येणार आहे. महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ नुसार महामार्गाची हद्द, बांधकाम रेषा आणि नियंत्रण रेषा निश्चित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र महामार्ग अधिनियमानुसार मोबदला निश्चित न झाल्यास भूसंपादन अधिकारी नुकसानभरपाई ठरवतो. नुकसानभरपाई मान्य नसल्यास संबंधित पक्षाला कायद्यानुसार लवादाकडे दाद मागता येते. जमीन राज्य सरकार अधिग्रहण केल्यानंतर महामार्ग प्राधिकरण किंवा अधिकृत व्यक्तीला महामार्गाच्या बांधकाम व संबंधित कामांसाठी जमिनीत प्रवेश करण्याचीही तरतूद आहे.

### रुक्मणी नगरात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात कारवाई

# बिर्याणी सेंटरला ५ हजार दंड




**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात कारवाई सुरू आहे. त्याअंतर्गत रुक्मणी नगर परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या तपासणीदरम्यान प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी श्री. पुरते यांच्या तपासणीदरम्यान प्रतिबंधित प्लास्टिक आढळल्याची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या प्लास्टिक पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देत संबंधित आस्थापनावर नियमानुसार कारवाई केली.

या कारवाईदरम्यान Donny Biryani House येथे प्रतिबंधित प्लास्टिक कंटेनर आढळून आल्याने संबंधितांकडून ५,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच प्रतिबंधित प्लास्टिक कंटेनर जप्त करण्यात आले. या कारवाईत प्लास्टिक नोडल अधिकारी ए.के. गोहर आणि स्वच्छता निरीक्षक सचिन सैनी यांनी सहभाग घेतला. शहरात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

पान १ व १० वरून

## शिंदेंना संपवण्याची सुपारी

**शिंदे यांना चारित्र्यहिन करण्याचा प्रयत्न-** डॉ. संजय लाखे पाटील पुढे म्हणाले की, लीलावतीमध्ये जरांगे यांचा मुलगा ॲडमिट झाला, त्या ठिकाणी कट शिजला आणि त्याच ठिकाणी एकनाथ शिंदेंना संपवण्याची सुपारी दिली गेली. ज्या शिंदेंनी साडेतीन लाख प्रमाणपत्र कुणबींना दिली, एसईबीसी प्रमाणपत्र दिली, त्या एकनाथ शिंदे यांच्यावर एकच प्रमाणपत्र दिल्यावर तुम्ही शिव्या देणार का? सामाजिक आंदोलनाचा बुरखा घालून एकनाथ शिंदे यांचे चारिर्त्यहनन करण्याची सुपारी घेतली गेली आहे, असा आरोप त्यांनी केला. तुमच्या गद्दारीचा डाव असतो अशी जी स्टेटमेंट चालू होती, त्या व्यासपीठावरती ते कोणालाही बसू देत नाहीत. अंबादास दानवे व्यासपीठावर गेले, त्यांच्या संमतीने दानवे बोलले आणि त्यानंतर अंबादास दानवे माध्यमांना बोलले. यातून एकनाथ शिंदे यांच्या विरोधात राजकीय आघाडी त्यांनी उघडली असून मराठवाड्यातील लोकांची फसवणूक केली आहे असे देखील त्यांनी म्हटले.

## रिलिजन म्हणजे धर्म

म्हणून संबोधले जात आहे, तो धर्म नसून धर्म त्याच्याही वर आहे असे मोहन भागवत यांनी नमूद केले.

**इंग्रजी भाषेत धर्मासाठी शब्द नव्हता, आजही नाही**

गुरु देव रानडे हे अलाहाबाद विद्यापीठातले तर्कशास्त्राचे प्रमुख होते. ते म्हणायचे की, प्रत्येक धर्माच्या वर एक धर्म आहे. त्या धर्मानुसार जर इतर धर्म चालले तरच सगळे व्यवस्थित चालेल. कारण त्या काळात इंग्रजी भाषेत धर्मासाठी कुठला शब्द नव्हता, आजही नाही. तेव्हा आपल्या देशात इंग्रजांचे राज्य होते. त्यांना हे सिद्ध करायचे होते की, त्यांचाच वारसा श्रेष्ठ आहे. त्यामुळे त्यांनी रिलिजन शब्दाचाच वापर केला. स्वामी विवेकानंद यांनी रिलिजन हाच शब्द वापरला. रिलिजन म्हणजे धर्म नाही, असे मोहन भागवत म्हणाले.

**धर्म बांधत नाही;** धर्म मुक्ती देतो-भारत सावित्री म्हणून ओळखल्या जाणा-या महाभारताच्या शेवटी पाच श्लोक आहेत. मातपित्रिसाहसरानी पुत्रदराष्टानि च। संसारेश्वरु भूतानि यन्ति यस्यन्ति चाप्रे, याला महाभारताचे सार म्हटले जाते. जेव्हा रिलिजन धर्माचे पालन करतात, तेव्हा ते मानवतेला मुक्त करतात. जेव्हा रिलिजन धर्मापासून विचलित होतात, तेव्हा जातीय तेढ निर्माण होते, अत्याचार केले जातात. रिलिजन म्हणजे धर्म ही जी गाठ आपल्या मनात बसली आहे, ती दूर केली पाहिजे. धर्म या शब्दाचा स्वतःचा एक वेगळा अर्थ आहे. धर्म हा रिलिगो या शब्दापासून आला आहे. याचा अर्थ बांधणे, शिस्तीखाली ठेवणे; याला रिलिजन म्हणतात. तर धर्म बांधत नाही; धर्म मुक्ती देतो, असे मोहन भागवत यांनी सांगितले.

## 5 ऑक्टोबरनंतर दुष्काळी

करण्यात येणा-या पंचनाम्यांच्या आधारे केंद्र सरकारकडे एनडीआरएफअंतर्गत मदतीची मागणी केली जाणार आहे. मात्र, एनडीआरएफ या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारच्या निधीतून आपण राज्य सरकारच्या वतीने मदत करणार आहोत, त्याची आतापासूनच तयारी सुरू केली आहे असे त्यांनी नमूद केले. एनडीआरएफकडून मदत मिळेपर्यंत शेतक-यांना मदत देण्यासाठी राज्य सरकार स्वतःच्या निधीतून खर्च करणार असून, त्यानंतर केंद्राकडून मिळणा-या एनडीआरएफच्या निधीतून हा खर्च भरून काढला जाणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**शेतक-यांना थेट मदत-** दुष्काळग्रस्त शेतक-यांना थेट आर्थिक मदत देण्यासोबतच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि आवश्यक त्या ठिकाणी चा-याची गरज असेल, ते सगळे उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. सध्याची दुष्काळाची जी परिस्थिती आहे, ती राज्य सरकारने गांभीर्याने घेतली असून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना सुरू असल्याचंही त्यांनी सांगितले.

**शरद पवारांच्या पत्रावर मांडली भूमिका-** शरद पवार साहेब हे ज्येष्ठ नेते आहे, त्यांनी पत्र पाठवून काही सूचना केल्या, ही चांगली गोष्ट आहे. मात्र त्याला मी कुठलही राजकीय रंग अथवा वळण देणार नाही. याबाबत सरकारने आवश्यक त्या उपाययोजना सुरू केल्या आहेत असे फडणवीस यांनू नमूद केले. एवढेच नव्हे तर यापुढे त्यांनी आणखी काही सूचना किंवा सल्ले दिले, तर ते निश्चितपणे ऐकू, अशी भूमिका फडणवीस यांनी मांडली.

## ममता बॅनर्जींनी पाठिंबा दिला

पोलिसांनी हत्येच्या जुन्या गुन्ह्यात अटक केली आहे.

**ममतांच्या उमेदवाराची मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर माघार-** नंदीग्राममधून ममता बॅनर्जी यांनी संचिता प्रधान-डे यांना उमेदवारी दिली होती. पण, नवे निवडणूक चिन्ह मिळण्यापूर्वीच पडद्यामागे मोठ्या राजकीय हालचाली झाल्या आणि ममतांचा पक्ष निवडणूकीतूनच बाहेर पडला. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांची संचिता प्रधान-डे यांनी मंत्रालयात भेट घेतली. ही सदिच्छा भेट असल्याचे सांगितले गेले, पण त्यानंतर ममतांना दुसरा झटका बसला. या भेटीनंतर संचिता प्रधान डे यांनी अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली.

**काँग्रेसला पाठिंबा, उमेदवाराला अटक-** संचिता प्रधान डे यांनी माघार घेतल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी तातडीने पत्रकार परिषद घेत नंदीग्राम मतदारसंघात काँग्रेसला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले. ममता बॅनर्जी यांनी पाठिंबा जाहीर करून तासभर होत नाही, तोच काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना पोलिसांनी अटक केली.

## राज्यातून उद्योग फरार!

संधी उपलब्ध झाल्या असत्या. मात्र, कंपनीने अचानक ही गुंतवणूक थांबवून आपला १२० एकरांचा भूखंड सोडल्याने मराठवाड्याचे मोठे नुकसान झाले आहे. यावरून विरोधकांनी आता रान उठवण्यास सुरुवात केली आहे.

उद्योगांचा दुष्काळ पाडू नका!

राज्य सरकारकडून वारंवार दावा केला जातो की, आम्ही असे काम करत आहोत की पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही. सरकारच्या याच दाव्याची खिल्ली उडवत अंबादास दानवे यांनी आपल्या पोस्टच्या शेवटी सरकारला थेट इशारा दिला आहे. पुढची पीढी दुष्काळ पाहणार नाही म्हणणारे, आता उद्योगांचा दुष्काळ पाडू नका फक्त! असा खोचक सल्ला त्यांनी राज्य सरकारला दिला आहे. या नव्या प्रकरणामुळे राज्यात पुन्हा एकदा उद्योग पळवल्याच्या मुद्यावरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

## तुरुंगात मी प्रचंड डिप्रेशनमध्ये

वाटलं असेल तर मी मनापासून माफी मागतो, अशी प्रतिक्रिया दिली. तसेच, मी माझा संवैधानिक अधिकार बजावत राहणार, थांबणार नाही, असेही स्पष्ट केले आहे. मी जे काही करतोय तो माझा संवैधानिक अधिकार आहे. मी माझा अधिकार बजावत असतो. पहिल्यांदाही तो बजावत होतो आणि यापुढेही बजावत राहणार, असेही पंडित यांनी सुटकेनंतर भूमिका मांडली.

### १० किलो गांजासह दोन

पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय प्रांजली सोनावणे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-१चे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, युनिट-२चे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि पथकाने केली.

### लाथ मारून ढकलल्याने

दशासर पोलिसांनी फिर्यादीच्या जबानीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. या घटनेमागील नेमका वाद, आरोपींची भूमिका आणि घटनेची पुढील पार्श्वभूमी याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

### तडीपार आरोपीला अटक

यासाठी राजापेठ पोलिसांकडून तडीपार इसमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत लावण्यात आलेल्या तडीपार इसमांच्या यादीतील कोणी व्यक्ती परिसरात आढळल्यास नागरिकांनी तत्काळ राजापेठ पोलीस ठाण्याला माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच डीबी पथकातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

### चार ठिकाणी अवैध

गुन्हा दाखल केला. दर्यापूर पोलिसांनी गणेशपूर येथील अनिल भीमराव गवई (वय ४५) याच्यावर कारवाई केली. तर बेनोडा पोलिसांनी प्रकाश पुंडलीकराव कडू (वय ५०, रा. बेनोडा) याच्याविरुद्ध कारवाई केली. या तीन कारवायांमध्ये देशी दारूच्या एकूण ३४ पावट्या व अन्य साहित्य जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे १ हजार ७०० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले. दुसरीकडे, वरूड पोलिसांनी जुगार अड्ड्यांवर दोन स्वतंत्र कारवाया केल्या. आठवडी बाजार परिसरात गौरव सुधीर बावणे (वय २५) आणि मयूर साहेबराव मोरे (वय २२) यांच्याविरुद्ध जुगार कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांच्याकडून जुगार साहित्य आणि रोख रक्कम मिळून सुमारे १ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उत्सव काळात अवैध धंद्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होऊ नये, यासाठी ग्रामीण पोलिसांकडून अशा कारवाया सुरूच ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पोलीस ठाण्यांच्या ठाणेदार व पथकांनी ही कारवाई केली.

### दुचाकी चोर जेरबंद

माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे सतीश बहाळ याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान त्याने दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीची होंडा ॲक्टिव्हा आणि ३५ हजार रुपये किमतीची हिरो पॅशन एक्स प्रो अशी दोन वाहने जप्त करण्यात आली. दरम्यान, आरोपीने आणखी काही गुन्ह्यांची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले असून, त्या माहितीची पडताळणी केली जात आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहायक पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार, पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे आणि डीबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन यांच्या पथकाने केली.

### शहरात 'मराठी कारण

असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी सांगितले की, पूर्वीच्या काळी लोक दुसऱ्या प्रांतात स्थलांतर करायचे तेव्हा तेथील स्थानिक भाषा आणि संस्कृतीशी एकरूप व्हायचे. परंतु गेल्या दशकभरात उत्तरेकडून महाराष्ट्रात जे स्थलांतर झाले आहे, ते वसाहतवादाचे स्वरूप आहे, असा आरोप डॉ. दीपक पवार यांनी केला.हे शिबिर मराठी जनतेसाठी असल्याचेही त्यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी स्वप्निल ९६७३६९९२६१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### अंजनगाव सुर्जी नगर

करावी. नगरपरिषद फंडातून आतापर्यंत सुमारे १ कोटी रुपयांवर देयक देण्यात आले असून सुमारे ४० लाख रुपये देणे बाकी आहे. निधी उपलब्ध असताना हे पैसे न.प. फंडातून का देण्यात आले, याची तपासणी करावी. न.प. फंडातील सर्व निधी घनकचरा विभागाच्या बिलासाठी दिला जात असल्याने इतर अति आवश्यक लहान कामे होत नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे.यापूर्वी दिलेल्या पत्रांची व निवेदनांची दखल घेऊन काय कार्यवाही झाली, पूर्वीची निविदा कोणत्या कारणामुळे रद्द करण्यात आली, तसेच पूर्वीच्या व नव्या निविदेतील शर्ती व अटींची तुलना करून कोणत्याही विशिष्ट निविदाधारकास लाभ मिळेल अशा पद्धतीने प्रक्रिया राबविली जात आहे का, याची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी आहे.तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत निविदेची पुढील कार्यवाही व कार्यादेश देण्याची प्रक्रिया स्थगित ठेवावी, सर्व पात्र निविदाधारकांना समान संधी मिळेल अशा पद्धतीने पारदर्शक निविदा प्रक्रियेचे निर्देश द्यावेत आणि अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.निविदा क्र. ४१२००९९८ मधील अट क्र. १५ नुसार (२०२६-२७) मध्ये काम चालू असल्याबाबत किमान ७ नगरपरिषद / कटक मंडळाचे प्रमाणपत्र सादर करण्याची अट कोणत्या नियमानुसार घेतली, शासनाच्या जीआरनुसार दीड कोटीच्या वर कामाकरिता ०.५० टक्के अनामत भरावी लागत असताना १ टक्का अनामत कोणत्या आधारावर घेण्यात आली, तसेच अट क्रमांक १७, १८, २३ व ३० नियमानुसार घेतल्या आहेत का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणत्याही विशिष्ट व्यक्ती अथवा संस्थेला अनुचित लाभ मिळता कामा नये. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी तातडीने हस्तक्षेप करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने राबविण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी सिमा गजानन विजेकर, सुयोग खाडे,इब्राहीम बेग हसन बेग, श्रीकांत मोहनराव जुनगरे सुनिता भास्कर बाळे, आबेदाबी मो. आरीफ, पुनम सुरज येऊल मो. रेहान अ. मुनाफ अविनाश ज्ञानेश्वर ढेंगे या नऊ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी यांच्या कडे केली आहे.

### आदिवासींच्या मागण्यासाठी विद्रोही

करण्यासाठी फॉरेस्ट डिपार्टमेंटचे ना हरकत प्रमाणपत्र, सुप्रीम कोर्टाचा आदेश, तसेच राज्यसभा व लोकसभेची परवानगी घेणे आवश्यक असते. हे क्षेत्र अजूनही 'डी' रिझर्व्ह आहे, म्हणून या सर्व परवानग्या घेणे बंधनकारक आहे. नगरपालिकेच्या कागदावर ही जमीन अंबादेवी संस्थान यांना देण्यात आली असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जेव्हा की हा अधिकार फॉरेस्ट डिपार्टमेंटला असतो. १९२७ साली देवी मंदिर आणि त्याच्या आजू बाजूच्या परिसरातील जागा ही धोबी समाजाच्या उपजीविकेसाठी देण्यात आली होती. त्याचे आजतागायत उपजीविकेसाठी वापर करण्यात येईल, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.या संपूर्ण प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन न्याय द्यावा, अन्यथा मुंबई मंत्रालयात तीव्र उपोषण करण्यात येईल, असा इशारा विद्रोही संघटनेने दिला आहे. वैराट देवी मंदिर दर्शनासाठी खुला करावा, चिखलदरा वनग्रामचा जमिनीचा प्रश्न निकाली काढा,धोबी समाजाच्या उपजीविकेचे रक्षण करा, राजा पायथी गोंडराजाच्या समाधीचे सौंदर्यीकरण करा, प्रत्येक शाळेत http://B.P.Ed., BPES शारीरिक शिक्षक द्या, घरकुल मंजूर करा, सर्व अतिक्रमण धारकांना पी.आर. कार्ड द्या, दिव्यांगांना २०० चौ.फुट जागा द्या,मेळघाटात पेसा कायद्याची सक्तीने अंमलबजावणी करा, स्थानिकांना रोजगार द्या,आदिवासींची जमीन त्यांना परत द्या,या मागण्यांवर ठोस लेखी आदेश मिळत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे.पत्रकार परिषदेत सचिन गोरले, रामकिसन कास्देकर, दिनेश टेकाम,नेहा बाजपेय, वासुदेव चौधरी, बाजीवाल बेलसरे, देवानंद धुर्वे आदि उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ग्रामपंचायत वापटा (हट्टी) येथे घरकुल आणि विहीर मस्टरमध्ये आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप!

## रोजगार सेवकावर कारवाईची मागणी!



■ प्रतिनिधी | मानोरा ■

मानोरा तालुक्यातील ग्रामपंचायत वापटा (हट्टी) येथे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत मंजूर झालेल्या घरकुल आणि विहीर योजनेच्या मस्टरमध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समस्त ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित रोजगार सेवकावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करून तात्काळ पदावरून निलंबित करण्याची मागणी करणारे निवेदन गट विकास अधिकारी ज्योती राजपुरोहित यांना दि. १६ सप्टेंबर रोजी देण्यात आले.

निवेदनात नमूद केले आहे की, ज्या लाभार्थ्यांचे घरकुल आणि विहीर अर्ज कायदेशीररीत्या मंजूर झाले होते, त्यांच्या मस्टरमध्ये फेरफार करण्यात आला आहे. मूळ लाभार्थ्यांना कोणतीही पूर्वकल्पना किंवा सूचना न देता, त्यांचा निधी परस्पर इतरत्र वळवून वितरित करण्यात आला आहे. रोजगार सेवकाने शासकीय नियमांचे सर्रास उल्लंघन करून, मस्टर रोल भरताना आणि निधी बँक खात्यात वर्ग करताना मोठी गोपनीयता बाळगली असून यामध्ये मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता आहे.

या मनमानी आणि बेकायदेशीर कारभारामुळे गावातील मूळ, गरजू आणि पात्र लाभार्थी हक्काच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, ज्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

हा शासकीय निधीचा अपहार असून थेट गरिबांच्या हक्कावर गदा आणणारा प्रकार आहे. रोजगार सेवकाने संगनमताने केलेल्या या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी.

ग्रामपंचायत वापटा (हट्टी) येथील घरकुल आणि विहिरीच्या मंजूर मस्टरची व बँक खात्यांवरील व्यवहाराची तात्काळ सखोल चौकशी करण्यात यावी. दोषी रोजगार सेवकावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करून त्यांना तात्काळ पदावरून निलंबित करण्यात यावे. मूळ आणि पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा निधी तात्काळ मिळवून देण्यात यावा. या प्रकरणाची त्वरित दखल घेऊन चौकशी समिती नेमण्यात यावी. अन्यथा न्याय न मिळाल्यास समस्त ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर राजेश राठोड, प्रमोद चव्हाण, श्रीकृष्ण राठोड, अमोल चव्हाण, कैलास चव्हाण, युवराज गिरी, भिमराव राठोड, युवराज चव्हाण, गणेश गिरी, राजेश चव्हाण, गंगाराम राठोड, दिलीप जकीर चव्हाण, अनिल चव्हाण यांच्यासह समस्त ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'सेवा संकल्प' आणि 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानचा शुभारंभ



■ प्रतिनिधी | वाशिम ■

ग्राम विकास विभागाच्या वतीने आयोजित 'सेवा सकल्प अभियान' तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने आयोजित 'स्वच्छता ही सेवा-२०२६' या दोन्ही उपक्रमांचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या सभागृहात (दि १७) करण्यात आला.

हे दोन्ही अभियान प्रत्येक गावामध्ये प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान यांनी सर्व यंत्रणेला दिले. तसेच राबविण्यात आलेल्या उपक्रमाचे फोटो व माहिती तालुकास्तरावरुन शासनाच्या पोर्टलवर दररोज भरण्याचे निर्देशही देण्यात आले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुखदेव जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी पांडुरंग ठोंबरे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गजानन खुळे, शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश कान्हेरकर आदींची उपस्थिती होती.

**गाव आणि तालुकास्तरावरही मोहिमेचा शुभारंभ**

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये आणि सहा पंचायत समिती मध्ये 'सेवा संकल्प' आणि 'स्वच्छता ही सेवा २०२६' या दोन्ही अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. पंचायत समिती मंगरुळपीर येथे गट विकास ? अधिकारी सारिका कारले, सहा. गट विकास अधिकारी रविंद्र वाढणकर, जिल्हा क्षमता बांधणी संल्लागार प्रफुल्ल काळे यांची यावेळी उपस्थिती होती. अभियानादरम्यान राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. कारंजा पंचायत समिती येथे गट विकास अधिकारी पुनम राणे, सहा. गट विकास अधिकारी परिहार, जिल्हा क्षमता बांधणी सल्लागार पी व्ही काळे यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेस रिसोड शहर महिला अध्यक्षपदी वर्षा कानडे



■ प्रतिनिधी | रिसोड ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रिसोड शहर महिला अध्यक्षपदी सौ. वर्षा अमर कानडे यांची नियुक्ती करण्यात आली. वाशिम जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा. चंद्रकांतदादा ठाकरे व वाशिम जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला जिल्हाध्यक्ष माधवी झनक यांच्या हस्ते वर्षा अमर कानडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी बोलताना चंद्रकांतदादा ठाकरे यांनी, 'सौ. वर्षा अमर कानडे या रिसोड शहरातील महिलांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच पक्षाची महिला संघटना मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील,' असा विश्वास व्यक्त केला. रिसोड शहरातील महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी तसेच महिला, सर्वसामान्य नागरिक आणि समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी सौ. वर्षा अमर कानडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रिसोड शहरातील महिला संघटनेला नवी ऊर्जा मिळणार असल्याचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सांगितले.

# गणेशोत्सवात महाप्रसादासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरचाच वापर सक्तीचा; वाशिम जिल्हा प्रशासनाचे निर्देश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आगामी गणेशोत्सव आणि येणाऱ्या सार्वजनिक उत्सवांमध्ये विविध मंडळांद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या महाप्रसाद व भोजनासाठी केवळ व्यावसायिक गॅस सिलेंडरचाच वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा गैरवापर रोखण्यासाठी आणि संभाव्य भीषण अपघात टाळण्यासाठी वाशिम जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना कडक निर्देश दिले आहेत.

## सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर बाबी

अनेक गणेश मंडळे अज्ञानापोटी किंवा दुर्लक्षामुळे महाप्रसाद तयार करताना घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करतात. यावर प्रशासनाने खालील धोके स्पष्ट केले आहेत.

**अपघाताचा धोका :** घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या बर्नर आणि गॅस प्रेशरमध्ये मोठा फरक असतो.



**विमा संरक्षण नाकारले जाणे:** दुर्दैवाने अपघात घडल्यास घरगुती सिलेंडरचा बेकायदेशीर वापर झाल्याचे सिद्ध झाल्यास कोणत्याही प्रकारचे विमा संरक्षण मिळत नाही.

**फौजदारी कारवाई :** घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक किंवा सार्वजनिक कामासाठी वापर करणे हा 'जीवनावश्यक वस्तू कायद्या'नुसार गुन्हा आहे. अपघात झाल्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात.

**महसुलाचे नुकसान:** अनुदानावर मिळणाऱ्या घरगुती गॅसचा गैरवापर झाल्यामुळे महसुलाचे मोठे नुकसान होते.

> 'श्रीगणेशोत्सव हा आपला पवित्र आणि आनंदाचा सण आहे, परंतु महाप्रसाद तयार करताना सुरक्षेशी अजिबात तडजोड केली जाऊ नये. घरगुती सिलेंडर आणि व्यावसायिक सिलेंडरची क्षमता तसेच बर्नरच्या प्रेशरमध्ये जमीन-आस्मानचा फरक असतो. मोठ्या भांड्यांसाठी घरगुती सिलेंडर वापरणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. जिल्हा प्रशासनाने आमच्या मागणीची दखल घेत हा कडक निर्णय लागू केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. माझी सर्व गणेश मंडळांना नम्र विनंती आहे की, कायदा आणि सुरक्षेचे पालन करत केवळ व्यावसायिक सिलेंडरचाच वापर करावा, जेणेकरून बाप्पाचा हा उत्सव प्रत्येकासाठी सुरक्षित आणि आनंदाचा ठरेल.'
>
> **नितीन सोळंके**
> (संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, ग्राहक दक्षता कल्याण फाऊंडेशन)

## प्रशासकीय आदेश व अटी:

**परवानगी पत्रात अट:** सार्वजनिक गणेश मंडळ व इतर संस्थांना मंडप, ध्वनी किंवा महाप्रसादाची परवानगी देताना (विशेषतः पोलीस प्रशासन, पालिका व पुरवठा विभागाकडून) महाप्रसादासाठी केवळ व्यावसायिक सिलेंडरचाच वापर करणे बंधनकारक राहील, ही अट स्पष्टपणे समाविष्ट केली जाईल.

**पूर्वसूचना व परिपत्रक :** स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे परिपत्रक काढून सर्व गणेश मंडळांना याविषयी पूर्वकल्पना द्यावी.

**अहवाल सादरीकरण :** सर्व तहसीलदारांनी आपल्या तालुक्यातील गणेश मंडळांना सूचित करून केलेल्या कारवाईचा अहवाल जिल्हा कार्यालयास सादर करण्याचे निर्देश दिले.

# बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी

## पाच दिवस झाले तरी उपोषणाची दखल नाही



■ प्रतिनिधी | मानोरा ■

बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे पाच दिवसा पासून बेमुदत आमरण उपोषण सुरू आहे. दिनांक १७ सप्टेंबर रोजी उपोषणाचा पाचवा दिवस होता.उपोषणकर्ते यांची प्रकृती खालावली असून उपोषण कर्ते

श्रीकांत राठोड, सतीश पवार यांच्या रक्तातील साखर व रक्तदाब कमी झाली आहे. वैद्यकीय पथकाने रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला आहे मात्र उपोषणकर्ते आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. तरीही शासन प्रशासनाने दखल घेतली नाही.

जय मरियामा, जय सेवाभाया- संत रामराव बापू चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव विजय माळवे (मुंबई), गोकुळ चव्हाण पुसद, माजी जी प सदस्य मोहन जाधव यवतमाळ, अॅड सिंपल ताई राठोड, पुसद, मोहिनी महेश राठोड यवतमाळ,प्रवीण चव्हाण मुंबई,राजेश राठोड बुलढाणा , सीताराम राठोड नांदेड यांनी पत्रकार परिषदेत दिली. दिनांक १७ सप्टेंबर रोजी या आंदोलना बाबत पत्रकार परिषद घेण्यात आली.

# विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; डॉक्टर दाम्पत्याने केले रक्तदान



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

रक्तदान हे श्रेष्ठदान असून, आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाचा जीव वाचण्यास मदत होऊ शकते. हीच सामाजिक बांधिलकी जपत विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी डॉ. रवी दिनकर पोफळे आणि डॉ. भाग्यश्री रवी पोफळे यांनी स्वतः रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया, गंभीर आजार तसेच प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज भासणाऱ्या रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विशेषतः डॉ. भाग्यश्री पोफळे यांनी रक्तदान केल्याने महिलांमध्येही रक्तदानाविषयी सकारात्मक संदेश गेला. स्वतः पुढाकार घेत रक्तदान करून त्यांनी 'आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचू शकतो' हा मानवतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. त्यांच्या या उपक्रमामुळे महिलांनीही रक्तदानासाठी पुढे यावे, असा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला. आयोजकांनी आवाहन करताना, 'तुमची काही मिनिटांची सेवा एखाद्याला संपूर्ण आयुष्य देऊ शकते. निरोगी व पात्र नागरिकांनी रक्तदान करून सेवा करावी.

# क्षयरोग, एड्स तपासणी शिबीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि.१६ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र शेलुबाजार येथे जिल्हा क्षयरोग केंद्र वाशीम मार्फत संशयित क्षयरुग्नाची डिजिटल एक्स रे मशीनद्वारे तपासणी करण्यात आली.तालुका आरोग्य अधिकारी डॉ धनश्री जाधव, वैद्यकिय अधिकारी डॉ देवकी सोनभोयर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी शिबिराचे नियोजन केले.

क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ४२ संशयिताचे एक्स रे काढले. यावेळी उपस्थित रविंद्र दाभाडकर, वैशाली मोहाडे, सौरभ अंभोरे, वैभव दिवाने, गणेश राऊत, प्रशांत तूरक, गजानन बायस्कार तसेच आशा कार्यकर्ती उपस्थीत होत्या.यावेळी ३५ संशयीतांचे स्पुटम गोळा करण्यात आले.लिंक वर्कर मिलिंद खंडारे यांनी २० व्यक्तीची एच आय व्ही तपासणी केली ङआरोग्य उपकेंद्र पेडगाव येथे हॅन्ड हेल्ड एक्स रे मशीनद्वारे टेक्निशियन कार्तिक शिरसाठ यांनी ५८ संशयितांचे एक्स रे काढले तसेच ५५ स्पुटम गोळा करण्यात आले.

# श्याम मुदुरुकोल्ला यांच्या चित्तथरारक कसरतींनी विद्यार्थ्यांची मने जिंकली



■ प्रतिनिधी | रिसोड ■

श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे तेलंगणा येथून आलेले श्याम मुदुरुकोल्ला यांनी आपल्या अंगभूत कलागुणांचे अनोखे दर्शन घडवत विद्यार्थ्यांसमोर विविध चित्तथरारक व लक्षवेधी करतब सादर केले. त्यांच्या अफलातून सादरीकरणाने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची लहर पसरली असून, उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या कलाविष्काराला उत्स्फूर्त दाद दिली.

श्याम मुदुरुकोल्ला यांनी आपल्या कौशल्यपूर्ण सादरीकरणातून विविध प्रकारच्या कसरती व मनोरंजक करतबांचे प्रात्यक्षिक दाखविले. क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणाऱ्या त्यांच्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले. अवघड वाटणाऱ्या कसरती सहजतेने सादर करत त्यांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रत्येक प्रयोगाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांच्या कलात्मक जिज्ञासेला व मनोरंजनाला वाव देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यालयात आनंददायी वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांना विविध कला-कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी या माध्यमातून मिळाली. या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य जानराव देशमुख, ज्येष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक- शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्याम मुदुरुकोल्ला यांच्या कौतुक केले. या आगळ्यावेगळ्या सादरीकरणाची विद्यार्थ्यांमध्ये दिवसभर चर्चा रंगली होती.

# अमृत योजनेअंतर्गत मालेगाव येथे उद्योजकता विकास कार्यक्रमास सुरुवात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने मालेगाव येथे १० दिवसीय उद्योजकता विकास कार्यक्रम (EDP) प्रशिक्षणास उत्साहात सुरुवात झाली. मालेगाव येथील उद्योजक अभिषेक मुंदडा यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी मान्यवरांचा अमृत संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अमृत मित्र नंदकिशोर वनस्कर, शैलेंद्र कळसे, हरिहर पांडे, नवल महाराज शर्मा तसेच प्रशिक्षक प्रा. कैलास खासभागे आदी उपस्थित होते.



उद्घाटनानंतर अमृत मित्र नंदकिशोर वनस्कर यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. राज्यातील खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी सक्षम करणे तसेच रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देणे, हा या प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या १० दिवसीय प्रशिक्षणामध्ये ४ दिवस ऑफलाईन आणि ६ दिवस ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी प्रशिक्षक प्रा. कैलास खासभागे यांनी अमृत संस्थेच्या विविध योजना, 'अमृत पेठ बाजारपेठ' तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्मची सविस्तर माहिती दिली.

# देशसेवेच्या स्वप्नांना बळ : पोलीस शिपाई प्रदीप बोडखेंचे गरजू विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशसेवेची जिद्द बाळगून पोलीस आणि सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या गरजू युवकांना योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने वाशिम पोलीस दलातील पोलीस शिपाई प्रदीप बोडखे हे कर्तव्य सांभाळून विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून यावर्षी महाराष्ट्र पोलीस दलात १३, तर इंडियन आर्मीमध्ये १७ विद्यार्थी निवड झाले असून, एकूण ३० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना भरतीच्या तयारीसाठी योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक गुणवंत युवकांना अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन प्रदीप बोडखे यांनी विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क न घेता मार्गदर्शन करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. लेखी परीक्षेची तयारी, शारीरिक व मैदानी चाचणीचे प्रशिक्षण, अभ्यासाचे नियोजन, सराव प्रश्नपत्रिका, टेस्ट सिरीज तसेच भरती प्रक्रियेबाबत अचूक माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. यासोबतच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, शिस्त, सातत्य, मेहनत आणि व्यक्तिमत्त्व विकास यावरही मार्गदर्शन केले जाते. पोलीस दलातील कर्तव्य बजावत असतानाच युवकांना देशसेवेच्या क्षेत्रात जाण्यासाठी मदतीचा हात देण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे. 'शिस्त, मेहनत आणि योग्य दिशा यांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते,' असा विश्वास प्रदीप बोडखे व्यक्त करतात. देशसेवेची जिद्द असलेल्या प्रत्येक गरजू युवकाला शक्य ते मार्गदर्शन मोफत उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.





## 'गरजू विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणे हेच माझे ध्येय'

'पोलीस व सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि जिद्द असते; मात्र योग्य मार्गदर्शनाअभावी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

अशा विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीचा अडथळा येऊ नये, यासाठी मी कर्तव्य सांभाळून त्यांना मोफत मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करीत आहे. शिस्त, सातत्य, मेहनत आणि योग्य नियोजनाच्या जोरावर प्रत्येक विद्यार्थी आपले ध्येय गाठू शकतो. यावर्षी माझ्या मार्गदर्शनातून ३० विद्यार्थ्यांची पोलीस व इंडियन आर्मीमध्ये निवड झाली, याचा मला विशेष आनंद आहे. भविष्यातही देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या गरजू युवकांना शक्य तेवढी मदत आणि योग्य दिशा देत राहणार आहे.'

**शिपाई प्रदीप बोडखे,**
वाशिम पोलीस

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९३ ■ शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# उन्हाळ्याची वाट पाहू नका, पाण्यासाठी आतापासूनच नियोजन करा

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांचा प्रशासनाला स्पष्ट इशारा

**वर्धा जनमाध्यम :** यंदाच्या पावसाळ्याने वर्धा जिल्ह्याला अक्षरशः चिंतेत टाकले आहे. जून जुलै आणि ऑगस्ट या महत्त्वाच्या महिन्यांत दमदार पावसाने पाठ फिरवल्याने धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली नाहीत. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजनाला सुरुवात केली आहे. एलनिनोच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचा आढावा घेताना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उपलब्ध पाणीसाठा आणि त्याच्या वापरावर सातत्याने लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी वान्मथी सी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये सध्या सुमारे ६२ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मोठ्या आणि मध्यम प्रकल्पांमध्ये स्थिती तुलनेने समाधानकारक असली तरी लघु प्रकल्पांमध्ये पाणीसाठा कमी असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.



यंदा जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाच्या मोठ्या सरी मोजक्याच दिवसांत कोसळल्या. त्यानंतर पावसाने मोठी विश्रांती घेतल्याने धरणांमध्ये अपेक्षित आवक झाली नाही. बोर प्रकल्पात ७४.५० टक्के निम्न वर्धा ८१.२५ टक्के धाम ७१.३१ टक्के पोथरा ८८.४५ टक्के डोंगरगाव ४९.५७ टक्के मदन ३४.२६ टक्के लाल नाला ५५.१७ टक्के आणि वर्धा कार नदी प्रकल्पात ७७.३९ टक्के जलसाठा असल्याची माहिती देण्यात आली आहे. काही प्रकल्पांमध्ये समाधानकारक साठा असला तरी अनेक प्रकल्प निम्म्याच्या आसपास आहेत.

गावोगावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न डोके वर काढू नये म्हणून विशेष टंचाई आराखडा तयार करण्यात आला आहे. तब्बल १७९ गावांसाठी २५१ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. यामध्ये ५९ सार्वजनिक विहिरी खोल करणे १४२ खासगी विहिरींचे अधिग्रहण २९ पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती १५ नवीन विंधन विहिरी आणि गरजेनुसार टँकरने पाणीपुरवठा करण्याचा समावेश आहे.

दरम्यान पाणीटंचाईबरोबरच शेतकरी कर्जमुक्ती योजनेचाही आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात ७४ हजार ३६५ कर्जखाती अपलोड झाली असून ४८ हजार १६५ शेतकरी पात्र ठरले आहेत. ३१ हजार ६९४ शेतकऱ्यांची ई केवायसी पूर्ण झाली आहे. दोन याद्यांमध्ये २३ हजार ३३० शेतकऱ्यांचा समावेश असून त्यांच्या खात्यात २३० कोटी रुपये जमा झाल्याची माहिती देण्यात आली. पुढील काळात पाऊस कमी राहिला तर पिण्याचे पाणी शेती उद्योग आणि ग्रामीण भागाच्या गरजा यांच्यात समतोल राखण्याचे आव्हान प्रशासनासमोर असेल. त्यामुळे पाणी आले तर साठवणे आणि साठा असेल तर काटकसरीने वापरणे हाच आगामी काळातील सर्वात मोठा मंत्र ठरणार आहे.

# ७ कोटींची इमारत ९५ टक्के पूर्ण, तरी बांधकामाच्या दर्जावर बोट

## संरक्षण भिंतीसाठी आणखी २ कोटींचा फटका

### हस्तांतरणाआधी 'गुणवत्तेचा पंचनामा' करण्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** कोट्यवधींचा निधी खर्च करून उभारण्यात येत असलेल्या बाल सुधारगृहाच्या बांधकामावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सिव्हील लाईन परिसरातील या जी प्लस चार इमारतीचे काम तब्बल ९५ टक्के पूर्ण झाल्याचे सांगितले जात असले तरी काही ठिकाणी बांधकामाचा दर्जा अपेक्षित मानकांनुसार नसल्याचे पाहणीदरम्यान निदर्शनास येत असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे इमारत महिला व बाल विकास विभागाकडे हस्तांतरित करण्याची घाई न करता आधी संपूर्ण बांधकामाची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी सुरक्षित वातावरण आणि पुनर्वसनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प उभारला जात आहे. सुमारे ७ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या इमारतीत बालकांसाठी निवासाची व्यवस्था. इनडोअर खेळ. मनोरंजनाच्या सुविधा तसेच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय करण्यात आली आहे.

मात्र मुख्य इमारतीचे काम जवळपास पूर्ण झाले असले तरी



प्रकल्पाची सुरक्षा व्यवस्था अद्याप अपूर्ण आहे. परिसराला संरक्षण देणाऱ्या भिंतीचे काम बाकी असून त्यासाठी आणखी सुमारे २ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे आधीच कोट्यवधींचा खर्च झालेल्या प्रकल्पाचा अंतिम खर्च आणखी वाढणार आहे.

**कोट्यवधींच्या प्रकल्पात गुणवत्ता तपासणार कोण.**

बालकांच्या सुरक्षिततेसाठी उभारण्यात येणाऱ्या इमारतीच्या बांधकामात कोणतीही तडजोड परवडणारी नाही. काही भागातील कामाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित होत असतील तर त्याची दखल घेणे प्रशासनाची जबाबदारी आहे. केवळ काम ९५ टक्के पूर्ण झाल्याचा अहवाल तयार करून इमारत हस्तांतरित करण्याऐवजी त्रयस्थ तज्ज्ञ संस्थेकडून बांधकामाची गुणवत्ता. संरचनात्मक सुरक्षितता आणि तांत्रिक निकषांची काटेकोर तपासणी करावी. दोष आढळल्यास जबाबदारी निश्चित करूनच पुढील कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे.

**हस्तांतरणाआधी बांधकामाचा 'पंचनामा' हवा**

बाल सुधारगृह म्हणजे केवळ चार भिंतींची इमारत नव्हे. येथे विधी संघर्षग्रस्त बालकांचे वास्तव्य राहणार आहे. त्यामुळे सुरक्षेपासून बांधकामाच्या प्रत्येक घटकाची गुणवत्ता महत्त्वाची आहे. ७ कोटींचा निधी खर्च झाल्यानंतरही दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत असतील तर प्रशासनाने त्याकडे डोळेझाक न करता त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करूनच इमारत ताब्यात घ्यावी.

# महामार्गावर स्वच्छतागृहांना कुलूप, प्रवाशांची कुचंबणा

## पाच वर्षांपासून सुविधा बंद, महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न

**आष्टी शहीद जनमाध्यम :** लाखो रुपये खर्च करून सुविधा उभारायच्या आणि प्रवाशांना मात्र त्यापासून वंचित ठेवायचे. आष्टी वरूड राष्ट्रीय महामार्गावरील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरली आहे. महामार्गाचे बांधकाम पूर्ण होऊन जवळपास पाच वर्षे उलटली तरी प्रवाशांसाठी उभारलेली स्वच्छतागृहे कुलूपबंद आहेत.



आष्टी वरूड मार्गावर महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातून ये जा करणाऱ्या हजारो प्रवाशांची दररोज वर्दळ असते. लांब पल्ल्याच्या प्रवासात स्वच्छतागृहाची सुविधा ही गरज असताना प्रशासनाने या मूलभूत सुविधेकडेच पाठ फिरवली आहे. विशेषतः महिला आणि कुटुंबीय प्रवाशांची मोठी कुचंबणा होत आहे.

स्वच्छतागृह बंद असल्याने काहींना रस्त्याच्या कडेला किंवा जंगल परिसराचा आधार घ्यावा लागतो. मात्र या मार्गालगत वनक्षेत्र असल्याने वाघ बिबट्या आणि अस्वलांचा वावर आढळतो. त्यामुळे स्वच्छतागृहाअभावी प्रवाशांच्या आरोग्यासोबतच सुरक्षिततेचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

सुविधा उभारून पाच वर्षे कुलूपबंद ठेवण्यामागचे गौडबंगाल काय. देखभाल आणि संचालनाची जबाबदारी कोणाची. लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या सुविधांचा उपयोग प्रवाशांना कधी मिळणार, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. महामार्ग प्रशासनाने तातडीने कुलूप तोडून स्वच्छतागृहे सुरू करावीत. अन्यथा प्रवाशांच्या सुविधांच्या नावाखाली उभारलेली ही केवळ शोभेची वास्तू ठरेल.

# धाम' नदीत उडी घेऊन युवकाची आत्महत्या

## पवनार येथील घटनेने परिसरात खळबळ

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात गणेशोत्सवाची धामधूम सुरू असतानाच पवनार येथे धाम नदीवरील पुलावरून नदीपात्रात उडी घेत ३५ वर्षीय युवकाने आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी (दि. १७) रात्री दहाच्या सुमारास घडली. मिथिलेश ऊर्फ गुड्डू लालसिंग बेस (ठाकूर) असे मृत युवकाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



गणेश विसर्जनाला सुरुवात झाल्याने धाम नदी परिसरात नागरिकांची मोठी वर्दळ होती. शुक्रवारी सकाळी पुलावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना नदीपात्रात मृतदेह आढळून आला. त्यांनी तत्काळ सेवाग्राम पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक दिलीप कडू, पोलिस हवालदार मनोज लोहकरे, गृहरक्षक शंकर नागपुरे, अरविंद लाडे, विकी गायकवाड, मंडळ अधिकारी आर. आय. हाडे, तलाठी प्रीती जाधव आणि पोलिस पाटील आम्रपाली ढोले यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह नदीपात्राबाहेर काढण्यात आला.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी पाठविला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी सेवाग्राम पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत

# सत्संगातूनच मिळते मनाला खरे सुख - मोहनबाबू अग्रवाल

## संत गजानन महाराजांची ११६ वी पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात संपन्न

**वर्धा जनमाध्यम :** धावपळीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात मनुष्य तणावाखाली जगत आहे. धनसंपत्तीमुळे जीवनातील भौतिक साधने मिळू शकतात. मात्र मनाला खरी शांती आणि समाधान मिळविण्यासाठी अध्यात्माची जोड आवश्यक आहे. सत्संगामुळे मनावरील अज्ञानाचे आवरण दूर होते आणि आत्मज्ञानाची प्राप्ती होते. त्यामुळे वास्तविक सुखाचा मार्ग सत्संगातूनच जातो, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल यांनी केले.

मगणवाडी चौकातील श्री संत गजानन महाराज मंदिरात श्रींच्या ११६ व्या पुण्यतिथी उत्सवाचा समारोप भक्तिमय वातावरणात झाला. अध्यक्षस्थानावरून मोहनबाबू अग्रवाल बोलत होते. मनुष्याला ईश्वराने दुर्मीळ मानवजन्म दिला असून त्याचा सदुपयोग करून चांगले जीवन जगणे आपल्या हातात आहे.



शिक्षणाच्या विविध पदव्या मिळविण्यासोबत आत्मज्ञानाची डिग्री मिळविणेही आवश्यक आहे. आत्मज्ञानाशिवाय जीवन अपूर्ण राहते, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष प्रवीण हिवरे, कोषाध्यक्ष सुशील व्यास, सचिव ज्ञानेश्वर पहाडे, विश्वस्त मधुसूदन अग्रवाल, भागवताचार्य नेर, ह.भ.प. मधुकर पाचपुते महाराज आणि ह.भ.प. भानुदास डफरे महाराज उपस्थित होते.

सकाळी पवनार नदीचे जल कावड यात्रेतून आणून श्रींचा अभिषेक करण्यात आला. यानंतर ह.भ.प. मधुकर पाचपुते महाराज यांचे गोपाल काल्याचे कीर्तन झाले. श्रींच्या पालखीची शहराच्या मुख्य मार्गावरून भजन मंडळाच्या सहभागाने वाजत गाजत शोभायात्रा काढण्यात आली. सायंकाळी आयोजित महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाचे संचालन हरीश तांदळे यांनी केले. आभार ज्ञानेश्वर पहाडे यांनी मानले. उत्सवाच्या यशस्वितेसाठी मंदिर संस्थेचे पदाधिकारी आणि भाविकांनी सहकार्य केले.

# नळाला पाणी की गाळ? जलशुद्धीकरण केंद्राचा नेमका उपयोग तरी काय

### प्रशासनाच्या कारभारावर संताप

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** शहरवासीयांना शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. मात्र जलशुद्धीकरणाची व्यवस्था असतानाही नागरिकांच्या नळाला गाळ आणि मातीमिश्रित पाणी येत असल्याने प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जलशुद्धीकरण केंद्र असूनही नागरिकांच्या नशिबी गाळयुक्त पाणीच असेल तर ही यंत्रणा नेमकी कशासाठी असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील अनेक भागांत नळाद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात गाळ माती आणि इतर अशुद्ध घटक आढळत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे पिण्याचे पाणी वापरण्यापूर्वी नागरिकांना ते गाळून अथवा उकळून घ्यावे लागत आहे. पावसाळ्यात या समस्येने अधिक गंभीर स्वरूप धारण केल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया झाल्यानंतरही घराच्या नळापर्यंत पोहोचताना पाणी

### शुद्धीकरणानंतरही नागरिकांच्या घरात अशुद्ध पाणी

अशुद्ध होत असेल तर जलवाहिन्यांची दुरवस्था आणि गळती तसेच पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता आणि संपूर्ण वितरण यंत्रणेची तपासणी करण्याची गरज आहे. मात्र वारंवार तक्रारी करूनही समस्या कायम असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी थेट निगडित असलेल्या या प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे तात्पुरती मलमपट्टी न करता गाळयुक्त पाण्याच्या समस्येचे मूळ शोधून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.



सावंगीच्या राजाच्या चरणी गुरुवारी रात्री पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची भावपूर्ण आरती माजी खासदार रामदास तडस, नगरपालिका उपाध्यक्ष दिलीपसिंह ठाकूर व आशिष कुचेवार यांची उपस्थिती.


**-फोटो राहुल तेलरांधे वर्धा**

# बोगस ठरावाचा खेळ, ग्रामपंचायतीत खदान घोटाळ्याचा संशय

## प्रोसिडिंग बुकमध्ये खोडतोड केल्याचा ग्रामस्थांचा आरोप

**सेलू / अभय बेदमोहता :** सेलू तालुक्यातील दहेगाव गोसावी ग्रामपंचायतीत बोगस ठराव आणि नाहरकत प्रमाणपत्राच्या कथित प्रकरणाने खळबळ उडाली आहे. आर्थिक लाभासाठी सरपंच आणि ग्रामसेवकाने संगनमत करून शासकीय दप्तरात खोडतोड केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

मौजा किन्हाळा येथील सर्व्हे क्रमांक २६ १ २ मधील दोन हेक्टर जागेवर गौण खनिज खाणपट्टा मंजूर करण्यासाठी ग्रामसभेची मंजुरी आवश्यक होती. मात्र २० मे २०२६ रोजीच्या मासिक सभेचा ठराव क्रमांक ७ हा २९ मे रोजी झालेल्या ग्रामसभेचा असल्याचे दाखवून बोगस ठराव तयार करण्यात आल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. गावकऱ्यांची संमती न घेता १२ जून रोजी तहसीलदार कार्यालयात नाहरकत प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे.



प्रोसिडिंग बुकमध्ये वेगवेगळ्या पेनाने खोडतोड केल्याचे फोटो आणि व्हिडिओ पुरावे असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. २५ ऑगस्ट रोजी गटविकास अधिकारी सेलू यांच्या पथकाने ग्रामपंचायतीचे आठ रजिस्टर जप्त केले. ३१ ऑगस्ट रोजी पोलिसांत बीएनएसच्या संबंधित कलमांनुसार तक्रारही दाखल करण्यात आली.

दरम्यान जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार १७ सप्टेंबर रोजी गटविकास अधिकारी मयूर पोकळे आणि विस्तार अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी ग्रामस्थांच्या उपस्थितीत चौकशी केली. कागदपत्रे ताब्यात घेण्यात आली असून आठ दिवसांत अहवाल देण्याचे सांगण्यात आल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले.

बोगस कागदपत्रांची फॉरेन्सिक तपासणी, खदानांचे नाहरकत प्रमाणपत्र रद्द करणे, सरपंच ग्रामसेवकांचे निलंबन आणि मागील पाच वर्षांचे विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आता चौकशी अहवालातून नेमके काय समोर येते आणि प्रशासन कारवाईचा हातोडा कुणावर चालवते, याकडे लक्ष लागले आहे.

# मागण्या मान्य करा नाहीतर २८ सप्टेंबरपासून कामबंद आंदोलन

## नायरा कामगारांचा व्यवस्थापनाला थेट इशारा

**पुलगाव जनमाध्यम :** नायरा एनर्जी लिमिटेड निमगाव सबाने येथील कामगारांच्या प्रलंबित मागण्यांचा प्रश्न चिघळला असून मागण्या पूर्ण न झाल्यास २८ सप्टेंबरपासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाला दिला आहे. वेतन कामाचे तास ओव्हरटाईम आणि वैद्यकीय भत्त्यासह विविध मागण्यांवर अद्याप समाधानकारक तोडगा न निघाल्याने कामगारांनी आता संघर्षाची भूमिका घेतली आहे.

नायरा कंपनीत परिसरातील अनेक गावांतील कामगार विविध एजन्सींच्या माध्यमातून सेवा बजावत आहेत. चेकमेट एच के सी वेन्चर विहार निनाद राम नर्सरी आणि सेक्युरिटी एजन्सीतील कामगारांचा मागण्यांमध्ये सहभाग असल्याचे पूर्वसूचनेत नमूद करण्यात आले आहे. महागाईच्या काळातही कामगार कायद्यानुसार हक्काचे वेतन आणि इतर सुविधा मिळत नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन त्यांची पूर्तता करावी अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्या मान्य करण्याबाबत कंपनीकडून लेखी आश्वासन मिळेपर्यंत कामबंद आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार कामगारांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे २८ सप्टेंबरपासून नायरा कंपनीचे कामकाज प्रभावित होण्याची शक्यता असून व्यवस्थापनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.



श्रीमती निर्मलाताई डोळस यांच्या निवासस्थानी गेल्या २८ वर्षांपासून ज्येष्ठ गौरी-महालक्ष्मीची विधिवत स्थापना केली जात आहे. यंदाही गौरी-महालक्ष्मीचे मनोहारी सजावट करण्यात आली आहे.

**(छायाचित्र : गौरव कुऱ्हेकार, आर्वी)**

# गणेशोत्सवात डाक विभागाच्या विविध योजनांची जनजागृती

## सुकन्या समृद्धी योजना व इतर योजनांची माहिती

**वर्धा जनमाध्यम :** भारतीय डाक विभागामार्फत विविध जनकल्याणकारी योजना, उपक्रम राबविण्यात येतात. त्याची जनजागृती होण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत गणेशोत्सवात लोकसंवादाच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. वर्धा शहरातील केळकरवाडी येथील केळकरवाडीचा राजा मंडळात विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून योजना समजावून सांगितल्या व त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. आर्थिक सक्षमीकरण व आर्थिक समावेशन या केंद्र सरकारच्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डाक विभागामार्फत विविध बचत योजना व नागरिकाभिमुख सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. डाक विभागामार्फत बचत खाते, आवर्ती खाते, सुकन्या समृद्धी योजना, मुदत ठेव खाते, किसान विकास पत्र, राष्ट्रीय बचत पत्र, वरिष्ठ नागरिक बचत योजना, मासिक उत्पन्न योजना, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी तसेच डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. सुरक्षित व खात्रीशीर बचतीसाठी नागरिकांचा डाक विभागाच्या योजनांकडे कल वाढत आहे. सध्या गणेशोत्सवाचा उत्साह संपूर्ण जिल्ह्यात सुरू असून, या संधीचा उपयोग करून नागरिकांपर्यंत विविध योजना व सेवा पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय व वर्धा डाक विभागामार्फत गणेशोत्सवाच्या कालावधीत विशेष लोकसंवाद कार्यक्रम घेण्यात आला.

# भाजपाला निवडणुका लढवायची इच्छाच नाही-खा.राहूल गांधी



राहुल गांधी संतापले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'भाजपाला निवडणुका लढवायची इच्छाच नाहीये, त्यांना निवडणुकीतील लढाईचीच त्यांना संपून टाकायची आहे', असा संताप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी व्यक्त केला. पश्चिम बंगालमधील नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस उमेदवार मिलन प्रधान यांना अटक करण्यात आली आहे. याचे राजकीय पडसाद उमटले आहेत.

नंदीग्राम विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक होत आहेत. पण, या मतदारसंघातील राजकारण देशभरात चर्चेचा विषय ठरले आहे. या मतदारसंघातून काँग्रेसचे मिलन प्रधान हे निवडणूक लढवत आहेत. त्यांनाच अटक करण्यात आली आहे. या कारवाईनंतर राहुल गांधी भडकले.

**यांना पक्ष चोरून सत्ता वाचवायची आहे**

'नदीग्राम पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना करण्यात आलेली अटक, हा काही योगायोग नाहीये. राजकीय सूडबुद्धी आहे. लोकशाहीची हत्या आहे', असे राहुल गांधी म्हणाले.

'भाजपाचा निष्पक्ष निवडणुकींवर विश्वास नाहीये. त्यामुळेच कधी मतचोरी, कधी सरकार चोरी आणि कधी पक्ष चोरी करून सत्ता वाचवायची असते. त्यांना निवडणुका लढवायची इच्छा नाहीये, तर त्यांना निवडणुकीतील लढाईच संपवून टाकायची आहे. पण काँग्रेस घाबरणार नाही, झुकणार नाही. आम्ही लढू आणि आम्ही जिंकूही', अशी टीका राहुल गांधी यांनी भाजपावर केली.

**नंदीग्राममध्ये एकाच दिवसात बदलले राजकारण**

नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातील राजकारण एकाच दिवसात बदलून गेले आहे. ममता बॅनर्जीचा पक्ष या निवडणुकीतून बाहेर फेकला गेला आहे. ममता बॅनर्जी यांच्या पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह गोठवण्यात आले. त्यानंतर ममता बॅनर्जी यांना नवीन पक्ष आणि निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांनी ज्यांना नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. त्या संचिता प्रधान डे यांनी अचानक अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे या निवडणुकीतून ममतांचे आव्हान संपुष्टात आले आहे. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्या भेटीनंतर संचिता प्रधान डे यांनी अर्ज माघार घेतल्याने वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर मिलन प्रधान यांना एका जुन्या हत्येच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली.

# शरद पवारांनी लिहिलेल्या पत्रावर सत्ताधा-यांचा आक्षेप

## महसूलमंत्री बावनकुळे म्हणतात, दुष्काळाचे राजकारण करण्याची गरज नाही

**नागपूर/प्रतिनिधी ::** राज्यावर दुष्काळाचे सावट असून विरोधी पक्षाने राज्य सरकारवर टीका सुरू केली आहे. दुष्काळावरून राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावरून शुक्रवारी त्यांच्यावर टीका केली.महसूलमंत्री बावनकुळे नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. ते म्हणाले, माझ्याकडेही शरद पवार यांचे पत्र आले आहे. दुष्काळावर राजकारण करण्याची गरज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील मंत्रिमंडळाच्या बैठकीतच सर्व विभागाला यासंबंधी आवश्यक सूचना दिल्या आहेत. कुठल्या उपाययोजना करायच्या, याबाबत सर्वेक्षण करण्याची गरज आहे. सात-आठ दिवसांत अहवाल येईल. सर्व जिल्हाधिकारी, मदत व पुनर्वसन विभाग, कृषी विभागाने पंचनामे तयार करण्याचे काम सुरू केले आहे, असे ते म्हणाले.

**केंद्राकडे मदतीसाठी प्रस्ताव पाठवणार**

बावनकुळे म्हणाले, पंचनामे पूर्ण होउन त्याचा अहवाल आमच्याकडे येईल. मदतीसाठी काही प्रस्ताव केंद्राकडे पाठवावे लागेल, काही मदत राज्य सरकारकडून करावी लागेल. दुष्काळाच्या स्थितीतील सर्व प्रक्रियेला प्राधान्य देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासाठी संवेदनशील आहेत. मंगळवार, बुधवारपर्यंत यासंदर्भात अंतिम अहवाल येण्याची अपेक्षा आहे. या अहवालाच्या आधारावर शेतक-यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात येईल.



सर्व मंत्री, पालकमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिका-यांना दुष्काळाची पाहणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. आमदारांनाही त्यांच्या भागातील स्थितीची पाहणी करून शेतक-यांचे ऐकूण घ्यावे, अशा सूचना दिल्या आहेत. भविष्याच्या दृष्टीने शेतक-यांना पूर्ण मदत झाली पाहिजे, यासाठी संपूर्ण माहितीची गरज असून सर्वेक्षण सुरू आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्याची मी स्वतः पाहणी करणार आहे. मोका तपासणी करावीच लागेल, प्रत्येकाला जावेच लागेल. दुष्काळाची तीव्रता किती आहे, या आधारावर निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

चारा छावणीमध्ये मागील वेळी भ्रष्टाचार झाला होता. यावेळी भ्रष्टाचार होणार नाही. कृत्रिम पावसाचा प्रयोग कुठेच यशस्वी झाला नाही. परतीचा पाउस झाल्यास दुष्काळाचे संकट थोडे कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अवैध वाहतूक थांबविण्यासाठी गौण खनिजाबाबत नवीन नियम येणार आहे. नागरिकांना घर बांधण्यासाठी किती रेती लागेल, तेवढी रायल्टी द्यायची, वाहतूकदारांच्या मागे लागण्याची गरज नाही, असे ते म्हणाले. खनिजाबाबत संपूर्ण राज्यावर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे २५ हजार कोटी महसूल येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याबाबत चांदीवाल आयोगाचा अहवाल योग्य व्यासपीठावर जाहीर करू, असे ते आमदार रोहित पवारांच्या मागणीवर म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी दिवे लावण्यावरून कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी एक दिवा पश्चातापाचाही लावावा, अशी टीका केल्याकडे लक्ष वेधले असता बावनकुळे म्हणाले, मल्लिकार्जून खरगे यांना वेड लागले आहे. पंतप्रधानांच्या वाढदिवशी दिवा लावला तर खरगेंचे काय गेले? खरगे यांनी आपल्या वाढदिवसाला फटाके फोडावे, दिवाळी करावी आम्हाला काय देणे-घेणे, असे नमुद करीत ते म्हणाले, जनतेची श्रद्धा आहे, त्यांनी दिवे लावले. आम्ही जनतेला दिवे लावायला सांगितले नाही, परंतु पंतप्रधानांना अशा उपक्रमातून नवी उर्जा मिळावी, म्हणून जनतेनेच पुढाकार घेतला, असे त्यांनी सांगितले. इंडिया आघाडीचे जहाज बुडले. मागच्या दोन वर्षात बैठकच झाली नाही. कांग्रेस, उद्धव ठाकरे यांनी आपापली चिंता करावी, असा सल्ला त्यांनी दिला. त्यांनी केला.

# गणेशोत्सवातच वाईट घडले! 5 तरुण सीना नदीत बुडाले

**माढा-**गणेशोत्सवामुळे उत्साहाचे वातावरण असतानाच सोलापूर जिल्ह्यातील निमगावमध्ये एक दूर्दैवी घटना घडली. गणेशोत्सव सुट्टीनिमित्त गावी आलेले पाच तरुण सीना नदीत




पोहत असताना बुडाले. यातील आरडाओरड केल्याने तीन तरुणांना वाचवण्यात यश आले. तर दोन तरुण बेपत्ता आहेत. माढा तालुक्यात असलेल्या निमगाव येथे ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गणेशोत्सवाच्या सुट्टीमुळे तरुण सीना नदीवर पोहण्यासाठी गेले होते. नदी पात्रात उतरल्यानंतर ते खोल पाण्याच्या दिशेने गेले पण पाण्याचा अंदाज चुकल्याने ते बुडायला लागले. पाण्यात बुडत असताना त्यांनी आरडाओरड सुरू केली. त्यामुळे परिसरात असलेल्या लोकांचे त्यांच्याकडे लक्ष गेले. लोक नदीच्या दिशेने धावत आले. तरुण बुडत असल्याचे बघितल्यानंतर त्यांनी तरुणांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू केले. यात तीन तरुणांना बाहेर काढण्यात यश आले. तर दोन तरुण सापडले नाही. उजनी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे सीना नदीच्या पात्रातील पाण्याची पातळी वाढली असून, पाण्याचा वेगही वाढला आहे.

# 'चिप मेकिंग'साठी टाटाची 16 कंपन्यांसोबत हातमिळवणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** आजच्या काळात ज्याच्याकडे चिप म्हणजेच सेमीकंडक्टर आहे, जग त्याच्याच मुठीत आहे. स्मार्टफोनपासून ते फायटर जेटपर्यंत, सर्व काही याच छोट्याशा चिपवर अवलंबून आहे. या ग्लोबल रेसमध्ये भारत आता झपाट्याने पुढे जाण्याचा प्रयत्न करतोय आणि जेव्हा देशाच्या भविष्याचा प्रश्न असतो, तेव्हा टाटा समूह कसा मागे राहू शकतो? सेमीकान इंडिया २०२६ च्या व्यासपीठावरून टाटा इलेक्ट्रानिक्सने एक महत्त्वाची घोषणा केली, ज्याने संपूर्ण जगाच्या टेक बाजाराचे लक्ष वेधून घेतले आहे.

टाटा इलेक्ट्रानिक्सचे सीईओ रणधीर ठाकूर यांनी सांगितले की कंपनी या इव्हेंटमध्ये एकूण १६ मोठे करार करत आहे. यात युरोप, जपान, सिंगापूर, मलेशिया आणि अमेरिकेच्या दिग्गज कंपन्यांचा समावेश आहे. युरोपमधून नेक्सपेरिया आणि बेसी, जपानमधून जेएसआर आणि फुजीफिल्म, मलेशियामधून कालिंग्टनसारख्या ग्लोबल कंपन्यांसोबतच भारताच्या एलअँडटी आणि गति शक्ती विश्वविद्यालयासोबतही टाटाने हातमिळवणी केली आहे. म्हणजेच चिप बनवण्याच्या संपूर्ण सप्लाय चेनची व्यवस्था टाटाने केली आहे. जर तुम्हाला वाटत असेल की फक्त कागदपत्रांवर स्वाक्ष-या होत आहेत, तर असं नाही. रणधीर ठाकूर यांनी स्पष्ट केलं की गुजरातमधील धोलेरामध्ये बनत असलेली



त्यांची सेमीकंडक्टर फॅब म्हणजेच चिप बनवण्याची फॅक्टरी आणि आसाममध्ये बनत असलेली पॅकेजिंग फॅसिलिटीचं काम अगदी बुलेट ट्रेनच्या वेगानं सुरू आहे. सरकारला जी टाइमलाइन देण्यात आली होती, काम अगदी त्याच निश्चित वेळेवर पूर्ण होत आहे. धोलेरामध्ये ही फॅक्टरी उभी करण्यासाठी बांधकामापासून ते केमिकलपर्यंतच्या ४५० हून अधिक पार्टनर्सना एकत्र आणण्यात आले आहे.

**नोक-यात महिलांचे वर्चस्व असेल**

कंपनीने आतापर्यंत १.५ लाखांहून अधिक थेट रोजगार निर्माण केले आहेत. सर्वात उत्तम गोष्ट म्हणजे या वर्कफोर्समध्ये ६५ टक्के महिला आहेत, ज्यांपैकी बहुतांश देशातील दुर्गम गावांतून येतात. सीईओंचं म्हणणे आहे की सेमीकंडक्टर क्षेत्रात निर्माण होणारी एक नोकरी, इकोसिस्टममध्ये १० नवीन नोक-या निर्माण करते.

**भारताची इलेक्ट्रानिक्स झेप**

टाटाच्या सीईओंनी भारताच्या प्रगतीचं जे रिपोर्ट कार्ड सादर केले, तेही जबरदस्त आहे. २०१४ मध्ये भारताची इलेक्ट्र?निक्स इंडस्ट्री केवळ २ लाख कोटी रुपयांची होती, जी आता २०२६ मध्ये १३ लाख कोटी रुपयांपार पोहोचली आहे. फक्त पाच वर्षांपूर्वी इंडिया सेमीकंडक्टर मिशन सुरू झाले होते आणि आज देशात १२ फॅक्टरी वेगवेगळ्या स्तरांवर काम करत आहेत. भारत आता फक्त चिप मागवत नाही, तर मेड इन इंडिया चिप जगभरातील ग्राहकांना निर्यात करत आहे.

# सहावीसाठी पुढील वर्षी त्रिभाषा धोरण लागू करा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत असलेल्या तीन भाषा अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाला महत्त्वाची सूचना केली आहे. सहावीतील विद्यार्थ्यांसाठी दोन भारतीय भाषांसह तीन भाषा शिकणे बंधनकारक करण्याचे धोरण पुढील शैक्षणिक वर्षापासून म्हणजे २०२७ पासून लागू करण्याचा विचार करावा, असे न्यायालयाने सांगितले.



सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जायमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. सीबीएसईतर्फे अतिरिक्त साालिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी न्यायालयाला सांगितले की, मंडळ या सूचनेचा विचार करेल. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी सांगितले की, सध्या सहावीत शिकणा-या विद्यार्थ्यांना यंदाच तीन भाषा शिकायच्या असतील तर त्यांनाही ती संधी देता येईल, असेही त्यांनी नमूद केले. यावर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने या सूचनेचा अभ्यास करून नव्याने भूमिका मांडण्याची तयारी दर्शविली.खंडपीठाने स्पष्ट केले की, न्यायालयाने केलेल्या सूचना या कोणत्याही पक्षाच्या अधिकारांवर किंवा दाव्यांवर परिणाम करणा-या नाहीत. या धोरणाशी संबंधित मूळ कायदेशीर प्रश्नांवर पुढील टप्प्यात निर्णय घेतला जाईल. यापूर्वी २७ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने या धोरणाला आव्हान देणा-या याचिकेची दखल घेत केंद्र सरकार, सीबीएसई आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांना नोटिसा बजावल्या होत्या. सीबीएसईच्या परिपत्रकानुसार नववीतील विद्यार्थ्यांसाठी तीन भाषा शिकणे बंधनकारक केले आहे. या तीन भाषांपैकी किमान दोन भारतीय भाषा असणे आवश्यक आहे. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, अरबी, स्पॅनिश यांसारख्या भाषा परदेशी भाषांच्या गटात येतात. यातील परदेशी भाषा शिकायची असल्यास प्रथम दोन भारतीय भाषा शिकणे आवश्यक असेल.

# शिक्षणानंतर आता नोकरीतही उपयोगी ठरणार 'अपार आयडी'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** विद्यार्थ्यांना जारी करण्यात येणारी अपार आयडी आता शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीतही उपयोगी पडणार आहे. शिक्षण मंत्रालयाने नुकतेच अपार पोर्टलवरील गोपनीयता धोरण अद्ययावत केले आहे.

आता शैक्षणिक तपशील शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त नियोक्त्यांसारख्या अधिकृत तृतीय पक्षांसोबतही शेअर करता येतील. म्हणजेच, नियोक्ता अपारमधील डेटाच्या आधारे विद्यार्थ्याची पदवी, गुणपत्रिका इत्यादींची पडताळणी करू शकतील. यामध्ये गुणपत्रिका, ग्रेडशीट, डिप्लोमा, प्रमाणपत्रे आणि इतर शैक्षणिक उपलब्धी संग्रहित असतात. विद्यार्थ्यांचा वैयक्तिक डेटा साठवण्यासाठी अपार तृतीय पक्षाच्या क्लाउड सेवा पुरवठादारांचा वापर करू शकते, असे धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे. डेटाची उपलब्धता, पुनर्प्राप्ती आणि सेवेची सातत्यता सुनिश्चित करण्यासाठी डेटा हस्तांतरित केला जाउ शकतो. दरम्यान विद्यार्थ्याची मंजुरी मिळाल्यानंतरच नियोक्ते पडताळणी करू शकतील. या आयडीमध्ये विद्यार्थ्याचे प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतचे सर्व गुण, प्रमाणपत्रे आणि पदव्या डिजिटल स्वरूपात साठवल्या जातात. त्यामुळे नोकरीसाठी अर्ज करताना वेगळा सीव्ही बनवण्याची किंवा कागदपत्रे सोबत बाळगण्याची गरज उरणार नाही. अनेकदा नोकरीच्या ठिकाणी बनावट डिग्र्या सादर केल्या जातात.

अपार आयडी थेट डिजीलाकर आणि अकॅडमिक




बँक ऑफ क्रेडिट्सशी जोडलेला असल्याने, कंपन्यांना तुमच्या शैक्षणिक पात्रतेची सत्यता एका क्लिकवर तपासता येईल. कौशल्यांची नोंद केवळ गुणच नाही, तर विद्यार्थ्यांनी मिळवलेले क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य, इतर अभ्यासक्रम आणि तांत्रिक कौशल्ये यांचीही नोंद यात असते. यामुळे कंपन्यांना तुमच्या क्षमतेचा अचूक अंदाज येतो.

**संमतीनेच पडताळणी**

विद्यार्थी अर्जात अपार आयडी आणि इतर माहिती देईल. मात्र, आयडी मिळताच शैक्षणिक नोंद दिसणार नाही. विद्यार्थ्याच्या संमतीनेच पडताळणी करता येईल.

**प्रक्रिया काय असेल?-**नियोक्त्याला पडताळणीदार म्हणून नोंदणी करावी लागेल. त्यानंतर तो विद्यार्थ्याच्या एखाद्या विशिष्ट कागदपत्राच्या पडताळणीची विनंती पाठवेल. विद्यार्थ्याला याची सूचना मिळेल. तो ओटीपी किंवा ई-साइनद्वारे मंजुरी देईल. त्यानंतर नियोक्ता नोंद पाहू शकेल.

**रेकार्ड पाहता येणार नाही-**नियोक्ता सामान्य वापरकर्त्याप्रमाणे अपारचे रेकार्ड पाहू शकत नाही. विद्यार्थ्याच्या मंजुरीशिवाय प्रमाणपत्रे उघडता येणार नाहीत. विद्यार्थी पडताळणीची विनंती मंजूर किंवा नामंजूर करू शकतो.

**याचा फायदा काय होणार?-** उमेदवार आपल्या सीव्हीमध्ये नमूद केलेली पदवी आणि संस्थेचा डिजिटल रेकार्ड पाहून नियोक्ता त्यांची प्रामाणिकता तपासू शकेल. बनावट पदव्यांची समस्या दूर होईल.

**गोपनीयतेबाबत चिंता?-**तृतीय पक्षाच्या पडताळणीमध्ये डेटा सुरक्षा आणि सायबर सुरक्षा महत्त्वाची राहतील. रेकार्डची सुरक्षा सुनिश्चित झाल्यावरच ही व्यवस्था विश्वासार्ह ठरेल.

# हुथी बंडखोरांकडून एफ-15 फायटर जेट पाडल्याचा दावा

**सना/वृत्तसंस्था :** येमनमध्ये सौदी अरेबिया आणि हुथी बंडखोरांमध्ये संघर्ष सुरुच आहे. हुथी बंडखोरांनी येमनमधील मारिब प्रांतात सौदी अरेबियाचे एफ-१५ फायटर जेट पाडल्याचा दावा केला आहे. हुथी लष्करी प्रवक्त्यानुसार, सौदीकडून आक्रमक मोहिमा सुरु असताना या विमानाला लक्ष्य करण्यात आले. याव्यतिरिक्त, सौदीचे एक विंग लोंग २ सशस्त्र ड्रोन देखील पाडल्याचा दावा बंडखोरांनी केला आहे.हुथींशी संबंधित अंसार अल्लाह गटाने मारिबमधील विमान कोसळल्याच्या ठिकाणचा व्हीडीओ समोर आणला आहे. या व्हीडीओमध्ये वाळवंटात विमानाचे जळालेले अवशेष, विमानाची शेपूट आणि अरबी खुणा स्पष्ट दिसत आहेत. तसेच तिथे हुथी सैनिक उभे आहेत. बंडखोरांच्या मते, सौदी विमानांनी खमीस मुशैत आणि ताईफ हवाई तळावरून उड्डाण करून तैज, लाहिज, हज्जा, मारिब आणि सादा प्रांतांवर गेल्या आठवड्यात ४५० हून अधिक हवाई हल्ले केले होते. या हल्ल्यांमध्ये अनेक नागरिकांचा मृत्यू झाला. पाडलेल्या विमानाचा शोध घेण्यासाठी आलेल्या सौदीच्या इतर फायटर जेट्सनाही हुथी बंडखोरांनी हुसकावून लावले. सौदी अरेबिया आणि हुथींमधील हा संघर्ष मध्य पूर्वेतील संघर्षाचा भाग बनत चालला आहे. हुथींनी सौदी अरेबियाच्या येन्बू तेल बंदर आणि खामिस मुशैत इथल्या हवाई तळावर ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ले केले. मंगळवारी सौदी अरेबियाने मक्केच्या दक्षिणी भागात एक हौथी ड्रोन पाडले होते. मात्र, हुथींनी मक्केला लक्ष्य केल्याचे आरोप फेटाळून लावला.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य
मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र
विशेष सखोल पुनरीक्षण 2026
ज्यांचे मतदार यादीत नाव नाही अशांसाठी खास
आपल्याच मतदान केंद्रावर
विशेष मतदार नोंदणी शिबीरे
सप्टेंबर 2026
शनिवार 19
रविवार 20
शनिवार 26
रविवार 27




18 वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांनासुद्धा नमुना क्र. 6 (घोषणापत्रासह) भरता येईल.
आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, याची पडताळणी करता येईल.
आवश्यक ती सुधारणा/दुरुस्ती अर्ज सादर करता येतील.
नोटीस प्राप्त व्यक्ती पुरावा म्हणून कागदपत्रे सादर करू शकतील.
ऑनलाईन:
voters.eci.gov.in
ECINET मोबाईल अॅप
ऑफलाईन:
आपले जवळचे मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यालय
मतदार मदत क्र.: 1800 22 1950
Chief Electoral Officer Maharashtra
ceo_maharashtra
CEO Maharashtra
CEO_Maharashtra

# हायड्रोजन ट्रेनला प्रवासीच नाहीत

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने मोठ्या थाटात हायड्रोजन ट्रेनचे लोकार्पण केले. भारताची पहिली स्वदेशी हायड्रोजनवर चालणारी ट्रेन १७ जुलै रोजी सुरू करण्यात आली. यामुळे भारत हायड्रोजनवर चालणा-या रेल्वे वाहतूक तंत्रज्ञानावर काम करणा-या जर्मनी, जपान, चीन आणि अमेरिका यांसारख्या निवडक देशांच्या गटात सामील झाला आहे. हरियाणामधील जींद ते सोनीपत मार्गावर सुरू केलेल्या या हायड्रोजन ट्रेनची स्थिती सध्या चिंताजनक असल्याचे चित्र आहे. २६०० प्रवासी क्षमता असलेल्या या ट्रेनमध्ये केवळ ४० ते ६० प्रवासी प्रवास करत आहेत.हरियाणातील जिंद ते सोनीपत दरम्यान धावणा-या या ट्रेनमध्ये प्रवाशांची संख्या इतकी कमी आहे की, भारतीय रेल्वेला याबाबत आता विचार करावा लागत आहे. कमी प्रवासी संख्या असल्यामुळे हायड्रोजन ट्रेन विस्ताराची योजना आखण्यात आली आहे. भारतीय रेल्वे प्रवाशांची संख्या वाढवण्यासाठी हायड्रोजन ट्रेन दिल्लीत आणण्याची तयारी करत आहे. परंतु, यासाठी काही तांत्रिक आणि ऑपरेशनल आव्हाने रेल्वेसमोर



असल्याचे म्हटले जात आहे.

**उपाययोजनांवर तज्ज्ञांचे पथक-**एका वरिष्ठ रेल्वे अधिका-याच्या म्हणण्यानुसार, उत्तर रेल्वे गेल्या दोन महिन्यांपासून ही ट्रेन यशस्वीपणे चालवत आहे. आता, ही सेवा दिल्लीच्या आझादपूर स्टेशनपर्यंत वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर तज्ज्ञांचे एक पथक काम करत आहे. दिल्लीपर्यंतच्या विस्तारासाठी तज्ज्ञांचा एक गट ट्रेनच्या कामकाजावर आणि चाचणी फे-यांवर नियमितपणे देखरेख ठेवत आहे. हे नवीन तंत्रज्ञान आहे, त्यामुळे प्रवाशांची सुरक्षा सर्वोच्च प्राधान्याची आहे. सर्व बाबींचा विचार करूनच विस्ताराचा निर्णय घेतला जाईल असे अधिका-यांचे मत आहे.

**दोन फे-यांऐवजी एकच फेरी-**हायड्रोजन ट्रेन सध्या ८९ किलोमीटर लांबीच्या जींद-सोनीपत मार्गावर धावत आहे. अधिका-यांच्या मते, २,६०० प्रवाशांची क्षमता असलेल्या या ट्रेनमध्ये जींद ते सोनीपत या संपूर्ण प्रवासात साधारणपणे फक्त ४० ते ६० प्रवासी प्रवास करतात. सुरु वातीला, जींद आणि सोनीपत दरम्यान दररोज दोन फे-या चालवण्याची योजना होती. कमी प्रवासी संख्येमुळे हायड्रोजन ट्रेनची दररोज फक्त एकच फेरी होते. उत्तर रेल्वे गेल्या दोन महिन्यांपासून ही ट्रेन चालवत आहे. ट्रेनच्या कामकाजावर आणि नवीन तंत्रज्ञानावर देखरेख ठेवण्यासाठी तज्ज्ञांचे एक पथकही सातत्याने काम करत आहे.

# उद्धव ठाकरेंनी डायलॉगबाजी करू नये-शिरसाठ

**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव ठाकरे यांना प्रशासनाबद्दल काहीही माहिती नाही. काही गोष्टींच्या विशिष्ट गाईडलाईन्स ठरलेल्या असतात. सत्तेत असताना जे काही देउ शकले नाहीत, ते आता केवळ बोंबलण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी उगाच डायल?गबाजी करू नये असे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, पाउस न झाल्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असून दुबार पेरणीचाही फायदा होणार नाही, असे वातावरण आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये आढावा बैठक घेतली आहे. राज्य सरकार मदत जाहीर करू शकते; पण केंद्र सरकारकडून भरीव मदत आली तरच शेतक-यांना मोठा दिलासा मिळू शकतो. केंद्र सरकारची मदत घेण्यासाठी ठराविक तारखा आणि प्रक्रियेचे पालन करावे लागते. सरकार या विषयाकडे अत्यंत गांभीर्याने पाहत आहे.

**दिशा सालियान प्रकरणावर भाष्य**

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, दिशा सालियान प्रकरणात ठाकरेंचा संबंध आहे की नाही यावर आम्ही बोलत नाही. हायकोर्टाने सीबीआय चौकशीचे निर्देश दिले आहेत आणि दिशा सालियान यांच्या वडिलांच्या जबाबात नाव आहे. आदित्य ठाकरे निर्दोष असतील तर ते या प्रकरणातून सुटतील. आम्ही कोणालाही मुद्दाम त्रास देत नाही. तसेच संजय राउत यांच्या वक्तव्यांमुळे कदाचित आदित्य ठाकरे अधिक अडचणीत येउ शकतात, असा टोलाही त्यांनी लगावला.

छत्रपती संभाजीनगरमधील कन्नड आणि सिल्लोड परिसरात झालेल्या मुसळधार पावसात वीज पडून काही शेतमजुरांचा मृत्यू झाला. या अत्यंत गरीब कुटुंबांना १ ते २ दिवसांत तातडीने मदत पोहोचवण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांना दिले आहेत. तसेच या दुर्घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकार करणार असल्याची माहिती शिरसाट यांनी दिली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अमेरिकेला पोटशूळ

संयोजन आणि राजनीती अशा दोन्ही अंगाने भारताने यशस्वी केलेल्या 'ब्रिक्स परिषदे'चे पडसाद आता जागतिक पातळीवर उमटू लागले आहेत. रशिया, चीन, भारत, संयुक्त अरब अमिरातीसह एकत्रितपणे यशस्वी झालेल्या या परिषदेने आणि त्याच्या एकमुखी अंतिम घोषणा पत्रामुळे जगात अनेकांना पोटदुखी सुरू झाली आहे.अमेरिकेच्या संसदेत परवा संमत झालेले विधेयक हा त्या पोटदुखीचाच परिणाम आहे. रशियाशी तेलाचा व्यापार करणाऱ्या चीन आणि भारतासह अन्य काही देशांवर १०० टक्के आयात शुल्क लादण्याचे अधिकार या विधेयकाद्वारे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मिळणार आहेत. विधेयकाच्या मंजुरीचा टप्पा ऑगस्टमध्ये सुरू झाला असून त्यानंतर विविध संवैधानिक पूर्तता करत हे विधेयक आता अंतिम मंजुरीसाठी जात आहे. विधेयकाच्या मसुद्यात आधी भारताचा उल्लेख नव्हता. पण, नंतर तो विशेषत्वाने करण्यात आला आणि मगच दुसऱ्या टप्प्यात प्रतिनिधी सभेने हे विधेयक पुढे पाठवले.भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध वरवर सलोख्याचे दिसत असले, अमेरिकेच्या विविध प्रतिनिधींकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारची कितीही वाहवा होत असली, तरी दोन्ही देशांतील संबंध प्रत्यक्षात देवाण-घेवाणीच्या व्यवहारापुरतेच सुरू आहेत. त्यातही अमेरिकेकडून औदार्य शून्य आहे. त्यामुळे, भारताच्या वाणिज्य विभागाला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला अमेरिकेसोबत सतत खेचाखेच करावी लागते आहे. अमेरिकेचे प्रतिनिधी वरवर कितीही स्तुतिसुमनं उधळत असले, तरी भारताचे प्रतिनिधी त्यामुळे अजिबात विचलित होत नाहीत; किंबहुना वाटाघाटीच्या टेबलावर आपली बाजू अधिक चिकाटीने लावून धरतात, ही देशाच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. ट्रम्प आणि त्यांचे सहकारी त्यामुळेच अधिक अस्वस्थ आहेत.अमेरिकेतील काही गटांमध्ये असलेला भारतविरोध तिथल्या आत्ताच्या धोरणकर्त्यांतही पसरला आहे की काय,असा संशय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेतला प्रवेश अवघड करणे, व्हिसाची संख्या काही पटींत कमी करणे, भारतीयांना 'मिस्टर सिंग' असे संबोधून 'चालते व्हा' अशा जाहिराती देणे या आणि यांसारख्या सरकारच्या अनेक कृती हाच संदेश देत आहेत. ट्रम्प स्वतः व्यापारी असल्याने अमेरिकेच्या व्यापारी हितसंबंधांसाठी अशा काही खेळी खेळल्या जात असतील, असे गृहीत धरून त्याकडे सुरुवातीला फार गांभीर्याने पाहिले गेले नाही. पण, आता त्याचं गांभीर्य व्यवस्थित लक्षात येऊ लागले असून भारताला व्यापारी बोलण्यांमध्ये बचावात्मक पवित्रा घ्यायला लावण्याचा हेतू तर त्यात आहेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा हेतू भारताची 'महासत्ता' म्हणून आकार घेऊ लागलेल्या प्रतिमेला ठेच पोहोचवण्याचा आहे. हे प्रतिमाभंजनाचे प्रयत्न अधिक अश्लाघ्य आहेत. रशिया युक्रेन, इस्रायल - इराण आणि अशाच संघर्षरत आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत अलिप्त राहून आपले हितसंबंध सुरक्षित करतो आहे. अमेरिकेला अपेक्षित भूमिका घेण्याऐवजी भारत स्वहिताचा विचार करून आपली रणनीती ठरवतो आहे.अमेरिका, रशिया, चीन यांच्याबरोबरच या देशांचा ज्यांच्याशी संघर्ष सुरू आहे, त्यांच्याशीही भारत जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित करतो आहे, हे यातल्या कोणालाच सहन होणार नाही. अमेरिकेला हा आपल्या वर्चस्ववादाला उघडउघड शह वाटतो आहे. त्यामुळे, त्यांची तडफड जास्त होते आहे. ती सहज दिसते आहे. पण हे जाणवत असूनही भारत अमेरिकेला चिडवण्यासाठी स्वतःहून कोणतीही कृती करत नाही. आपण ज्या व्यासपीठावर असू, त्या व्यासपीठाचा रशिया चीन इराणला तसा उपयोगही करू देत नाही, हे साऱ्या जगाला दिसले आहे. भारताने अशी काहीतरी उतावळी प्रतिक्रिया द्यावी आणि त्याचा फायदा आपल्याला मिळावा, यासाठी पाकिस्तान टपून बसला आहे. पण, भारतीय नेतृत्व इतके सावध आहे, की ते जणू आत्ममग्नावस्थेत स्वतःची वाट चालते आहे. त्यामुळे, पाकिस्तानची खरी गोची झाली आहे. इस्त्रायल अमेरिका- इराण युद्धात मध्यस्थी करण्यासाठी धडपड करणारा, जगाचे लक्ष वेधण्यासाठी पुढेपुढे करणारा पाकिस्तान कोपऱ्यात ढकलला गेला आहे. नव्या जागतिक पुनर्रचनेत पाकिस्तानची कोणी दखलही घ्यायला तयार नाही, अशी स्थिती झाली आहे!भारतासारख्या महाकाय देशाला इंधनाबाबतचे आपले परावलंबित्व विसरून चालत नाही. पश्चिम आशियातल्या युद्ध परिस्थितीत सौदी अरबची १ हजार २०० किलोमीटर लांब पसरलेली पूर्व-पश्चिम तेलवाहिनी भारतासाठी खूप मदतीची ठरणार होती. पण, या तेलवाहिनीवर ड्रोन हल्ले सुरू झाल्याने सौदी अरबला रोज ४० ते ५० लाख बॅरल तेल वाहून नेणारी ही वाहिनी बंद करावी लागली. भारताला या परिस्थितीत रशियाशिवाय दुसरा स्वस्त पर्याय उपलब्ध नव्हता. संकटातही संधी शोधण्याची चाणाक्ष व्यवसाय नीती आत्मसात असलेल्या मोदी सरकारने 'रशियाला गाळीव तेल निर्यात करणारा सर्वात मोठा देश' असा दर्जा भारताला मिळवून दिला। रशियातून कच्चे तेल आणून त्यावर प्रक्रिया करून भारत रशियाच्या आयातीच्या ७० ते ९४ टक्क्यांपर्यंत तेल रशियाला दरमहा निर्यात करतो आहे. हा सगळा व्यापार दोन्ही देशांच्या चलनातच होत असल्याने अमेरिकेचा जळफळाट होणे साहजिक आहे.'टैरिफ शस्त्र' उभारायची भीती ते त्यासाठीच घालत आहेत. गेल्या तीन आठवड्यात दोन वेळा तास-सव्वा तास चर्चा केलेल्या मोदी आणि व्लादीमिर पुतिन या दोघांनाही याची कल्पना नसेल, असे कोण म्हणेल?

## 'दिमागी नक्षल'ची व्याख्या काय?



**पंतप्रधानांनी निवडणूक प्रचार सभेत नव्हे तर अधिकृत राष्ट्रीय कार्यक्रमात देखील 'दिमागी नक्षल' असा शब्दप्रयोग केलेला आहे. तसाच शब्दप्रयोग मुख्यमंत्र्यांनी देखील अनेकदा केला. त्या शब्दप्रयोगामागील संदर्भावरून असेच दिसून येते की दिमागी नक्षल असणे हा एक गुन्हा आहे, असे पंतप्रधानांना व मुख्यमंत्र्यांना म्हणावयाचे आहे.**

रोजच्या बोलण्यात आपण सर्व-सामान्य माणस जे शब्द वापरतो, ते थोडे ढिले-ढाले, सैल, स्वैर व अस्ताव्यस्त असू शकतात. आपण वापरलेल्या सर्वच शब्दांचा नेमका अर्थ आपल्यालाच माहित नसतो. पण अर्थाच्या अश्या अज्ञानामुळे आपले फारसे बिघडतही नाही. मात्र देशाचे पंतप्रधान किंवा राज्याचे मुख्यमंत्री जेव्हा एखादा शब्दप्रयोग करतात, तेव्हा त्यांना त्या शब्दाचा नेमका अर्थ माहित असणे अपेक्षित असते. आपल्या पंतप्रधानांनी निवडणूक प्रचार सभेत नव्हे तर अधिकृत राष्ट्रीय कार्यक्रमात देखील 'दिमागी नक्षल' असा शब्दप्रयोग केलेला आहे. तसाच शब्दप्रयोग मुख्यमंत्र्यांनी देखील अनेकदा केला. त्या शब्दप्रयोगामागील संदर्भावरून असेच दिसून येते की दिमागी नक्षल असणे हा एक गुन्हा आहे, असे पंतप्रधानांना व मुख्यमंत्र्यांना म्हणावयाचे आहे.

जर खुद्द पंतप्रधान व मुख्यमंत्री 'दिमागी नक्षल' असणे हा गुन्हा मानत असतील तर नक्कीच देशाच्या अथवा राज्याच्या कोणत्यातरी कायद्यात 'दिमागी नक्षल' या शब्द प्रयोगाची नेमकी व्याख्या केली असणार आणि दिमागी नक्षलांना शिक्षेची तरतूदही असणार, असे समजून मी शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु मला तरी केंद्र अथवा राज्य स्तरावरील कोणत्याही कायद्यात तशी व्याख्या अथवा शिक्षेची तरतूद आढळली नाही. अगदी भारतीय न्याय संहितेत (म्हणजे आपल्या अडाणी भाषेत आयपीसी मध्ये) सुद्धा दिमागी नक्षल हे शब्द आढळत नाहीत. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री उथळपणे बोलतात असे एक सामान्य नागरिक म्हणून मी म्हणू शकत नाही. कदाचित त्या शब्दप्रयोगाची व्याख्या, व्याप्ती, शिक्षेची तरतूद,इत्यादी कवेत घेणारा एखादा नवीन कायदा संसद अथवा राज्य विधीमंडळ यांच्या समक्ष विचाराधीन असावा.

पंतप्रधानांना व मुख्यमंत्र्यांना रोज पडणारे खून, दरोडे, चोऱ्या-माऱ्या, आर्थिक घोटाळे, काळा पैसा लोकप्रतिनिधींचा घोडेबाजार इत्यादी अपराधांपेक्षा दिमागी नक्षल असणे हा अपराध फारच गंभीर वाटत असावा. म्हणूनच पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून त्या विषयी चिंता जाहीर केली. नवीन कायदा झाल्याशिवाय अशा अपराधी दिमागी नक्षलांना अटक करून शिक्षा ठोठावणे शक्य होणार नाही. म्हणून प्रस्तावित नवीन कायद्याचे प्रारूप तयार करताना संसदेने व राज्य विधी मंडळाने खालील मुद्यांची गंभीर दखल घ्यावी, अशी माझी इच्छा आहे.

**कायद्याचे ध्येय व उद्दिष्ट:-** लाखो वर्षांपासून आपल्या भारतवर्षात ऋषी संस्कृती, नागर संस्कृती, कृषी संस्कृती व वनवासी संस्कृती नांदत आहेत.ऋषी संस्कृतीने सर्वप्रथम नागर संस्कृतीला आपलेसे करून घेतले व नगरांमधील राजे, सरदार,पुरोहित,व्यापारी, इत्यादी महाजनांच्या मुलांना ऋषींच्या आश्रमात प्रशिक्षण देण्यात आले. गर्भसंस्कारापासून अंत्यसंस्कारापर्यंत करावयाच्या सर्व विधींचे, शस्त्रास्त्रांचे, व्यापार कौशल्याचे वगैरे शिक्षण ही मुले गुरुकुलातून प्राप्त करत होती.त्यानंतर ऋषी संस्कृतीने कृषी संस्कृतीला देखील आपलेसे करून घेतले व तसे करताना कृषी संस्कृती मधील लक्षावधी देवदेवतांचा स्वीकार करून ऋषी संस्कृतीने त्या देवदेवतांच्या पूजनासाठी प्रशिक्षित केलेला पुरोहित वर्ग नेमला. वनवासी संस्कृतीने मात्र ऋषी संस्कृती पासून प्रदीर्घ काळ फारकतच घेतली होती.त्यांना आपलेसे करण्यासाठी, त्यांचे कल्याण करण्यासाठी प्राचीन काळी देखील ऋषी मुनी हे वनात जाऊन यज्ञयाग करायचे.परंतु अज्ञानी वनवासी त्यांच्या यज्ञात वारंवार विघ्न आणायचे. म्हणून राजपुत्रांच्या मदतीने ऋषींना अश्या वनवासी अज्ञजनांचा संहार घडवून आणावा लागे. तथापि वनवासी संकृतीला आपलेसे करण्याच्या प्रयत्नांना मागील काही वर्षांपासून मात्र सुयश लाभत आहे. नागर संस्कृती विरुद्ध वनवासी जनांना भडकविण्याचे व राज्याविरुद्ध एकप्रकारे युद्ध चालविणारे लोक हे 'नक्षलवादी' नावाने ओळखले जातात. परंतु या सर्व नक्षल्यांचा आता पूर्ण बिमोड झाला असून त्यातील बहुतेकांना यमसदनी पाठविण्यात आले आहे व उरलेले शरण आले आहेत. अशाप्रकारे 'कृतिशील नक्षली' आता संपुष्टात आले असून उरलेल्यांना 'दिमागी नक्षल' म्हणता येईल. अशा या दिमागी नक्षल्यांनी पुन्हा नागर भागात कृतीशील नक्षली नव्याने निर्माण करू नयेत, या साठी कठोर कायदा आवश्यक आहे.

**व्याख्या:-**

**दिमागी नक्षल :- खालील प्रकारच्या व्यक्तींना दिमागी नक्षल मानण्यात येईल.**

वनवासी बांधवांना जो कोणी 'आदिवासी' असे मनात अथवा जाहीरपणे संबोधत असेल.हे राष्ट्र खऱ्या अर्थाने २०१४ साली स्वतंत्र झाले हे ज्याला मान्य नसेल.नेहरूंनी देशाचे काही भले केले अशी ज्याची विचारसरणी असेल.कृतीशील नक्षल्यांचा बिमोड झाला असला तरी वनवासी बंधूंनी वनातच राहून वनजमिनींवर व वनउपजावर हक्क सांगावा अशी ज्याची धारणा असेल.वनजमिनींच्या गर्भात असलेली मौल्यवान खनिजसंपत्ती नागर संस्कृतीच्या अधिक विकासासाठी वापरण्यास जो जो अडथळा करेल. वनवासी बांधवांना संकृतीच्या मुख्य प्रवाहात म्हणजे ऋषी-नागर संस्कृतीत सामावून घेण्याच्या प्रयत्नात जो खोडा घालेल. अशी प्रत्येक व्यक्ती दिमागी नक्षल असल्याचे मानण्यात येईल.

**शिक्षा** :-सक्षम न्यायपीठासमक्ष अपराध सिद्ध झाल्यास दिमागी नक्षल्यांना पुढीलप्रमाणे शास्ती ठोठावण्यात येईल.

अपराध्याची रवानगी पाकिस्तानात करण्यात येईल; किंवा अपराध्याचा दिमाग स्वस्थ होई पर्यंत त्याला शासननियुक्त मानस कारागृहात बंदिस्त ठेवण्यात येईल; किंवा दिमागी नक्षल हा कृतीशील नक्षल असल्याचे सुद्धा सिद्ध झाल्यास त्यास जन्मठेप अथवा फाशीची शिक्षा देण्यात येईल.

**फोरम** :-दिमागी नक्षल आरोप्यांचे खटले तीन सदस्यीय न्यायपीठापुढे चालविण्यात येतील. पैकी एक सदस्य मातृसंस्थेने नेमलेला, दुसरा सदस्य सत्ताधारी पक्षाने नेमलेला व तिसरा आज्ञाधारक शासकीय अधिकारी असेल. बहुमताचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**-किशोर देशपांडे**

## ट्रम्प आणि हुकुमशाही

अमेरिकेच्या केंद्रीय बँकेने काल व्याजदर ३.७५ टक्के वरून ४ टक्के पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचे अमेरिकेच्या, जगाच्या आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांची चर्चा होत आहे. ट्रम्प आणि हुकुमशाही पद्धतीने राज्यकारभार करणारे, प्रचंड इगो असणारे देशप्रमुख नेहमीच आपल्याला व्यक्तिगत रित्या शरणागत असणारे सहकारी निवडतात. मंत्री, नोकरशहा, किंवा नियामक मंडळाचे अध्यक्ष वगैरे. जे हुकुमशहाच्या मनातील ओळखून त्याला हवे तसेच निर्णय घेतील.

अमेरिकन फेडचे या आधीचे अध्यक्ष होते जेरेमी पॉवेल. त्यांना देखील ट्रम्प यांनीच आधीच्या कार्यकाळात नेमले होते. पण ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर पॉवेल आणि ट्रम्प यांचे टोकाचे मतभेद समोर आले. ट्रम्प यांनी पॉवेल यांचा अनेक वेळा जाहीर पाणउतारा केला. पण पॉवेल यांनी ट्रम्प यांच्या दडपणाखाली निर्णय घ्यायला नकार दिला. ते मे २०२६ मध्ये निवृत्त झाले. त्यानंतर ट्रम्प यांनी त्यांच्याशी जवळ असणाऱ्या Kevin Warsh यांना फेडचे अध्यक्ष नेमले. ट्रम्प यांची अपेक्षा ही होती की केविन ट्रम्प यांना हवे तशी धोरणे ठरवतील.

उदा. नोव्हेंबर मध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांच्या आधी अमेरिकेतील व्याजदर कोणत्याही प्रकारे वाढता कामा नयेत हा ट्रम्प यांचा आग्रह होता. केविन यांनी व्याजदर वाढवण्याचा काल निर्णय घेताना राजकीय दडपण झुगारुन त्याच्यापरीने अमेरिकेन अर्थव्यवस्थेच्या जे हिताचे ते केले. मुख्य म्हणजे फेडच्या बाराच्या बारा बोर्ड सभासदांनी हा निर्णय एकमताने घेतला.

ट्रम्प यांनी फेड च्या व्याजदर वाढवण्याच्या निर्णयावर प्रचंड आगपाखड केली आहे. कारण त्यांना भीती आहे व्याजदर वाढल्यामुळे असंतोष पसरून त्याचा विपरीत परिणाम नोव्हेंबर मधील निवडणूक निकालावर होऊ शकतो.दुसरे उदाहरण. अगदी दोनतीन दिवसापूर्वी अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने ट्रम्प यांच्या पोस्टल मतदानाविषयी निर्णयाला घटना विरोधी म्हणून फेटाळून लावले आहे.

तिसरे उदाहरण. त्याआधी काही महिन्यापूर्वी याच सुप्रीम कोर्टाने ट्रम्प यांच्या एका वर्ष पूर्वीच्या आयात कर निर्णयाला घटनाविरोधी म्हणून रद्द केले होते.अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टातील नऊ पैकी सहा न्यायाधीश रिपब्लिकन पक्षाची conservative विचारसरणी मानणारे आहेत असे मानले जाते. त्यातील तीन तर ट्रम्प यांनी हँडपिक करून नेमलेले आहेत. सुप्रीम कोर्टातील या न्यायाधीशांनी वरील निर्णय घेताना कोणताही मिंधेपणा किंवा लाळघोटेपणा केला नाही.

**-संजीव चांदोरकर**

## UPI सत्यता तपासणी

NPCI तोट्यात नाही.FY२०२५-२६ मध्ये NPCI चे operating revenue सुमारे ३,९६८.९५ कोटी झाले, तर net surplu सुमारे १,३६१.७७ कोटी होता. Net surplus मागील वर्षापेक्षा १२.२३ कमी झाला, पण संस्था loss-making झाली नाही.

त्यामुळे 'NPCI तोट्यात आहे म्हणून UPI वर MDR लावणे भाग पडले' हा दावा आकडेवारीतून सिद्ध होत नाही. ही not-for-profit कंपनी आहे. या surplu मधून तंत्रज्ञानाचा विकास आणि सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करता येऊ शकते.

सुमारे ९६% P२M (Person-to-Merchant) UPI व्यवहार MDR च्या कक्षेबाहेर राहतील, कारण ?२,००० पर्यंतचे व्यवहार आणि काही लहान व्यापाऱ्यांचे व्यवहार zero-MDR राहतील. P2P (Person-to-Person) व्यवहारही free राहतील.

पण २,००० पेक्षा जास्त व्यवहारांचा आर्थिक वाटा मोठा आहे. Grant Thornton Bharat च्या विश्लेषणानुसार, हे व्यवहार P2M transaction volume मध्ये सुमारे ४%, पण P2M transaction value मध्ये जवळपास ६६% आहेत.

FY२०२५-२६ मध्ये UPI वर सुमारे ३१४.२३ लाख कोटींचे व्यवहार झाले आणि सुमारे २४,१६२ कोटी transactions झाले.

अमेरिकेचा UPI संदर्भातील आक्षेप मात्र वास्तविक आहे. USTR च्या २०२६ National Trade Estimate Report मध्ये भारताच्या electronic-payment policie मुळे omestic suppliers ना फायदा आणि U.S. payment companies ना level playing field मिळत नसल्याची चिंता व्यक्त केली आहे.

USTR ने UPI/RuPay संदर्भात आक्षेप घेतले आहेत, हे तथ्य आहे.

UST च्या मते, २०२५ च्या अखेरीस दोन U.S.-owned payment-app suppliers मिळून ८०% पेक्षा जास्त UPI transactions proce करत होते.

PhonePe आणि Google Pay यांचा मिळून UPI transaction volume मध्ये मे २०२६ मध्ये सुमारे ७९.५%, तर transaction value मध्ये ८२.७% हिस्सा होता.

त्यामुळे '८०% UPI transactions Google Pay आणि PhonePe करतात' हा broadly correct दावा आहे. दोन्ही U.S.-owned payment platforms आहेत.

त्यामुळे UPI साठी तंत्रज्ञान पुरवून आणि ३१४.२३ लाख कोटींचे व्यवहार होऊनही फारसा नफा होत नाही. PhonePe तोट्यात आहे आणि Google Pay FY२०२५ मध्ये फक्त ५० कोटी नफ्यात होते. त्यामुळे अमेरिकेचा दबाव नाही, हा तर्क काहीसा मागे पडतो. हा दबाव official नसला तरी अनेक मार्गांनी येत असण्याची शक्यता आहे.

२,००० च्या वरच्या व्यवहारांमध्ये ६६% पैसे UPI मधून वळत असतील, तर ०.४% charge मुळे काही व्यवहारांवर परिणाम होऊ शकतो. कारण व्यापाऱ्यांचे profit margins साधारणपणे २ ते ५ टक्क्यांच्या आसपास असतात. विशेषतः retail मध्ये सरासरी margin २% गृहीत धरल्यास, त्यांना त्यांच्या नफ्याच्या २०% इतकी रक्कम UPI charges साठी द्यावी लागू शकते. त्यामुळे काही व्यापारी रोख किंवा चेकने व्यवहार करण्यास प्राधान्य देऊ शकतात.

शेवटी, झटपट आणि सुलभ व्यवहारांसाठी हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले. जसे card payments वर व्यापारी MDR भरतो आणि त्याचा काही भाग ग्राहकांकडून किंमत वाढवून वसूल होऊ शकतो, अगदी तसेच UPI बाबतीतही होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे इतक्या चांगल्या तंत्रज्ञानावर अनावश्यक आर्थिक बोजा पडण्याची शक्यता आहे.

## गणेशोत्सवाचे पावित्र्य आणि मांगल्य टिकवा

लोकमान्य टिळकांनी समाजप्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची पायाभरणी केली होती. जातीभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, हा त्यामागील मूळ उद्देश होता. मात्र काळाच्या ओघात हा उत्सव भक्तीपेक्षा दिखावा आणि शक्तीप्रदर्शनाचा विषय बनत चालला आहे.वर्गणीसाठी होणारी जबरदस्ती, प्रचंड खर्च करून उभारले जाणारे भव्य मंडप सामान्य नागरिकांना नकोसे वाटतात. ज्या सात्विक आणि मंगलमूर्तीची आपण पूजा करतो, त्या आराध्य देवतेची प्रतिष्ठा राखण्याऐवजी काही ठिकाणी विद्रूप पद्धतीने मूर्ती बसवल्या जातात. 'गणपती माझा मित्र आहे' यांसारख्या चुकीच्या संकल्पना रुजवून लहान मुलांवर चुकीचे संस्कार केले जात आहेत.हाय-व्हॉल्यूम डीजेचा कर्णकर्कश आवाज, ध्वनी व वायू प्रदूषण आणि बेसुमार व्यापारीकरणामुळे ज्येष्ठ, बालके आणि रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागतो. भक्ती आणि संस्कृतीचा मार्ग सोडून ही परंपरा स्पर्धात्मक बनली आहे.जर हाच ट्रेंड राहिला तर परंपरेचे पावित्र्य नष्ट होईल.

**प्रिया बागडदेव**

## कृत्रिम हौदांत विसर्जित केलेल्या मूर्त्यांचे काय?

गेल्या वर्षी ठाणे जिल्ह्यातील डायघर येथील डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ गणेशमूर्ती ठेवल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला होता. ग्रामस्थांनी दीडशेपेक्षा जास्त डंपर मूर्त्यांसह परत न्यायला भाग पाडले होते. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तसेच काही ठिकाणी विसर्जित मूर्त्या खाणी बुजवण्यासाठी आणि विटा बनवण्यासाठी वापरण्यात आल्याचे उघड झाले होते.घरी मनोभावे पूजन केलेल्या गणेशमूर्त्यांचा अशा प्रकारे वापर होणे भक्तांसाठी वेदनादायी आहे. त्यामुळे भक्तांच्या श्रद्धेचा मान ठेवून प्रत्येक कृत्रिम तलावात विसर्जित केलेल्या मूर्त्यांच्या अवशेषांचे आणि मातीचे पुढे काय केले, हे प्रशासनाने पुराव्यासह दाखवून द्यायला हवे.

**मोक्षदा घाणेकर**

## गणेशाला दुर्वा का अर्पण करतात

श्री गणेशाला पारंपरिकरीत्या दुर्वा का अर्पण केल्या जातात? ही केवळ अनेक वर्षांपासून चालत आलेली प्रथा आहे की यामागे काही अध्यात्मशास्त्रीय कारण आहे? अध्यात्मशास्त्रानुसार विशिष्ट देवतेला विशिष्ट फुले, पत्री आणि दुर्वा अर्पण केल्या जातात, कारण त्यांच्यामध्ये त्या देवतेचे तत्त्व आकृष्ट आणि प्रक्षेपित करण्याची क्षमता अधिक असते.

गोव्यातील 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या' संशोधकांनी 'पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी ' या तंत्रज्ञानाचा वापर करून याचा अभ्यास केला. हे एक विशेष व्हिडिओ-इमेजिंग तंत्रज्ञान असून ते वस्तू किंवा व्यक्तीभोवतीचे अदृश्य प्रभामंडळ टिपून त्याचे दृश्य रंगांमध्ये रूपांतर करते.या प्रयोगात श्री गणेशाच्या चित्रासमोर तुळस आणि दुर्वा ठेवून होणाऱ्या परिणामांची तुलना करण्यात आली. कोणतीही वस्तू ठेवण्यापूर्वी चित्राच्या सभोवतालच्या वातावरणाचे इफ्ड्ढ द्वारे मूलभूत रीडिंग घेण्यात आले. त्यानंतर तुळस ठेवून आणि नंतर दुर्वा ठेवून पुन्हा रीडिंग घेण्यात आले.

तुळस ठेवल्यावर सकारात्मक ऊर्जेमध्ये अल्प प्रमाणात घट झाली, तर दुर्वा ठेवल्यावर सकारात्मक ऊर्जेच्या रीडिंगमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले.संशोधकांच्या मते, वनस्पतींमधील विशिष्ट घटक ठराविक देवतेची स्पंदने आकृष्ट करतात. दुर्वा या एका नैसर्गिक 'अँटेना'सारखे कार्य करतात, ज्या श्री गणेशतत्त्व आकृष्ट करून ते वातावरणात प्रक्षेपित करण्यासाठी विशेष पूरक असतात. त्यामुळे भावपूर्णरीत्या दुर्वा अर्पण केल्याने गणेशतत्त्व जास्तीत जास्त ग्रहण करण्यासाठी पूरक वातावरण निर्माण होते.

**मधुरा धनंजय कर्वे**

शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# सर्पदंश टाळा, अंधश्रद्धेच्या उपचारांना थारा नको!

## यवतमाळ जिल्ह्यात १९ सप्टेंबरला आंतरराष्ट्रीय सर्पदंश जनजागृती दिन, तातडीच्या उपचारा बाबत आरोग्य विभागाचा जागर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** सर्पदंशाच्या घटनेनंतर अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या प्रथमोपचारामध्ये वेळ वाया गेल्याने अनेकदा रुग्णाचा जीव धोक्यात येतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी नागरिकांमध्ये सर्पदंश प्रतिबंध, योग्य प्रथमोपचार आणि तातडीच्या वैद्यकीय उपचाराबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने १९ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय सर्पदंश जनजागृती दिन साजरा करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद यवतमाळच्या आरोग्य विभागामार्फत आकाशवाणी, दूरदर्शन, शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि समाज माध्यमांच्या माध्यमातून विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले जाणार आहेत. यंदाच्या अभियानात 'सर्पदंश टाळा, योग्य प्रथमोपचार करा आणि विलंब न करता आरोग्य संस्थेत पोहोचा' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. भारताच्या राष्ट्रीय सर्पदंश प्रतिबंध व नियंत्रण कृती आराखड्यानुसार जनजागृती, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तातडीची उपचार व्यवस्था आणि संदर्भ सेवा बळकट करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. शेतकरी, शेतमजुरांनी विशेष काळजी घ्यावी यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण व कृषी क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने शेत, गवत, लाकूड-दगडांचे ढिगारे तसेच घराभोवतालच्या परिसरात सर्पदंशाचा धोका संभवतो. रात्री बाहेर पडताना टॉर्चचा वापर करावा, बंद पादत्राणे घालावीत आणि घराचा परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. सर्पदंश झाल्यानंतर रुग्णाला स्थिर ठेवून दंश झालेल्या अवयवाची हालचाल कमी करावी आणि तातडीने जवळच्या आरोग्य संस्थेत दाखल करावे. आवश्यकतेनुसार प्रतिविष (Anti-Snake Venom - ASV) उपचार व इतर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी नागरिकांनी घरगुती किंवा पारंपरिक उपचारांमध्ये वेळ न घालवता त्वरित रुग्णालय गाठावे, असे आवाहन केले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांनीही सर्पदंश ही वैद्यकीय आणीबाणी असल्याचे सांगत चुकीच्या उपचारांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

### सर्पदंश झाल्यावर घाबरू नका!

* रुग्णाला शांत व स्थिर ठेवा; दंश झालेल्या अवयवाची हालचाल कमी करा.
* सूज येण्यापूर्वी अंगठी, बांगडी, पैंजण यांसारख्या वस्तू काढून ठेवा.
* विलंब न करता जवळच्या आरोग्य संस्थेत रुग्णाला घेऊन जा.
* दंशाच्या ठिकाणी कापू नका, विष शोषू नका आणि घट्ट दोरी किंवा पट्टा बांधू नका.
* जखमेवर रासायनिक पदार्थ अथवा पारंपरिक औषधे लावू नका.
* वेळेवर मिळणारे योग्य वैद्यकीय उपचारच जीव वाचविण्यासाठी निर्णायक ठरू शकतात.

# अवैध धंदे बंद करा, तरच शांतता नांदेल!

## शांतता समितीच्या बैठकीत जगदीश नरवाडेंचा पोलिस प्रशासनाला सवाल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. १८ :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीच्या बैठका घेण्याची औपचारिकता नको, आधी तालुक्यातील अवैध धंदे बंद करा, अशी आक्रमक मागणी जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी केली. गणेश विसर्जन शांततेत पार पाडण्यासाठी महागाव पोलिस ठाण्यात ठाणेदार सेवानंद वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

यावेळी नरवाडे यांनी महागाव बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीमुळे विद्यार्थिनी व महिलांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा उपस्थित केला. प्रवासी वाहनांसाठी बसस्थानकापासून ठराविक अंतर निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच तालुक्यातील अवैध दारूविक्रीमुळे कुटुंबांचे नुकसान होत असून, अल्पवयीन मुले व्यसनाच्या आहारी जात असल्याचा आरोप केला. रेती तस्करीतून होणाऱ्या हल्ल्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले. बैठकीला नगरसेवक, पदाधिकारी व ३० गणेश मंडळांचे सदस्य उपस्थित होते.

## थोडक्यात




### गुरुकुलच्या मुलींची कबड्डीत बाजी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी दिमाखदार पात्रता!

**झरी :** मुकुटबन येथील गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलींच्या कबड्डी संघाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या विजयाच्या जोरावर संघाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी दिमाखदार पात्रता मिळविली असून, खेळाडूंच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्पर्धेदरम्यान गुरुकुलच्या खेळाडूंनी कौशल्यपूर्ण खेळ, जिद्द आणि सांघिक भावनेचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. नियमित सराव, शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या यशामागे क्रीडा शिक्षक निब्रड सर व सिद्धार्थ सर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. आता जिल्हास्तरीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धार खेळाडूंनी व्यक्त केला आहे. विजेत्या संघाचे शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक विलास चिट्टलवार, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन करण्यात आले. आगामी स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.

### ई केवायसी अपूर्ण तर एलपीजी सिलेंडर महागणार..!

**ग्राहकांना तातडीने प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन**

**पांढरकवडा :** घरगुती एलपीजी सिलेंडरच्या दराबाबत दुहेरी मूल्य निर्धारण प्रणाली लागू होण्याची शक्यता असल्याने ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पुढील ७ ते १० दिवसांत याबाबत अंमलबजावणी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. eKYC अपूर्ण असलेल्या गैर-उज्ज्वला ग्राहकांना बाजार निर्धारित दराने (MDP) सिलेंडर घ्यावा लागू शकतो. तर eKYC पूर्ण असलेल्या ग्राहकांना सध्याच्या नियमनाधीन किरकोळ दराचा (RSP) लाभ मिळत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता eKYC पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन प्रेरणा गॅस एजन्सीने केले आहे. eKYC प्रक्रिया IVRS, IndianOil ONE ॲप किंवा CX पोर्टलद्वारे करता येणार आहे.



शौर्य शशिकांत डाखोरे



सार्थक दामोदर कोकरे



आचल पंजाब राठोड

### मातोश्री विद्यालयातील तीन खेळाडूची तायक्वांदो स्पर्धेत निवड

**पुसद:** क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा नुकत्याच दिनांक १६ व १७ सप्टेंबर,२०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, यवतमाळ येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत मातोश्री विद्यालय श्रीरामपूरच्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवत घवघवीत यश संपादन केले. वयोगट १४ वजनगट ३० मध्ये शौर्य शशिकांत डाखोरे, वयोगट १७ मधील वजनगट ३८ मध्ये आचल पंजाब राठोड आणि ५१ किलो वजनीगटांमध्ये सार्थक दामोदर कोकरे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्याने त्याची विभागस्तरीय तायक्वांदो स्पर्धे करता निवड झाली आहे. पालकवर्ग आणि सर्व स्तरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत असून संस्थाध्यक्ष दिगांबर जगताप यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शन शिक्षकांचे कौतुक केले आहे.

### पुसदच्या माळ पठारासाठी शाश्वत पाणीपुरवठ्याचा आराखडा..!

**पुसद :** पुसद तालुक्यातील माळ पठारावर कमी पावसामुळे खरीप पिके उद्ध्वस्त होऊन शेतकरी संकटात सापडले असताना आता पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरही प्रशासनाची धावपळ सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांबाबत महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले. सिंगरवाडी, उडदी, औसापूर, पांढुर्णा, ब्राह्मणगाव, शांमपूर, वडगाव आदी गावांचा एकत्रित विचार करून एक किंवा दोन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचा तांत्रिक अभ्यास करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच ब्राह्मणगावसह १३ गावांसाठी पुस प्रकल्पातील जलसाठ्याचा उपयोग करून शाश्वत पाणीपुरवठा करता येईल का, याची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले.गावांचे अंतर, भौगोलिक स्थिती, उंचसखल प्रदेश, पाइपलाइन, उपलब्ध जलसाठा आणि भविष्यातील लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन तातडीने अहवाल सादर करण्यास प्रशासनाला सांगण्यात आले. बैठकीला राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# कुख्यात दुचाकी चोर गजाआड तब्बल १४ दुचाकी जप्त!

## यवतमाळ शहर पोलिसांची मोठी कामगिरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** स्थानिक शासकीय रुग्णालयाच्या परिसरातून दुचाकी लंपास करणाऱ्या आंतरजिल्हा दुचाकी चोराला यवतमाळ शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने जेरबंद केले आहे. त्याच्या ताब्यातून तब्बल १४ हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल असा एकूण २ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

लोहारा येथील गणेश वसंतराव चरडे हे १७ सप्टेंबर रोजी पत्नीच्या उपचारासाठी शासकीय रुग्णालयात आले असता, ओपीडीसमोरून त्यांची दुचाकी (MH २९ J १९५७) चोरीला गेली होती. या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ठाणेदार नीलेश सुरडकर यांच्या सूचनेनुसार डी.बी. पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. संशयित आरोपी बाभूळगाव मार्गे गेल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी येरंडगाव (ता. बाभूळगाव) येथे सापळा रचून वृषभ शंकर टेकाम (वय ३६) याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने केवळ 'हिरो होंडा स्प्लेंडर' गाड्यांनाच लक्ष्य करत असल्याचे कबूल केले. त्याने यवतमाळमधील २ आणि वर्धा जिल्ह्यातील ५ गुन्ह्यांसह एकूण १४ दुचाकी चोरल्याची कबुली दिली. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, एसडीपीओ अमोल कोळी व पोलीस निरीक्षक नीलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिलिंद पारडकर, पोउपनि गणेश सपकाळ व डी.बी. पथकाने केली. या कारवाईमुळे वाहनचोरीचे अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत.

# केंद्रप्रमुख व अंगणवाडी पर्यवेक्षिकांची बैठक..!

## शाळा-अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्य तपासणीचे सूक्ष्म नियोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. १८ :** बाभूळगाव तालुक्यातील शाळा व अंगणवाड्यांमधील एकही बालक आरोग्य तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी शिक्षण, आरोग्य आणि बालविकास विभागाने समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या (RBSK) प्रभावी अंमलबजावणीसाठी गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी पंचायत समिती सभागृहात केंद्रप्रमुख व अंगणवाडी पर्यवेक्षिकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत बालकांच्या आरोग्य तपासणीचे नियोजन करण्यात आले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांमधील जन्मजात व्यंग, आजार, पोषणातील कमतरता आणि वाढीतील विलंब (४ डी) यांचे वेळेत निदान करून आवश्यक उपचार मोफत उपलब्ध करून दिले जातात. या योजनेचा लाभ तालुक्यातील प्रत्येक गरजू बालकापर्यंत पोहोचविण्यासाठी तपासणी मोहिमेला अधिक प्रभावी करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. तालुक्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची RBSK पथकाद्वारे नियोजित वेळेत सविस्तर आरोग्य तपासणी करण्यासाठी आराखडा तयार करण्याबाबत चर्चा झाली. तसेच, अंगणवाडीतील लहान बालकांमधील कुपोषण, आजार आणि आरोग्यविषयक समस्यांचे वेळेत निदान व्हावे, यासाठी विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. शिक्षण विभाग, आरोग्य विभाग आणि बालविकास विभागाने सूक्ष्म नियोजन करून तपासणीची अंमलबजावणी करावी. कोणतेही बालक तपासणीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांनी दिले. बैठकीला सहायक गटविकास अधिकारी हेमंत निवल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. लीना मुसळे, RBSK पथकाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. झुबेर मणियार व डॉ. वृषाली कुमरे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्पित भगत, डॉ. गोपाल गायकवाड, डॉ. मारोती बोंबले व डॉ. वंशिता नागरगोजे उपस्थित होते. गटशिक्षण अधिकारी राजू मडावी, बालविकास प्रकल्प अधिकारी सचिन पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी गणेश मैघणे, आरोग्य विस्तार अधिकारी प्रशांत पाटील व सचिन पांढरमिसे, आरोग्य निरीक्षक योगेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतात गेल्याची संधी साधत घरफोडी, सोन्याचे दागिने व रोकड लंपास!

## शेतकऱ्याच्या घराला चोरट्यांचा डल्ला, ५५ हजार रुपयांच्या ऐवजांची चोरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. १८ :** शेतात पिकांवर फवारणी करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ५५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घाटंजी तालुक्यातील केळापूर तांडा येथे घडली. या प्रकरणी पारवा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार, दशरथ रामजी जाधव (वय ६०, रा. केळापूर तांडा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ) हे शेती व्यवसाय करतात. १७ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ८.०० वाजता ते पत्नीसमवेत शेतात गेले होते. शेतातील पिकांवर फवारणीचे काम करून ते दुपारी सुमारे ३ वाजता घरी परतले. घरी आल्यानंतर घराच्या दरवाज्याचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. त्यामुळे चोरी झाल्याचा संशय आल्याने त्यांनी घरात प्रवेश करून पाहणी केली. घरातील लोखंडी पेटीचेही कुलूप तोडण्यात आले होते. पेटीतील सोन्याचे दागिने आणि रोकड गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. फिर्यादीनुसार, चोरीस गेलेल्या ऐवजात सुमारे १० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, अंदाजे किंमत ३० हजार रुपये, ५ ग्रॅम सोन्याच्या पात्या , अंदाजे किंमत १५ हजार रुपये, तसेच १० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. घरमालक शेतात गेल्याची संधी साधून अज्ञात व्यक्तीने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि लोखंडी पेटी फोडून त्यातील ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी फिर्याद नोंदवून तपास सुरू केला आहे.या प्रकरणात भारतीय न्याय संहितेतील कलम ३०५(१) व ३३१(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे कागदपत्रात नमूद आहे. अज्ञात चोरट्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर असून आहे. सदर घटनेचा तपास पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार(ए. पी. आय. ) हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गोपाल राठोड यांच्यासह पोहेकॉ.विजय आत्राम करीत आहे.

# बोलेरो पिकअपमधून ८ गोवंशीय जनावरांची सुटका ८ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. १८ :** तालुक्यातील अडेगाव–तेजापूर मार्गावरून बोलेरो पिकअप वाहनातून गोवंशीय जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. मिळालेल्या माहितीनुसार पोलीस पथकाने सरकारी वाहन क्रमांक MH-२९-CJ-८२६८ ने घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

यावेळी TG-०८-T६८७४ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप वाहनातून एकूण ८ गोवंशीय जनावरे आढळून आली. यामध्ये ६ गायी, १ कालवड व १ गोरा यांचा समावेश आहे. जनावरांना वाहनामध्ये दाटीवाटीने बांधण्यात आले होते तसेच चारा व पाण्याची योग्य व्यवस्था नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी सदर वाहन व जनावरे ताब्यात घेऊन पंचनामा केला. जनावरांची एकूण अंदाजे किंमत ६२,००० असून बोलेरो पिकअप वाहनाची अंदाजे किंमत ८,००,००० आहे. अशा प्रकारे एकूण ८,६२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या जनावरांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली असून त्यांना योग्य देखभालीसाठी श्री गुरु गणेश गोसंरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, रासा, ता. वणी, जि. यवतमाळ येथे दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० अंतर्गत संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यवतमाळ , अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळले वणी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सतीश जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार प्रकाश गोरलेवार, बादल जाधव ,रवी इसनकर , होमगार्ड अविनाश वाघाडे,व अखेर यांनी केली.

# मद्य दुकानातुन ग्राहकांची लूट जादा वसुलीचा आरोप..!

## ग्रामीण ग्राहकांशी अरेरावी, दहा ते वीस रुपये अधिक आकारल्याच्या तक्रारी, उत्पादन शुल्क विभागाच्या चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. १८ :** राळेगाव शहरातील एकमेव विदेशी मद्यविक्री दुकानातील कथित मनमानी कारभारामुळे ग्राहकांमध्ये नाराजी पसरली आहे. निर्धारित किमतीपेक्षा जादा पैसे आकारणे, ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांशी अरेरावीची भाषा करणे आणि दमदाटीने वागणूक दिल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

त्यामुळे संबंधित उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत असून, दुकानातील व्यवहारांची तातडीने चौकशी करण्याची मागणी होत आहे. ग्राहकांच्या आरोपानुसार, दुकानातील 'राजू' नामक कर्मचारी काही ग्राहकांकडून निर्धारित दरापेक्षा दहा ते वीस रुपये अधिक घेत असल्याची चर्चा आहे. विशेषतः ग्रामीण भागातील ग्राहकांशी वेगळी वागणूक दिली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या तक्रारींची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसली तरी ग्राहकांच्या नाराजीमुळे प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे. आदिवासीबहुल राळेगाव तालुक्यातील विविध गावांमधून ग्राहक मद्यखरेदीसाठी शहरातील याच दुकानावर अवलंबून असतात. पर्यायी दुकानाचा अभाव असल्याने तक्रारी असूनही त्याच ठिकाणी खरेदी करावी लागत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. या परिस्थितीचा गैरफायदा घेतला जात असल्यास त्यावर नियंत्रण कोण ठेवणार, असा सवाल उपस्थित होत आहे. दरपत्रक, विक्री व्यवहार आणि कर्मचाऱ्यांच्या वर्तनाची तपासणी करण्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे. उत्पादन शुल्क विभागाने तक्रारींची दखल घेऊन निर्धारित दरापेक्षा जादा वसुली होते का, याची पडताळणी करावी. आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास नियमानुसार कारवाई करून ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दुष्काळी संकटाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कळंब मध्ये काँग्रेसची महाआरती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**कळंब, दि. १८ :** यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, पावसातील वाढता खंड आणि महागाईच्या झळांनी शेतकरी व सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, त्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसने आता महाआरतीचे आयोजन केले आहे.

यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी, कळंब तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २० सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता श्री चिंतामणी देवस्थान, कळंब येथे महाआरती होणार आहे. खरीप हंगामातील पिकांवर पावसाच्या खंडाचा परिणाम होत असून, शेतकऱ्यांसमोर उत्पादन, उत्पन्न आणि आगामी हंगामाची चिंता निर्माण झाली आहे. दुसरीकडे वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन खर्चावर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा, पिकांचे नुकसान, मदत व महागाईवरील उपाययोजनांसह जनतेच्या प्रश्नांवर शासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी अधोरेखित करण्यासाठी महाआरतीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. कळंब तालुक्यासह जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कळंब तालुकाध्यक्ष महादेव काळे आणि शहराध्यक्ष सोनू सिद्धकी यांनी केले आहे.

जनमाध्यम



# सिपना नदीवर कोट्यवधींचा पूल, मात्र सालई नदीच्या पुरामुळे मार्गच बंद!

## दुनीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नियोजनावर प्रश्नचिन्ह ; सालई नदीवरही मोठ्या पुलाची गरज

**मेळघाट/वार्ताहर**

धारणी-परतवाडा मुख्य मार्गावरून दुनीकडे वळणाऱ्या रस्त्यावर सालई नदीचा पूल ओलांडल्यानंतर पुढे सिपना नदीवर बांधकाम विभागाकडून सुमारे एक कोटी रुपये खर्चाचा पूल बांधण्यात आला आहे. मात्र या पुलाच्या नियोजनावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पावसाळ्यात सालई नदीला पूर आल्यास सिपना नदीवरील पुलापर्यंत पोहोचण्यापूर्वीच रस्ता बंद होतो. त्यामुळे कोट्यवधींचा खर्च करून बांधलेला हा पूल नागरिकांच्या किती उपयोगाचा ठरणार, असा सवाल उपस्थित होत आहे.धारणी-परतवाडा मुख्य रस्त्यावरून दुनी गावाकडे जाण्यासाठी हा महत्त्वाचा मार्ग आहे. या परिसरात सिपना नदी मोठी असून पावसाळ्यात तिला



मोठा पूर येतो. त्याच काळात सालई नदीलाही पूर येतो. सिपना नदीच्या पाण्यामुळे सालई नदीचे पाणी अडून राहते आणि रस्त्यावरील वाहतुकीला फटका बसतो.

**सालई नदीवर दहा फुटांपर्यंत पाणी**

पावसाळ्यात जोरदार पाऊस झाल्यानंतर सिपना नदीला पूर आल्यास परिस्थिती गंभीर होते. त्याचवेळी सालई नदीलाही पूर आल्याने सालई नदीवरील रस्त्यावर जवळपास दहा फुटांपर्यंत पाणी साचते, अशी माहिती स्थानिकांनी दिली. परिणामी दुनीकडे जाणारा रस्ता पूर्णपणे बंद होतो.विशेष म्हणजे, जेव्हा सालई नदीलाच पूर आलेला असतो, तेव्हा सिपना नदीपर्यंत वाहने आणि नागरिक पोहोचणार कसे? हा मूलभूत प्रश्न या कामाच्या नियोजनाबाबत उपस्थित होत आहे.

**जिथे पुलाची गरज होती, तिथेच दुर्लक्ष?**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, उतावली किंवा दियाला परिसरात पुलाची अत्यंत आवश्यकता असताना दुनी येथे सिपना नदीवर पूल बांधण्यात आला. त्यामुळे विकासकाम करताना संपूर्ण मार्गाचा आणि पावसाळ्यातील पूरस्थितीचा अभ्यास करण्यात आला होता का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.पूल बांधण्यापूर्वी संबंधित विभागाने सालई आणि सिपना या दोन्ही नद्यांच्या पूरस्थितीचा आणि वाहतुकीचा अभ्यास केला होता का? जर सालई नदीला पूर आल्यानंतर दुनीकडे जाणारा मार्ग बंद होत असेल, तर सिपना नदीवरील नव्या पुलाचा पावसाळ्यात प्रत्यक्ष उपयोग कितपत होणार, याचे उत्तर बांधकाम विभागाने द्यावे, अशी मागणी होत आहे.

**नवीन अधिकाऱ्यांनी स्थानिकांकडून माहिती घेण्याची गरज**

दुर्गम आदिवासी भागातील विकासकामांबाबत अधिकारी बदलत असतात. नवीन अधिकारी रुजू झाल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करण्याबरोबरच स्थानिक ग्रामस्थ, तलाठी, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांकडून भौगोलिक परिस्थिती आणि पूरस्थितीची माहिती घेणे आवश्यक आहे.स्थानिकांना दरवर्षीच्या पावसाळ्यातील परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती असते. त्यामुळे मोठ्या खर्चाची कामे मंजूर करण्यापूर्वी स्थानिकांच्या अनुभवाचा विचार केला असता तर हा प्रश्न टाळता आला असता, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**आता सालई नदीवर मोठा पूल बांधणार का?**

सिपना नदीवर पूल बांधण्यात आला असल्याने आता सालई नदीवरही पावसाळ्यातील पुराचा सामना करू शकेल असा मजबूत आणि मोठा पूल बांधण्यात यावा, अशी मागणी जोर धरत आहे. सालई नदीवरील पाणी रस्त्यावर येऊन वाहतूक बंद होत असेल, तर केवळ पुढील नदीवर पूल बांधून या मार्गाची समस्या सुटणार नाही. त्यामुळे संपूर्ण मार्गाचा एकत्रित विचार करून सालई नदीवरील पुलाचे काम तातडीने हाती घेण्याची गरज आहे.सुमारे एक कोटी रुपयांचा खर्च करून सिपना नदीवर पूल उभारण्यात आला आहे. मात्र पावसाळ्यात त्याच्याकडे जाणारा मार्गच पुरामुळे बंद होत असेल, तर या कामाच्या नियोजनाची जबाबदारी कोणाची? असा सवाल नागरिक करत आहेत. आता तरी बांधकाम विभागाने संपूर्ण मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून सालई नदीवरील पुलाच्या उंचीचा, प्रवाहाचा आणि पूरस्थितीचा अभ्यास करून मोठ्या पुलाचा प्रस्ताव तयार करावा, अशी मागणी होत आहे.



प्रदीप भुसारी धामणगाव रेल्वे



संतोष शेंडे टाकरखेडा शंभु




महेद्र न्याखोर, दाभा

## शासकीय योजनांना लोकसहभागाचे बळ हवे; नागरिकांनी व्यक्त केल्या भावना

**अमरावती/ का.प्र.**

राज्य शासनाचा मृद व जलसंधारण विभागाने माती व पाण्याच्या संवर्धनाचे विविध उपक्रम योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागही तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून कार्य करीत आहे. या सर्व उपक्रमांची माहिती मिळाल्याचे समाधान व्यक्त करून शहरातील ऐतिहासिक आझाद हिंद गणेशोत्सव मंडळात दर्शनासाठी आलेल्या नागरिकांनी व्यक्त करत शासनाच्या या स्तुत्य कार्यास जन सहभागाचेही बळ हवे, अशा उत्स्फूर्त भावना मांडल्या निमित्य होते जिल्हा माहिती कार्यालयाद्वारे बुधवार, १६ सप्टेंबर पासून सुरू करण्यात आलेल्या 'लोकसंवाद' उपक्रमाचे.





महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम शहरातील ९९ वर्षांची गौरवशाली परंपरा असणाऱ्या आझाद हिंद गणेशोत्सव मंडळापासून प्रारंभ केला.येथे गणरायांच्या दर्शनासाठी आलेल्या नागरिकांना 'लोकसंवाद' कार्यक्रमाच्या माध्यमातून मृद व जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी धनंजय रोडे यांनी विभागाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. यानंतर उपस्थित नागरिकांनी या योजनांच्या माहितीबद्दल आणि विभागाच्या कार्याबद्दल देण्यात आलेल्या माहितीसाठी समाधान व्यक्त केले. गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसोबतच माजी महापौर तथा आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाचे उपाध्यक्ष विलास इंगोले यांनीही यावेळी विचार मांडताना गणेशोत्सवात लोकांपर्यंत उपक्रमाद्वारे शासकीय योजनांची माहिती देण्याची संकल्पना कौतुकास्पद असल्याचे सांगितले. मंडळाचे सचिव दीपक कलंत्री, सदस्य सर्वश्री संजय मुचळंबे,प्रवीण चौधरी, अजय पुसतकर, राजेश ढोले यांनीही या लोकसंवाद कार्यक्रमात आपले मत व्यक्त केले.

## चंद्रशेखर देशमुख यांचे निधन



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील मांजरखेड कसबा येथील प्रतिष्ठित नागरिक तथा माजी सोसायटी अध्यक्ष चंद्रशेखरराव बापूरावजी देशमुख (वय ७७) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मांजरखेड कसबा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

चंद्रशेखरराव देशमुख हे सामाजिक कार्यात सक्रिय असलेले तसेच गावातील विविध उपक्रमांमध्ये योगदान देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. ते शिक्षक सचिन देशमुख यांचे वडील होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावकऱ्यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

## जुने संगणक साहित्य बदलण्याची मागणी

**अमरावती-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना अनेक वर्षांपूर्वी पुरविण्यात आलेले संगणक व इतर शैक्षणिक साहित्य जीर्ण झाले असून अध्यापनात अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने जुने संगणक बदलून नवीन साहित्य द्यावे, अशी मागणी केली आहे.समितीने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, १७-१८ वर्षांपूर्वी शाळांना संगणक, डॉट मॅट्रिक्स प्रिंटर, व्हाइट, स्पीकर व इतर साहित्य पुरविण्यात आले होते. दीर्घकाळ वापरामुळे हे साहित्य खराब झाले असून अनेक ठिकाणी वापरण्यायोग्य राहिलेले नाही. त्यामुळे नवीन संगणक साहित्य उपलब्ध करून देण्याचे आदेश शासनाने तातडीने द्यावेत, अशी मागणी राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केली आहे.या मागणीची प्रत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनाही पाठविण्यात आली आहे. याबाबतची माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

## अंजनगाव तालुका बुद्धिबळ स्पर्धेत सीताबाई संगई हायस्कूलचे वर्चस्व

**अंजनगाव सुर्जी-** तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत सीताबाई संगई हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले असून शाळेच्या सात खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झाली आहे.

वयोगटनिहाय निवड झालेल्या खेळाडूंमध्ये १४ वर्षे वयोगटात सम्यक जोहरापूरकर (इ. ७ वी), विघ्नेश भावे (इ.



८ वी), राम कळसकर (इ. ८ वी), १७ वर्षे वयोगटात श्रीयोग शिंगणे (इ. ९ वी) आणि १९ वर्षे वयोगटात पियुष डहाळे (इ. १० वी), देवांश येवले (इ. १० वी) व चैतन्य पाटील (इ. १२ वी) यांचा समावेश आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष विवेक संगई, सचिव प्रसाद संगई यांच्यासह संचालक मंडळाने अभिनंदन केले. प्राचार्य राकेश डोणगावकर, उपमुख्याध्यापक राजेश वैद्य, पर्यवेक्षक डॉ. निलेश डहाळे, क्रीडा शिक्षक विशाल भेलांडे, हेमंत माकोडे यांनीही कौतुक केले. विद्यार्थ्यांना पराग चवरे आणि संदीप दातीर यांचे मार्गदर्शन लाभले.

## नेरपिंगळाई येथील ऐतिहासिक गणेशोत्सव-हजारो वर्षापासूनची परंपरा

**लेहेगाव/वार्ताहर**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या पिंगळादेवी गडाच्या पायथ्याशी वसलेल्या नेरपिंगळाई गावातील गणेशोत्सवाला ऐतिहासिक वारसा आहे. धर्म आणि राजकारणाची योग्य सांगड घालणाऱ्या या गावात गणेशोत्सव दरवर्षी मोठ्या थाटात साजरा होतो. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत अच्युत महाराज यांच्यासह देशभरातील संत-महात्म्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली आहे.

श्री संत गुलाबपुरी महाराज, ज्वालागिरी महाराज, वीरशैव मठ ही नेरपिंगळाईतील धार्मिक स्थळे आहेत. वीरशैव मठावर दरवर्षी साजरा होणारा गणेशोत्सव हा पंचक्रोशीतील सर्वात मोठा उत्सव म्हणून प्रसिद्ध आहे. दहा दिवस लगतच्या सर्व गावांतील दिंड्या







या उत्सवात हजेरी लावतात. गणेश विसर्जनाचा पहिला मानही परंपरेने याच गणपतीला आहे.

इ.स. ९६३ साली या मठाची स्थापना झाली असून तेव्हापासून या मठाची गादी अखंड ब्रह्मचर्याकडे आहे. प्रारंभीच्या काळात बस्व प्रभू स्वामी या गावात आले. ते सतत रानावनात भटकत असल्याने गावकऱ्यांनी त्यांना अवलिया घोषित केले होते. मात्र स्वामींच्या आईला त्यांची चिंता वाटत होती. अनेक उपायानंतर आईने गणेशाकडे साकडे घातले की, गणेश चतुर्थीला माझा मुलगा मठात परत आल्यास मी मठात श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करेन. योगायोगाने बस्व प्रभू स्वामी गणेश चतुर्थीलाच मठात परत आले आणि आईने गणेशाची प्रतिष्ठापना केली. तेव्हापासून हा गणेशोत्सव साजरा केला जातो.

गणेश विसर्जनासाठी दिंड्यांच्या गजरात, हजारो भक्तांच्या उपस्थितीत ढोल-ताशाच्या निनादात मिरवणूक निघते. सकाळी ब्रह्ममुहूर्तावर सुरू होणारी मिरवणूक दुपारी २ ते ३ वाजताच्या सुमारास संपते.शिवयोगी गुरु गंगाधर स्वामी यांच्याबद्दलही एक आख्यायिका आहे. गंगाधर स्वामी अतिशय तेजस्वी होते. त्यांची कीर्ती दूरवर पसरली होती. त्यांच्या कीर्तीमुळे काशीचे महंत नेरपिंगळाईला त्यांच्या भेटीसाठी आले. तेव्हा गंगाधर स्वामी शेण काढत होते. महंत आल्याची सूचना मिळताच त्यांनी भावपूर्ण सत्कार केला. दोघांमध्ये बराच वेळ संभाषण झाले. काशीच्या मठाधिपतींनी गंगाधर स्वामींना आव्हान दिले की, आपण दोघांनीही हाताचा अंगठा कापायचा. ज्याच्या अंगठ्यातून दुधाची धार निघेल तो श्रेष्ठ. जर गंगाधर स्वामी जिंकले तर काशीचा मठ व संपत्ती त्यांच्या सेवेत हजर करण्याचे वचन महंतांनी दिले. गंगाधर स्वामींनी अंगठा कापताच त्यातून दुधाची धार निघाली. महंतांनी त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन काशीच्या मठाची संपत्ती देऊ केली, मात्र उदार अंतःकरणाच्या गंगाधर स्वामींनी ती नाकारली, अशी आख्यायिका आहे. गंगाधर स्वामींचे शिष्य ऋद्धास्वामी हेही चमत्कारी होते. त्यांनी आपले शिष्य निरंजन स्वामी यांची नियुक्ती केली. निरंजन स्वामींच्या काळात गणेशोत्सवात जवळपास साडेतीनशेवर दिंड्या निघत असत. त्यानंतर बस्वलिंग स्वामी यांनी गादीचा कारभार सांभाळला. वृद्धापकाळामुळे त्यांनी गादी शिवशंकर स्वामी यांच्याकडे सोपविली आहे. स्वामींनी काशी येथे धर्मशास्त्राचे अध्ययन केले असून वीरशैव मठाला आगळे महत्त्व प्राप्त करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या कार्यामुळे ही परंपरा अव्याहतपणे सुरू राहील, असा विश्वास नेरपिंगळाईवासीयांना वाटतो.

## संक्षिप्त


### कुऱ्हा हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यायाचा खो -खो संघाची जिल्हास्तरावर निवड



**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोकनगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथील १४ वर्षे आतील मुलींचा संघ तालुका स्तरीय स्पर्धे मध्ये विजयी होऊन जिल्हा स्तरीय स्पर्धे करिता पात्र ठरला आहे.या संघामध्ये वेदिका पोकळे, आराध्या लोहे, पूर्वा कोरडकर,गुंजन उमप, आचल साठवणे, वैष्णवी मेसरे, सौम्या बघेल, माही चुंगळे, देवांगी मार्कन्ड, ईश्वरी उमप सोनाली मेहरे इत्यादी खेळाडू सहभागी झाले. या यशाबद्दल अशोक शिक्षण संस्था, अध्यक्ष श्री. एस. एन. शेंडे साहेब व संचालक मंडळ, मुख्याध्यापिका,आर. जी. कुमरे व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विजयी संघांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

### अत्यंत विषारी पोवळा सापाला जीवदान

**काटपूर-** अमरावती जिल्ह्यात अत्यंत विषारी आणि दुर्मिळ असलेल्या पोवळा जातीच्या सापाची नोंद झाली आहे. मोर्शी तालुक्यातील वाघोली येथे या सापाला सर्पमित्रांनी जीवदान देऊन जंगलात सोडले. वाघोली येथील राजेश खडके यांच्या घरी हा साप आढळला होता. काही जागरूक नागरिकांनी त्याला मारण्याऐवजी सर्पमित्रांशी संपर्क साधला.



सर्पमित्र विकास भोरगडे आणि कृष्णा गावंडे यांनी नागरिकांना सापावर लक्ष ठेवण्यास सांगून दोन किलोमीटरवरील वाघोली गाव गाठले आणि सापाला पकडले. हा साप अत्यंत विषारी आणि दुर्मिळ पोवळा (Coral Snake) जातीचा होता. दोन्ही सर्पमित्रांनी त्याला सुरक्षितपणे पकडून जवळच्या जंगलात सोडून दिले.

### तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत माणिकपूर आश्रमशाळेचे यश



**माणिकपूर-** शासकीय माध्यमिक आश्रम शाळा माणिकपूरच्या विद्यार्थ्यांनी शालेय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत खो-खोमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत चारही गटांत विजेतेपद मिळवले आहे.१४ वर्षे मुले, १४ वर्षे मुली, १७ वर्षे मुले आणि १७ वर्षे मुली या चारही गटांत शाळेने बाजी मारली. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि संघभावनेच्या जोरावर हे यश मिळवले. मैदानावर उत्कृष्ट खेळ, शिस्त आणि जिद्दीचे दर्शन घडवले.या यशामागे विद्यार्थ्यांचा नियमित सराव, क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मुख्याध्यापक व सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांचे प्रोत्साहन मोलाचे ठरले. विजयी संघांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शाळा व्यवस्थापनाने अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.'दुर्गम भाग असला तरी आमची मुले-मुली कुठेही कमी नाहीत; जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मैदान गाजवण्याची क्षमता त्यांच्यात आहे,' अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

### लिटल स्टार इंग्लिश स्कूलचे नागपूर आकाशवाणीवर

**चांदूर रेल्वे-** येथील लिटल स्टार इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचा



बोधपर शैक्षणिक कार्यक्रम नागपूर आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या 'इंद्रधनुष्य' या मालिकेत प्रसारित होणार आहे.हा कार्यक्रम रविवार २० सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता ५८५ kHz आणि News On Air App वर प्रसारित होईल.'सुंदर हात' या श्रुतिकेत शाळेतील विद्यार्थी आराध्या उमक, ज्ञानदा जुमडे, हिमांशु ठाकरे, वेदिका लोडाम, आकांक्षा मीना, श्रीजित तिखे, अनुराग दामले, प्रसन्न ठाकरे, सुजल बारसाकळे, इवाशिका दामले, निधान्या उमक सहभागी होत आहेत.या बोधपर संवादांचे शब्दांकन संस्थेचे अध्यक्ष विश्वास दामले यांनी केले असून दिग्दर्शन प्राचार्य अतुल दामले आणि संकलन उपप्राचार्य वर्षा अतुल दामले यांनी केले आहे. या यशस्वीतेसाठी शाळेच्या सर्व शिक्षिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.सातत्याने दुसऱ्या वर्षी शाळेच्या चिमुकल्यांची श्रुतिका आकाशवाणीवर प्रसारित होत असल्याबद्दल पालक आणि हितचिंतकांकडून अभिनंदन होत आहे.

### अमरावतीत रविवारी रंगणार 'प्रेमाचे काव्य'

**अमरावती-** आझाद हिंद मंडळ, बुधवारा यांच्या वतीने प्रसिद्ध कवी बालासाहेब कुलकर्णी यांच्या 'प्रेमाचे काव्य' या विशेष काव्यसंध्येचे आयोजन रविवार,२० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता आझाद हिंद मंडळ, बुधवारा येथे करण्यात आले आहे.बाळासाहेब कुलकर्णी हे आपल्या प्रभावी सादरीकरणातून प्रेम, माणुसकी, नाती, जीवन आणि देशभक्तीच्या भावनांना शब्दरूप देणारे साहित्यिक म्हणून परिचित आहेत. या कार्यक्रमात त्यांच्या निवडक हिंदी व मराठी कवितांचे सादरीकरण होणार असून रसिकांना भावनांनी ओथंबलेली अविस्मरणीय काव्यसंध्या अनुभवता येणार आहे.अमरावती शहरातील साहित्यप्रेमी, काव्यरसिक, युवक, महिला आणि नागरिकांनी कुटुंबीय व मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आझाद हिंद मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा संकल्प अभियान'

**अचलपूर-** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप मेळघाट जिल्हा (अमरावती ग्रामीण) तर्फे १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे.यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत मेळघाट भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर आणि आमदार केवलराम काळे यांनी माहिती दिली. यावेळी नगराध्यक्ष रूपाली माथने, जिल्हा महासचिव सुधीर रसे, नयना जोशी, भाजयुमो जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे आदी उपस्थित होते. जिल्हा संयोजक सुधीर रसे यांच्या मार्गदर्शनाखाली महिनाभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात आशीर्वादाचा दिवा (नयना जोशी), चित्रकला व भाषण स्पर्धा (निलेश नागापुरे), 'नमो शिवा गाथा' नाट्य सादरीकरण (अतुल बनसोड), अंगणवाडी सेविका सन्मान (प्रियंका मालठाणे), विकास कामांची रील स्पर्धा (रोशन कट्यारमल), सेवा दीप यात्रा (प्रणीत खवले), रांगोळी स्पर्धा (क्षमा चौकसे) आदी उपक्रमांचा समावेश आहे.

# बालकांचे नव्हे, व्यवस्थेचेच पोषण !

**जगातील तिसरी सर्वांत मोठी आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने भारतीय अर्थव्यवस्था वेगाने झेपावत असल्याचे भाकीत अर्थतज्ज्ञ वर्तवत आहेत. मात्र या अब्जावधींच्या गुलाबी आकडेमोडीत ग्रामीण भारतातील भूक अन् कुपोषणाचे भीषण वास्तव कुठे प्रतिबिंबित होताना दिसते का, हा प्रश्न आहे.**

'नऊ ते दहा शिट्या काढूनही न शिजणारा पांढरा वाटाणा आणि शिजविल्यानंतरही कच्चा राहणारा भरडा आम्ही लहान मुलांना कसा खाऊ घालायचा?' आंबेगावच्या (जि. पुणे) एका छोट्या अंगणवाडीतील सेविका रेश्मा ऊर्फ देवयानी पारधी यांनी समाजमाध्यमांवर थेट अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांना साद घालत उपस्थित केलेला हा उद्विग्न सवाल केवळ एका निकृष्ट धान्याचा दर्जा दाखविणारा नव्हता, तर स्वातंत्र्याच्या अमृतकाळात वावरणाऱ्या संपूर्ण प्रशासकीय व राजकीय व्यवस्थेच्या बथ्थड झालेल्या संवेदनशीलतेवर ओढलेला थेट चाबूक होता. मात्र ज्या निष्पाप चिमुकल्यांच्या पोटाला पडणाऱ्या भुकेच्या पिळाची तातडीने दखल घेऊन निकृष्ट माल पाठवणाऱ्या पुरवठादारांच्या मुसक्या आवळायला हव्या होत्या, त्याऐवजी शासकीय नियमांची, गणवेशाची आणि तथाकथित आचारसंहितेची 'ताकदीची' तलवार उगारली गेली ती एका कर्तव्यदक्ष सेविकेवर. सत्य उघडकीस आणले म्हणून तळागाळातील कर्मचाऱ्याला तडकाफडकी निलंबित करून व्यवस्थेने स्वतःची कातडी वाचवण्याचा नेहमीचाच सोईस्कर मार्ग चोखाळला. नंतर जनक्षोभ उसळल्यावर हे निलंबन मागे घेण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली असली, तरी या प्रकरणाने एकात्मिक बाल विकास सेवा आणि 'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण' योजनेच्या अंतरंगात सडत चाललेली कंत्राटदारी संस्कृती चव्हाट्यावर आणली आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, संपूर्ण देशात आज सुमारे १३ लाख ९० हजारांहून अधिक अंगणवाडी केंद्रांचे जाळे पसरलेले असून, त्या माध्यमातून शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता अशा जवळपास १० कोटींहून अधिक लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार देण्याचा दावा केला जातो. याशिवाय, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत देशातील सुमारे ११ लाख २० हजार शासकीय व अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीच्या तब्बल ११ कोटी ८० लाख शालेय विद्यार्थ्यांना दररोज माध्यान्ह भोजन दिले जाते. एकट्या महाराष्ट्राचा विचार केला, तर राज्यात १ लाख १० हजारांहून अधिक अंगणवाड्यांमधून ६० लाखांपेक्षा जास्त बालकांना आहार पुरवला जातो; तर जिल्हा परिषद, नगरपालिका आणि मनपाच्या ८५ हजारांहून अधिक शाळांमधील सुमारे ८५ ते ९४ लाख शालेय विद्यार्थ्यांचे पोषण या योजनेवर अवलंबून आहे. मात्र इतक्या महाकाय प्रमाणावर दरवर्षी हजारो कोटी खर्च होऊनही प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या पदरात काय पडते, याचे उत्तर पारधी यांच्या त्या 'न शिजणाऱ्या पांढऱ्या वाटाण्यात' मिळते.

'कॅग'च्या वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या देशव्यापी लेखापरीक्षण अहवालांवर नजर टाकली, तर पोषण आहारातील भ्रष्टाचाराची आणि निष्काळजीपणाची भीषण दरी स्पष्टपणे समोर येते. गोदामांमध्ये वर्षानुवर्षे पडून राहिलेले, कीड लागलेले धान्य, वाहतुकीतील प्रचंड घट, लाभार्थींच्या कागदोपत्री आकड्यांची फुगवट आणि प्रत्यक्ष पटसंख्येतील तफावत यावर लेखापरीक्षकांनी वारंवार ताशेरे ओढले आहेत. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाचे अहवाल अजूनही ओरडून सांगत आहेत की, भारतातील ३५ टक्क्यांहून अधिक बालके खुंटलेली वाढ आणि कमी वजनाच्या समस्येने ग्रासलेली आहेत, तर ग्रामीण व आदिवासी भागातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त शालेय विद्यार्थी आणि माता तीव्र रक्ताल्पतेने (Anemia) ग्रस्त आहेत. जर तिजोरीतून बालकांच्या प्रथिनांसाठी आणि कॅलरीजसाठी अब्जावधी रुपये मोजले जातात, तर मग बालकांच्या रक्तातील हिमोग्लोबिन



का वाढत नाही? याचे थेट कारण म्हणजे कागदावर सजवलेली - सकस पोषणाची आकडेवारी आणि जमिनीवर वाढला जाणारा अत्यंत निकृष्ट आहार यामधील न मिटणारी दरी होय.

मेळघाटच्या दऱ्याखोऱ्यांत, नंदुरबारच्या सातपुड्याच्या कुशीत, पालघरच्या मोखाडा-जव्हारमध्ये किंवा गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त जंगलात आजही कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू आणि जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे अत्यंत कमी वजन हे प्रशासकीय योजनांच्या दाव्यांची लक्तरे वेशीवर टांगते. पावसाळ्यात रस्ते बंद झाल्यामुळे महिनोन्महिने न पोहोचणारा आहार, पोहोचलाच तर बुरशी आलेली पिठाची पाकिटे आणि दुर्गंधीयुक्त कडधान्ये खाऊन जगणारी आदिवासी बालके पाहिली, की देशाच्या अर्थव्यवस्थेचा फुगा क्षणात फुटतो. व्यवस्थेतील बडे सनदी अधिकारी, मंत्रालयातील धोरणकर्ते आणि कोट्यवधींची कंत्राटे लाटणारे बडे शासकीय पुरवठादार कायम नामानिराळे राहतात; मात्र स्थानिक पातळीवर काम करणारे प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि अंगणवाडी सेविका यांना तात्काळ आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. शासनाने शाळा व्यवस्थापन समित्या आणि शिक्षकांना वजन, दर्जा आणि एक्सपायरी डेट तपासूनच माल स्वीकारण्याचे कागदी फर्मान सोडले आहे. परंतु, प्रत्यक्षात तालुक्याच्या गोदामातून एकाच वेळी आलेला निकृष्ट दर्जाचा माल जर एखाद्या मुख्याध्यापकाने किंवा सेविकेने नाकारला, तर त्यांच्यावर 'शासकीय योजनेत खोडा घातल्याचा' किंवा 'विद्यार्थ्यांना उपाशी ठेवल्याचा' ठपका ठेवून कारवाईची धमकी दिली जाते. तोच निकृष्ट आहार नाइलाजाने शिजवून मुलांना दिल्यानंतर विषबाधा झाली किंवा बालके आजारी पडली, तर पहिली पोलीस तक्रार आणि निलंबनाची कारवाई या निष्पाप शिक्षक-सेविकांवरच होते. निकृष्ट माल पुरवणाऱ्या बड्या कंपन्यांना राजकीय आणि प्रशासकीय अभय असल्याने त्यांचे कधीच काही होत नाही.

**विकेंद्रीकरण हाच पर्याय**

या कलुषित व्यवस्थेचा विळखा तोडायचा असेल, तर केवळ चौकशी समित्या नेमून किंवा तात्पुरत्या मलमपट्ट्या करून भागणार नाही; यासाठी संपूर्ण पोषण आहार वितरण व्यवस्थेचे समूळ विकेंद्रीकरण करणे हाच एकमेव शाश्वत पर्याय आहे. शेकडो किलोमीटर दूर असणाऱ्या कारखान्यांतून येणारी प्रक्रिया केलेली पॅकबंद पाकिटे आणि केंद्रीकृत पुरवठा साखळी तात्काळ रद्दबातल केली पाहिजे, त्याऐवजी, आहार शिजवणे आणि वितरणाचे संपूर्ण अधिकार स्थानिक पातळीवरील नोंदणीकृत महिला बचत गट, स्थानिक सेवाभावी स्वयंसेवी संस्था यांच्याकडे सोपवले पाहिजेत. या विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण भागातील महिलांना आणि तरुणांना गावातच रोजगार मिळेल. तसेच आहारासाठी लागणारा भाजीपाला, कडधान्ये, गूळ, तेल आणि अंडी यांची स्थानिक आठवडे बाजारातून खरेदी करण्याची मुभा दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**महेश ठाकरे**
मो.७७४५८२३४९२


जनार्दनराव गरकल साईनगर, बुलढाणा


सुरेश खंडेराव पांडे जगदाळे लेआऊट कृष्णार्पण कॉलनी अमरावती


प्रमोद चौधे काटपूर


डॉ. पंकज मुळे मेन रोड मोर्शी


साहेबराव चव्हाण अमरावती


सतीश साहेबराव पवार कुऱ्हा



शशिकांत सुदेश कदम देऊरवाडा


संजय उल्हे, तिवसा


हेमंत विजयराव काळे(काटपुर)



गंगाधरराव चोंधे (काटपुर)


मनोहर पाटील मारडा


प्रमोद बोराळकर सुरवाडी


आकाश उत्तमशिंग ठाकूर कुऱ्हा


अरुण उर्फ श्यामराव गौरखेडे,तिवसा


अविनाश विंचुरकर, तिवसा

## दिवाळी विशेषांक -२०२६

दरवर्षी प्रमाणे यंदाही 'जनमाध्यम' च्या वतीने 'दिवाळी विशेषांक-२०२६' प्रकाशित करणार आहोत.या अंकाच्या माध्यमातून नवलेखकांसह साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यिकांचे वर्तमान विषयांवरील राजकीय, सामाजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद व प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपणारा असा राहणार नसून प्रत्येक वाचकाने संग्राह्य ठेवावा असाच राहणार आहे. तरी या दिवाळी अंककरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश या अंकात करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फे विनंती. आपले साहित्य atimadhyam@gmail.com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअ‍ॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम' कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.२० ऑक्टोबर २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम' कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.२० ऑक्टोबर २०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.

# केळी पिकवूनही शेतकरी कंगाल!

## एक नंबरला ९५०, दोन नंबरला ३०० ते ४०० रुपये
## एकरी १.४० लाख खर्च करूनही उत्पादन खर्च भरून निघेना

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

लाखो रुपये खर्च करा, महिनेभर राबा आणि शेवटी माल कवडीमोल भावात विकावा! तेल्हारा तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांची सध्या अक्षरशः अशीच अवस्था झाली आहे. एक नंबरच्या केळीला केवळ ९५० रुपये, तर दोन नंबरच्या मालाला ३०० ते ४०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या हातात उत्पादन खर्चाचीही भरपाई होत नाही. एक एकर बागेसाठी सुमारे १ लाख ४० हजार रुपये खर्च होत असताना बाजारात मिळणारा भाव पाहता केळीचे पीक शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे नव्हे, तर तोट्याचे गणित ठरत आहे.



तेल्हारा तालुका बागायती पट्टा असल्याने मोठ्या प्रमाणात केळीची लागवड केली जाते. यंदा सुमारे दोन हजार हेक्टर क्षेत्रावर हे पीक आहे. सुरुवातीला सुमारे दोन हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत भाव मिळत होता. मात्र गेल्या दीड महिन्यात दरात मोठी घसरण झाली. सण-उत्सवाच्या काळातही दर सुधारण्याऐवजी आणखी घसरल्याने उत्पादकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले आहे. व्यापाऱ्यांकडून दर पाडले जात असल्याचा आरोप उत्पादकांकडून होत आहे. हातात आलेला माल जास्त दिवस ठेवता येत नसल्याने शेतकऱ्यांसमोर तो मिळेल त्या भावात विकण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे उत्पादनाचा धोका शेतकऱ्यांचा आणि बाजारभावाची कात्रीही शेतकऱ्यांच्याच मानेवर, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

रोपे, खते, औषधे, मजुरी, सिंचन, फवारणी आणि काढणीपर्यंत केळी उत्पादकांना मोठा खर्च सहन करावा लागतो. प्रयोगशील शेतकरी विलास जनार्दन खारोडे (तेल्हारा बाजार) यांनी तीन टप्प्यांत सात एकर क्षेत्रावर केळीची लागवड केली आहे. त्यांच्या माहितीनुसार, एका झाडासाठी सुमारे १०० ते ११० रुपये खर्च येतो. एका एकरात १,४०० ते १,५०० झाडे लागतात. काढणीपर्यंत एकरी सुमारे १ लाख ४० हजार रुपये खर्च होतो. 'केळीला किमान २,२०० ते २,५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळणे आवश्यक आहे. एवढा खर्च करूनही शासनाचे अनुदान अद्याप मिळालेले नाही,' अशी व्यथा खारोडे यांनी मांडली.

मागील वर्षी तालुक्यात सुमारे २,८०० एकर क्षेत्रावर केळी लागवड झाली होती. यंदा लागवड क्षेत्रात घट झाल्याचे शेतकरी सांगतात. दराची अशीच स्थिती राहिली तर आगामी काळात शेतकरी केळीपासून दूर जाण्याची शक्यता आहे. केळीला योग्य व हमीभाव मिळावा, बाजार समितीने दरातील अनियमिततेवर नियंत्रण ठेवावे, प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करावे, व्यापाऱ्यांकडून होणारी दरकपात थांबवावी आणि उत्पादन खर्चाचा विचार करून किमान २,२०० ते २,५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळावा, अशी मागणी केळी उत्पादकांनी केली आहे.

### 'खर्च वाढतोय, भाव मात्र खाली येतोय'

'रोपे, खते, औषधे, मजुरी, सिंचन आणि फवारणीचा खर्च दरवर्षी वाढत आहे. त्याच्या तुलनेत केळीचा भाव घसरत आहे. उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला नाही तर केळी उत्पादक शेतकऱ्यांचे दिवस आणखी कठीण होतील,' असे हिंगणी येथील केळी उत्पादक शेतकरी बंडू पाटील नराजे यांनी सांगितले.

### 'केळी शेती टिकली तरच शेतकरी टिकेल'

'मेहनतीने पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नसेल, तर उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेले प्रयोग व्यर्थ ठरतील. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य दर, बाजारातील नियंत्रण आणि प्रलंबित अनुदानाबाबत निर्णय घ्यावा,' अशी मागणी शेरी बुद्रुक येथील शेतकरी श्रीराम खारोडे यांनी केली.

# उद्यापासून कृषी विद्यापीठात खरीप शिवार फेरी

▶▶ कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उद्घाटन
▶▶ २५ एकरांत २२८ पीकवाण व तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि प्रकल्प संचालक आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय खरीप शिवार फेरीला रविवार, २० सप्टेंबरपासून प्रारंभ होत आहे. विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्य साधून आयोजित या शिवार फेरीचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता होणार आहे. कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कृषी राज्यमंत्री ॲड. जयस्वाल विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

उद्घाटन सोहळ्यास विधानसभा विधिमंडळ पक्षाचे मुख्य प्रतोद रणधीर सावरकर, महापौर शारदा खेडकर, खासदार अनुप धोत्रे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, कृषी सचिव परिमल सिंग, कुलगुरू कर्नल प्रा. (डॉ.) शरद गडाख यांच्यासह राज्यातील विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. शिवार फेरीचे प्रमुख आकर्षण म्हणजे विद्यापीठाच्या २५ एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेली जिवंत पीक प्रात्यक्षिके. येथे ११० खरीप पिके, २७ भाजीपाला पिके, ६५ फुलवर्गीय पिके आणि १५ लागवड तंत्रज्ञानाच्या शिफारशी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहता येणार आहेत. तृणधान्यांचे ३२, कडधान्यांचे २३, तेलबियांचे ३१, कापसाचे २४, चारा पिकांचे ११, भाजीपाल्याचे २७ आणि फुलपिकांचे ६५ वाण अशा एकूण २२८ पीकवाण व तंत्रज्ञान शिफारशींचे सादरीकरण करण्यात आले आहे. यंदाच्या शिवार फेरीत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठासह वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, महाबीज आणि १४ खासगी कंपन्यांचीही प्रात्यक्षिके उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

### जिल्हानिहाय असे राहणार वेळापत्रक

२० सप्टेंबर : अकोला, वाशिम, बुलढाणा व गोंदिया, २१ सप्टेंबर : वर्धा, नागपूर व गडचिरोली, २२ सप्टेंबर : अमरावती, यवतमाळ, भंडारा व चंद्रपूर तथापि, कोणत्याही दिवशी शेतकरी शिवार फेरीत सहभागी होऊ शकतात, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

### गतवर्षी लाखावर शेतकऱ्यांची उपस्थिती

सन १९८२ पासून विद्यापीठात शिवार फेरीचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यापीठाने विकसित केलेले पीकवाण, संशोधन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर पाहता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गतवर्षी विदर्भातील ११ जिल्ह्यांमधून एक लाखांहून अधिक शेतकरी-भगिनींनी शिवार फेरीला भेट देऊन विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

### बचत गटांकडून अल्पोपहाराची व्यवस्था

शिवार फेरीसाठी येणाऱ्या शेतकरी-भगिनींच्या सेवेसाठी गतवर्षीपासून स्वयं-सहायता बचत गटांना अल्पोपहार, चहापान आणि भोजनाची व्यवस्था करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. अत्यल्प दरात बचत गटांच्या सदस्यांकडून या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यंदाच्या शिवार फेरीत राज्यातील चारही कृषी विद्यापीठांसह कृषी विभाग, आत्मा, महाबीज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा), रिलायन्स फाउंडेशन, पाणी फाउंडेशन, जिल्हा परिषद उमेद अभियान आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सहभाग आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती व शेतीपूरक व्यवसायात आवश्यक बदल, आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध पीकवाणांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी अधिकाधिक शेतकरी-भगिनींनी शिवार फेरीत सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठ परिवाराने केले आहे.

### ३२०० हेक्टर संशोधन क्षेत्रही शेतकऱ्यांसाठी खुले

विद्यापीठाच्या विविध संशोधन विभागांचे तब्बल ३२०० हेक्टर क्षेत्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहता येणार आहे. याशिवाय दोन हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांच्या पैदासकार बियाणे उत्पादनाचा कार्यक्रमही पाहण्याची संधी मिळणार आहे. शिवार फेरीच्या उद्घाटनानंतर रब्बी हंगामासाठी बियाणे विक्रीलाही प्रारंभ होणार आहे. शेतकऱ्यांच्या शेतीविषयक प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी दुपारच्या सत्रात चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. नोंदणी केलेल्या शेतकरी-भगिनींना विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळणार आहे.

# पंचायत समितीत सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ



■ प्रतिनिधी | अकोट ■

'सेवा परमो धर्म' या उक्तीनुसार सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अकोट पंचायत समितीअंतर्गत सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ गुरुवारी करण्यात आला. अभियानाच्या प्रारंभी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवा संकल्प घेत स्वच्छतेची शपथ घेतली. त्यानंतर पंचायत समिती कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या वेळी सहायक गटविकास अधिकारी तसेच पंचायत समितीतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, ग्रामपंचायत लोहारी येथेही अभियानाची सुरुवात करण्यात आली. सेवाज्योत प्रज्वलित करून शालेय विद्यार्थ्यांची प्रभातफेरी व मशालफेरी काढण्यात आली.

### २२ प्रकारच्या सेवा नागरिकांच्या दारी

विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून अभियानाच्या कालावधीत एकूण २२ प्रकारच्या सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरिकांच्या गरजेनुसार विविध ठिकाणी सेवा शिबिरांचे आयोजनही केले जाणार आहे. ग्रामपंचायतींसह पंचायत समितीअंतर्गत सर्व विभागांनी अभियान प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन गटविकास अधिकारी यांनी केले आहे.

### १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान अभियान

सेवा संकल्प अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ असा एक महिन्याचा आहे. या कालावधीत विविध टप्प्यांत उपक्रम राबविण्यात येणार आहेत. पहिल्या सप्ताहात सुशासन व नागरिक सेवा, दुसऱ्या सप्ताहात संस्था व सार्वजनिक सुविधांचे सक्षमीकरण, तर तिसऱ्या सप्ताहात जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव या विषयांवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

## 'लोकसंवाद' अभियान जिल्हा माहिती कार्यालयाचा उपक्रम

**अकोला :** महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागांतर्गत असलेल्या जिल्हा माहिती कार्यालयातर्फे आजपासून सेवा संकल्प अभियान व 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रमाचा शुभारंभ झाला. शहरातील शास्त्रीनगर व विप्र युवा वाहिनी गणेशोत्सव मंडळापासून प्रारंभ झाला. कौशल्य विकास अधिकारी नागेश देशपांडे व रोजगार अधिकारी प्रवीण बांबोडे यांनी विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. नियमित रोजगार मेळाव्यांबद्दलही त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विप्र युवा वाहिनी गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व भक्तगण उपस्थित होते.

# अंध दिव्यांग बालकांची भव्य भजन संध्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीसेवा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित गोरक्षण रोड वरील पर्यावरणपूरक 'गोरक्षण रोड का राजा'ची झाकी बघण्यासाठी भक्तांची मोठी गर्दी होत आहे.मंडळाने गेल्या दोन वर्षांपासून आर्चसहित २६ फूट उंचीची विशाल मूर्ती बनविली आहे. पर्यावरणाचा विचार करता या भव्य मूर्तीचे विसर्जन न करता प्रतीकात्मक शाडू मूर्तीचे विसर्जन करण्यात येत आहे. या उत्सवात हनुमंताची झाकी, राम दरबार मूषक पालकी व संगीत आदी झाकी साकार करण्यात आली आहे.दरम्यान उत्सवात दिव्यांग सेवा समितीच्या वतीने यवतमाळ येथील अंध दिव्यांग बालकांच्या सुरबहार ग्रुपची भव्य भजन संध्या संपन्न झाली. यावेळी ग्रुपच्या अंध दिव्यांग कलाकारांनी मंडप प्रांगणात भव्य संगीतमय भजने एवं राष्ट्रीय गीत सादर करून एकच जल्लोष निर्माण केला.या दिव्यांग भजन संध्येत प्रमुख पाहुणे म्हणून महाबीज चे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी उपस्थित होते.




# श्रींच्या चरणी भक्ताचे मरणोत्तर नेत्रदान

■ प्रतिनिधी | अकोट ■

मृत्यूनंतरही आपले डोळे कुणाच्या तरी आयुष्यात प्रकाश आणू शकतात, या मानवतावादी विचाराला कृतीची जोड देत यात्रा चौक, अकोट येथील सौ. राजकन्याताई रवींद्र शेगोकार (७०) यांच्या कुटुंबीयांनी त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले. श्री गजानन महाराज पादुका संस्थान, श्रीक्षेत्र मुंडगाव यांच्या नेत्रदान व मरणोत्तर देहदान अभियानाला प्रतिसाद देत शेगोकार कुटुंबीयांनी घेतलेला हा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

राजकन्याताई शेगोकार यांचे १० सप्टेंबर २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी दुःखाच्या प्रसंगीही सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदानाचा निर्णय घेतला. या नेत्रदानामुळे दोन गरजू व्यक्तींना दृष्टी मिळण्यास मदत होणार आहे.

गजानन महाराज पादुका संस्थान, मुंडगाव यांच्या वतीने सन २००७ पासून नेत्रदान व मरणोत्तर देहदान अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये नेत्रदान व देहदानाबाबत जनजागृती केली जात असून, आतापर्यंत शेकडो नागरिकांनी नेत्रदान व देहदानाचे संकल्प नोंदविले आहेत. मृत्यूनंतरही समाजाच्या उपयोगी पडण्याची भावना रुजविणे, हा या



शेगोकार कुटुंबीयांचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श

अभियानामागील प्रमुख उद्देश आहे.

दिशा फाउंडेशन, अमरावती यांच्या वतीने आवश्यक शस्त्रक्रिया करून नेत्रदानाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. या कार्यासाठी नेत्र कमलांजली हॉस्पिटल, अकोला येथील डॉ. पनपालीया, चंदू पाटील (अकोला), शेजारी राहणारे गजानन मेहरे (अकोट) तसेच पादुका संस्थानच्या वतीने विजय ढोरे यांचे सहकार्य लाभले. राजकन्याताई यांच्या पश्चात पती रवींद्र शेगोकार, मुले विशाल शेगोकार, सचिन शेगोकार आणि मुलगी सौ. सीमा गजानन पिंपळे असा परिवार आहे. कुटुंबीयांनी दाखविलेल्या सामाजिक संवेदनशीलतेबद्दल गजानन महाराज पादुका संस्थानच्या वतीने त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट देण्यात आली. संस्थानचे अध्यक्ष गणेश ढोले, विलास बहादुरे, विजय ढोरे, महेश गाढे, गणेश कळसकर, शरद सोनटक्के, ज्वारसिंग आसोले यांनी शेगोकार कुटुंबीयांचे कौतुक केले.

**Change In Name**
I have changed my name from
**NOOR AFSA TABREZ AHMAD**
Passport no:- N6210445
- To -
**NOOR AFSA TABREZ AHMED CHAUDHARY**
Shankar Nagar, Near New India Bakery Akot File, Akola - 444003

**Change In Name**
I have changed my name from
**TABREZ AHMAD MEER HASAN CHAUDHARY**
Passport no:- N6210444
- To -
**TABREZ AHMED MEER HASAN CHAUDHARY**
36, Shankar Nagar, Indiya Bakery, Shankar Nagar, Shiloda, PO:Sukoda, DIST:Akola - 444006

# एनआरपीच्या राजाच्या चार धाम यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

गेल्या २८ वर्षांपासून विविध कार्यक्रमांमधून आणि प्रबोधनात्मक झांक्यांच्या माध्यमातून गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक व सेवाभावी कार्यांना प्रोत्साहन देणाऱ्या न्यू राधाकिसन प्लॉट येथील श्री रिद्धिसिद्ध गणेशोत्सव मंडळ—एनआरपीच्या राजाने मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या प्रांगणात गणेशोत्सवात साकार केलेल्या चार धाम यात्रा झांकीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी उसळत आहे.

मंडळाने या गणेशोत्सवात साक्षात पवित्र गंगोत्री, यमुनोत्री, बद्रीनाथ आणि बर्फाच्छादित केदारनाथ धाम साकार केले आहे. यातून फिरताना बर्फाच्छादित केदारनाथचा थंडगार बर्फ जाणवतो.

यासोबतच ३० फूट लांब आणि २९ फूट रुंद अशी शिव वरातीच्या गणपतीची भव्य मूर्ती उभारण्यात आली आहे, ज्यात मूर्ती आणि चित्रकलेद्वारे प्रभूंची बारात दाखवण्यात आली आहे. या गणपतीच्या गळ्यात खऱ्या अमेरिकन डॉलरची मोठी माळ घालण्यात आली आहे. भाविकांसाठी मंडळाकडून प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

ज्याचा हजारो भाविक दर्शनानंतर लाभ घेत आहेत.या भव्य झांकीला पाहण्यासाठी शहरातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून गणपतीचे दर्शन घेतले.

# उत्कर्ष जैन यांच्या प्रयोगशाळेस प्रथम पुरस्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरातील उत्कर्ष जैन यांच्या प्रयोगशाळेस प्रथम पुरस्कार मिळाला.नागपूर येथील एम के एस संचेती पब्लिक स्कूल येथे आयोजित सॅन टेक टीचिंग एड चॅलेंज २०२६ या स्पर्धेत स्किल बेस टीचिंग एड कॅटेगिरी मध्ये जैन यांच्या उत्कषा प्रयोगशाळा ने प्रथम क्रमांक प्राप्त केला.या स्पर्धेत नागपूरतील नामांकित शाळा - कॉलेजनी सहभाग घेतला होता.




उत्कर्षाच्या प्रयोगशाळेचे संचालक उत्कर्ष जैन व नमिता जैन यांच्या या नावीन्यपूर्ण कृतीयुक्त टीचींग एडला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.यापूर्वी सुद्धा त्यांच्या नाविन्यपूर्ण कृतीयुक्त गणितीय मॉडेलला पेटंट प्राप्त झालेले आहे .इंग्रजी भाषेची फोनिक्स लँग्वेज लॅब त्यांनी डेव्हलप केलेली आहे. संस्कृत भाषेचे उद्यान, मराठी भाषेचे प्रयोगशाळा त्यांच्या या उत्कर्षाच्या प्रयोगशाळेत त्यांनी तयार केलेले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल डॉ. सुयोग जोहरापुरकर, रितेश देवलसी, मंगल बाठे, अक्षय पारेख आदींनी अभिनंदन केले आहे.

# ई-केवायसी, 'मिशन सुधार'ला वेग; एकदिवसीय कार्यशाळा

## लाभार्थी नोंदी अद्ययावत करण्यावर भर

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासह लाभार्थी माहितीचे अद्ययावतीकरण आणि 'मिशन सुधार'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तेल्हारा तहसील कार्यालयात एकदिवसीय कार्यशाळा व आढावा बैठक घेण्यात आली.

जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला अकोला पुरवठा विभागाचे सातव तसेच तेल्हारा तालुका पुरवठा अधीक्षक अंजली कावरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तालुक्यातील रास्तभाव धान्य दुकानदार, अधिकारी व कर्मचारी बैठकीला उपस्थित होते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांच्या नोंदींचा आढावा घेताना ई-केवायसी न झालेले लाभार्थी, हाताचे ठसे नोंदविता न आलेले नागरिक, वयोवृद्ध, मयत लाभार्थी, विवाह झालेल्या मुली तसेच बाहेरगावी असलेल्या लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रास्तभाव दुकाननिहाय लाभार्थ्यांची अचूक आकडेवारी उपलब्ध करून घेण्यासह नोंदीतील त्रुटी दूर करण्यावर विशेष भर देण्यात आला.



राशन वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून ती अधिक पारदर्शक व सक्षम करण्यासाठी 'मिशन सुधार' उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत लाभार्थी नोंदींची पडताळणी, ई-केवायसीची पूर्तता आणि आवश्यक माहिती वेळेत अद्ययावत करण्याच्या सूचना रास्तभाव दुकानदारांना देण्यात आल्या.

लाभार्थ्यांची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. ई-केवायसी ही केवळ औपचारिकता नसून लाभार्थ्यांची माहिती अचूक ठेवण्यासाठी महत्त्वाची प्रक्रिया आहे. मयत, बाहेरगावी असलेले किंवा नोंदीमध्ये बदल झालेले लाभार्थी यांची माहिती तपासून अद्ययावत करणे गरजेचे आहे. पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळावे आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक व्हावी, यासाठी 'मिशन सुधार' प्रभावीपणे राबविण्यात येईल. रास्तभाव दुकानदारांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी केले.

पात्र लाभार्थ्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ सुरळीतपणे मिळण्यासाठी पुरवठा विभाग, रास्तभाव दुकानदार आणि लाभार्थी यांच्यात समन्वय ठेवण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. कार्यशाळेमुळे तालुक्यात ई-केवायसी आणि लाभार्थी नोंदी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अभियान काळात जास्तीत जास्त सेवा, योजना नागरिकांपर्यंत पोहोचवा - पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

**वर्धा/जनमाध्यम**

सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय सेवांचा लाभ प्रभाविपणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त संपुर्ण राज्यात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. अभियान काळात जिल्ह्यात विविध शासकीय सेवा, योजना नागरिकांपर्यंत पोहोचवा. त्यादृष्टीने प्रत्येक विभागाने सुक्ष्म नियोजन करण्याच्या सुचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्र्यांनी सेवा संकल्प अभियानाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपवनसंरक्षक हरविर सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांच्यासह सर्व विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

अभियान १७ ऑक्टोंबर पर्यंत एक महिना राबविण्यात येणार आहे. या कालावधीत महसूल विभागाने पट्टे वाटप, विविध प्रकारचे दाखले, प्रमाणपत्र वाटपावर भर द्यावा. विविध महसूली सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी तालुका, मंडळस्तरावर शिबिरे आयोजित करावे. विविध विभागांच्या सेवा देखील या ठिकाणी उपलब्ध करून द्याव्यात.

गावभेट कार्यक्रमाद्वारे गावातील समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे पालकमंत्री म्हणाले.

उद्योग विभागाने उद्योग स्नेही ग्रामपंचायत हा उपक्रम राबवावा. प्रधानमंत्री व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा जास्तीत जास्त युवकांना लाभ होईल, असे नियोजन करावे.

शिक्षण विभागाने शाळास्तरावर विद्यार्थ्यांच्या



पालकमंत्र्यांनी घेतला सेवा संकल्प अभियानाचा आढावा

विविध स्पर्धा आयोजित करावे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या २५ वर्षाच्या सेवा काळात अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले, त्याची जनजागृती होण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात यावे.

आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभागाने विद्यार्थ्यांच्या व विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांची यादरम्यान जनजागृती करावी. लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करावे.

महिला बालविकास विभागाने नियोजित केलेला माझी अंगणवाडी माझी जबाबदारी हा उपक्रम उत्तम असून तो प्रभावीपणे राबविण्यात यावा. कृषि विभागाने पात्र महिला शेतकऱ्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची मोहीम मोठ्या प्रमाणावर या दरम्यान राबवावी, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

आरोग्य विभागाने रुग्ण तपासणी, रक्तदान शिबिरसह विविध योजनांचा लाभ या दरम्यान द्यावा.

सर्वसामान्यांसाठी डिजिटल साक्षरता, सायबर सुरक्षा, रस्ते सुरक्षा, नळ जोडणी असे विविध स्तरावरील कार्यक्रम घेण्यात यावे. घरकुल लाभार्थ्यांना सुर्यघर योजनेचा लाभ देण्याची मोहिम या दरम्यान राबवावी. ग्रामस्तरावर विविध प्रकारचे लोकोपयोगी कार्यक्रम घेण्याच्या सुचना केल्या.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी जिल्ह्यात अभियानांतर्गत होत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

विभागांनी सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या आपल्या विभागाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवाव्या, असे सांगितले. जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांनी सुरुवातीस अभियान तसेच महिनाभर राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

# रस्त्यावर वाहन उभे कराल तर कारवाईला सामोरे जा

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी आणि वाहनचालक तसेच पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढवून अपघातांना आळा बसावा यासाठी वर्धा पोलिसांनी रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर विशेष मोहीम राबविली. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

रामनगर पोलीस ठाण्याच्या ठाणेदार पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखुंडे, जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक विजयकुमार घुले, शहर वाहतूक शाखेचे कर्मचारी तसेच पोलीस ठाण्याच्या पथकाने विविध ठिकाणी कारवाई केली.

सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने वाहने उभी करणाऱ्या चालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२२ अन्वये १८४ कारवाया करून ९९ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ट्रिपल सीट वाहनचालकांविरुद्ध २४ कारवायांत २४ हजार रुपयांचा दंड करण्यात आला. वाहनाची कागदपत्रे जवळ न बाळगणे, फ्रंट सीटवर वाहन चालविणे आणि क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहून नेणे अशा विविध प्रकारांत ४७७ कारवाया करून ४ लाख ३७ हजार ३५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

वाहनचालकांनी चौक, वळण, बसथांबा आणि गर्दीच्या ठिकाणी अनधिकृत पार्किंग टाळावे. योग्य ठिकाणी पार्किंग करून सुरक्षित वाहतुकीस सहकार्य करावे.रस्ता सर्वांचा आहे. काही मिनिटांसाठी वाहन उभे केले तरी वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# आमदाराला ५ कोटी, खासदारालाही ५ कोटी हा न्याय की थट्टा?

## महाराष्ट्रातील ६ विधानसभा असलेल्या लोकसभा मतदारसंघांना न्याय हवा- अमर काळे

**वर्धा/जनमाध्यम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात शुभेच्छांचा वर्षाव सुरू असताना वर्धा लोकसभेचे खासदार अमर काळे यांनी मात्र 'विकासाचे गिफ्ट' मागितले आहे. लोकसभा मतदारसंघांसाठीचा खासदार स्थानिक क्षेत्र विकास निधी दरवर्षी ५ कोटी रुपयांवरून किमान २५ कोटी रुपये करण्याची मागणी त्यांनी पंतप्रधानांकडे पत्राद्वारे केली आहे.

काळेंनी पत्रात तुलनेचा मुद्दाच धरला आहे. महाराष्ट्रातील बहुतांश लोकसभा मतदारसंघांमध्ये सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश असतो. प्रत्येक आमदाराला स्थानिक विकासासाठी दरवर्षी ५ कोटी रुपये मिळतात; मग संपूर्ण लोकसभा मतदारसंघासाठी खासदारालाही फक्त ५ कोटीच का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. सहा विधानसभा मतदारसंघांचा विचार केल्यास लोकसभा मतदारसंघासाठी किमान ३० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित ठरावा, असे गणित मांडत त्यांनी ३० कोटींची मागणी न करता किमान २५ कोटी रुपयांचा वार्षिक श्ईर्थ्ईअए निधी उपलब्ध करून देण्याची भूमिका घेतली आहे.

रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण गरजा वाढल्या, निधी मात्र तोच

पत्रात ग्रामीण रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, शैक्षणिक संस्था, सामुदायिक भवन, सार्वजनिक सुविधा, महिला व युवक केंद्रे तसेच इतर मूलभूत सुविधांसाठी स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात मागण्या प्राप्त होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.सध्याच्या ५ कोटी रुपयांच्या निधीतून या सर्व गरजा पूर्ण करणे कठीण होत असल्याने निधीत मोठी वाढ करण्याची आवश्यकता असल्याचे खासदार काळे यांनी अधोरेखित केले आहे.

वाढता मतदारसंघ, वाढत्या अपेक्षा; निधी मात्र ५ कोटींचाच

लोकसभा मतदारसंघांच्या भौगोलिक विस्तारासोबतच नागरिकांच्या विकासाच्या अपेक्षाही वाढत असल्याचा मुद्दा काळेंनी मांडला आहे.गावागावां तील मूलभूत सुविधांपासून सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत अनेक कामांसाठी खासदारांकडे मागण्या येतात. मात्र उपलब्ध निधीची मर्यादा लक्षात घेता सर्व मागण्यांना पुरेसा प्रतिसाद देणे कठीण जाते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत खासदार अमर काळे यांनी या प्रसंगी देशातील सर्व खासदारांना २५ कोटी रुपयांचा वार्षिक खासदार निधी वाढवून देण्याचा निर्णय वाढदिवसाचे औचित्य साधून घेण्याची विनंती केली आहे.

पंतप्रधानांचा वाढदिवस हा केवळ व्यक्तिगत आनंदाचा प्रसंग न राहता देशवासीया ंसाठी नव्या विकास संकल्पाचा प्रसंग ठरावा, या भूमिकेतून खासदार काळे यांनी निधीवाढीची मागणी पत्रातून मांडली आहे.

'देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघाला विकासाचे बळ मिळेल खासदार निधी २५ कोटी रुपयांपर्यंत वाढविल्यास देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात स्थानिक विकासकामांना अधिक गती मिळू शकते, असा दावा पत्रात करण्यात आला आहे. खासदारांना त्यांच्या मतदारसंघातील प्राथमिक गरजांनुसार अधिक व्यापक स्वरूपात विकासकामांची शिफारस करता येईल आणि त्याचा थेट फायदा नागरिकांना होईल, असे पत्रात नमूद आहे.MPLADS योजनेंतर्गत सध्या प्रत्येक खासदाराला वार्षिक ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होतो.

हा निधी स्थानिक पायाभूत सुविधा, रस्ते, शाळा, आरोग्य केंद्रे आदी कामांसाठी वापरला जातो. मात्र वाढत्या विकासगरजा आणि तुलनात्मक न्यायाच्या दृष्टीने हा टनिधी अपुरा ठरत असल्याची भूमिका अमर काळे यांनी घेतली आहे.

# कॅप्टन मोहन गुजरकर वनविभागाच्या गौरव पुरस्काराने सन्मानित



**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनाच्या वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या वतीने वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन व पर्यावरण संरक्षणासाठी उल्लेखनीय योगदानाकरिता दिला जाणारा 'गौरव पुरस्कार' २०२६ स्थानिक प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष तथा एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांना राज्यमंत्री नामदार डॉ पंकज भोयर यांच्या हस्ते 'विकास भवन' स्मृतिचिन्ह व गौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी मंचावर वनविभागाचे उपसंरक्षक हरविर सिंग, सामाजिक वनीकरण विभागाचे मुख्य वनअधिकारी सुहास बढेकर, वन विभागाचे उपसंचालक मंगेश ठेगंडी व उपस्थित होते.

कॅप्टन मोहन गुजरकर यांनी गेल्या २५ वर्षापासून प्रहार समाज जागृती संस्था, जिल्हा गृहरक्षक दल वर्धा, राष्ट्रीय छात्र सेना युनिट, राष्ट्रीय सेवा योजना युनिट, रोव्हर स्काऊट रेंजर गाईड युनिट व राष्ट्रीय हरित सेना युनिट यांच्या माध्यमातून आपल्या छात्र सैनिकांच्या, स्वयंसेवकांच्या, गृह रक्षकांच्या व ग्रीन वॉरियर्स यांच्या सहकार्याने हजारो वृक्षांचे वृक्षारोपण करून संवर्धन केलेले असून नुकतेच देवळीच्या एस एस एन जे महाविद्यालय परिसरात 'मिया वाकी' घनवन प्रकल्प सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून उभारून तेथे २२५०० वृक्षांचे रोपण करण्याचे उल्लेखनीय कार्य सुरू आहे.


कॅप्टन मोहन गुजरकर आपल्या यशाचे श्रेय एनसीसी चे ग्रुप कमांडर ग्रुप कॅप्टन खुशाल व्यास, एनसीसी कमांडंट कर्नल जिसांतो, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल राजकुमार सामानंदा, प्राचार्य डॉ सुनिता सोनारे यांना देतात.

# 'शताब्दीची साक्ष : वर्धा सेवाग्रामची पत्रकारिता' ग्रंथाचे आज प्रकाशन

**वर्धा/जनमाध्यम**

पत्रकार राजेश मडावी लिखित 'शताब्दीची साक्ष:वर्धा-सेवाग्राम ची पत्रकारिता' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आज शनिवारी १९ सप्टेंबर दुपारी १२ वाजता सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय, वर्धा येथे आयोजित करण्यात आला आहे. यशवंतराव दाते स्मृती संस्था आणि श्रमिक पत्रकार संघ, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार असून ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. श्रीनिवास खांदेवाले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

संपादक श्रीमंत माने प्रमुख अतिथी व भाष्यकार म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पुस्तकात वर्धा-सेवाग्रामच्या मागील शंभर वर्षाच्या पत्रकारितेचा ऐतिहासिक



प्रवास, त्यामागील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ आणि पत्रकारितेच्या वाटचालीचा मागोवा घेण्यात आला आहे. वर्धा जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनावर पत्रकारितेने उमटविलेल्या ठशाचे दस्तऐवजीकरण करणारे हे पुस्तक असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाला यशवंत राव दाते स्मृती संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते, विदर्भ साहित्य संघाचे वर्धा शाखाध्यक्ष डॉ. राजेंद्र मुंढे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण धोपटे, चंद्रपूर येथील स्तंभ पब्लिशिंग हाऊसचे अविनाश पोईनकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पत्रकार, साहित्यिक, अभ्यासक, विद्यार्थी, वाचक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**विदर्भातील पहिलाच प्रयोग**

विदर्भात जिल्हास्तरीय पत्रकारितेचा सलग आणि अभ्यासपूर्ण मागोवा घेणारा ग्रंथ आजवर उपलब्ध नव्हता. स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाशी घट्ट जोडलेल्या वर्धा, पवनार - सेवाग्रामच्या भूमीतून प्रकाशित होणारा 'शताब्दीची साक्ष : वर्धा-सेवाग्रामची पत्रकारिता (१८८६-१९८६)' हा ग्रंथ विदर्भातील पहिलाच लेखन प्रयोग आहे. त्यामुळे हा ग्रंथ जिल्हास्तरीय पत्रकारितेचा गॅझेट ठरणार आहे.

# गुन्हे वृत्त

## घरात प्रवेश करून सोन्याची पोत लंपास

**पुलगाव** - नाचनगाव रोड परिसरातील घरातून अज्ञात चोरट्याने एक लाख बारा हजार रुपये किमतीची सोन्याची पोत लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सुधीर वसंतराव दानदेव यांनी पुलगाव पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. दानदेव हे रोजमजुरीचे काम करतात. ते कामावर गेल्यानंतर त्यांच्या घरात वृद्ध आई एकटी होती. घराचा दरवाजा उघडा ठेवून आई पहिल्या खोलीत झोपली होती. काही वेळाने शेजाऱ्याने घरातील वस्तू अस्ताव्यस्त असल्याची माहिती दिली. दानदेव घरी परतल्यानंतर त्यांनी कपाटाची पाहणी केली असता त्यातील जुनी खरेदी केलेली सोन्याची पोत गायब असल्याचे आढळले. अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश करून दागिना चोरल्याचा संशय आहे. पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## घरात घुसून मारहाण आणि सामानाची नासधूस

**सेलू** - घरात घुसून शिवीगाळ करीत काठीने मारहाण केल्याप्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मणेश देवराव कोडापे यांनी तक्रार दिली आहे. फिर्यादी यांच्या म्हणण्यानुसार आरोपीने घराचा दरवाजा उघडून जबरदस्तीने घरात प्रवेश केला. त्यानंतर वीजेच्या खांबावर आकडे का टाकले असे म्हणत शिवीगाळ करण्यात आली. यावेळी आरोपीने काठीने मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. मारहाणीमुळे फिर्यादी जखमी झाले. आरोपीने घरातील सामानाची नासधूस करून नुकसान केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीचा जबाब आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण भोयर करीत आहेत.

## हॉकी स्टिकने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी

**वर्धा** - जुन्या वादातून तरुणावर हॉकी स्टिकने हल्ला करून मारहाण केल्याची घटना आनंदनगर परिसरात घडली. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी भंगार विक्रीचा व्यवसाय करतात. ते आनंदनगर मार्गाने घरी जात असताना आरोपी जुबेर शेख उर्फ अब्दुल्ला त्यांच्याजवळ आला. जुन्या वादातून त्याने वाद घालत जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर आरोपीने हातातील हॉकी स्टिकने फिर्यादीच्या डाव्या हातावर डोक्यावर आणि उजव्या पायावर मारहाण केली. या हल्ल्यात ते खाली पडले. त्यानंतरही हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. जखमी अवस्थेत फिर्यादी घरी गेले आणि मित्रासोबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## कंपनीच्या क्वार्टरबाहेरून दुचाकी चोरी

**हिंगणघाट** - कंपनीच्या क्वार्टरबाहेर हँडल लॉक करून उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. या प्रकरणी रामेश्वर गनाजी कडवे यांनी हिंगणघाट पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. कडवे हे गिमा टेक्सटाईल्स कंपनीतील क्वार्टरमध्ये राहतात. त्यांनी आपली होंडा शाईन दुचाकी क्वार्टरच्या बाहेर उभी केली होती. रात्री जेवणानंतर त्यांनी दुचाकी जागेवर असल्याची खात्री केली आणि झोपण्यासाठी क्वार्टरमध्ये गेले. सकाळी ड्युटीवर जाण्यासाठी बाहेर आल्यानंतर दुचाकी जागेवर दिसली नाही. कंपनी परिसरात तसेच आजूबाजूला शोध घेतला असता दुचाकीचा ठावठिकाणा लागला नाही. अज्ञात चोरट्याने सुमारे चाळीस हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे. हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल करून दुचाकीचा शोध सुरू केला आहे.

## घराच्या वादातून महिलेला विटांनी मारहाण

**वर्धा** - घरात राहण्यावरून झालेल्या वादातून महिलेला शिवीगाळ करून विटांनी मारहाण केल्याची घटना गांधी नगर परिसरात घडली. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी महिला घरात स्वयंपाकासाठी भाजी कापत असताना तिचा भाऊ रतन महाजन त्याची पत्नी रमा महाजन आणि त्यांची मुले पवन महाजन व नरेश महाजन यांनी शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घरातून निघून जा असे सांगत त्यांनी वाद घातला. यावेळी तिघांनी विटा फेकून मारल्याने महिलेच्या हाताच्या बोटाला डोक्याला आणि पाठीला दुखापत झाली. पवन महाजन याने पावशीने डाव्या मनगटावर मारल्याने जखम झाल्याचा आरोप आहे. जखमी महिलेने रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# वसंत प्राथमिक शाळेतील विकासकामांचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते लोकार्पण

**वर्धा/जनमाध्यम**

वसंत प्राथमिक शाळा, नगरपरिषद वर्धा येथे विविध विकासकामांचे लोकार्पण आज महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत विकासकामांच्या लोकार्पणाची फीत कापून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. शाळेच्या विकासाच्या दृष्टीने झालेल्या या कामांमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षण सेवक योगेश गिरी यांनी केले. डॉ. पंकज भोयर यांचा नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार



करण्यात आला. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर, नगरसेवक सचिन होले, प्रियांका खंडार, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अफरोजा शेख, मुख्याध्यापिका प्रणिता आखतकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास शिक्षण सल्लागार, सेवानिवृत्त शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालकवर्ग, विद्यार्थी व प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वसंत शाळेच्या विकासासाठी झालेल्या या कामांमुळे शाळेच्या शैक्षणिक वातावरणाला अधिक बळ मिळाले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही कामे निश्चितच उपयुक्त ठरणार आहेत, असे मत व्यक्त करण्यात आले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका प्रणिता आखतकर यांनी केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - २९३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या निवासस्थानी महालक्ष्मी मातेचे विधिवत पूजन

## सुख-समृद्धीसह शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी साकडे

**मोझरी/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक आणि पारंपरिक वारशाचे प्रतीक असलेल्या महालक्ष्मी अर्थात गौरी मातेचे आगमन आणि पूजनाचा सोहळा मोझरी येथे भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. माजी मंत्री तथा काँग्रेस नेत्या ॲड. यशोमती ठाकूर यांच्या मोझरी येथील निवासस्थानी दरवर्षीच्या परंपरेनुसार महालक्ष्मी मातेची विधिवत प्रतिष्ठापना व महापूजा करण्यात आली.



या मंगलप्रसंगी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतराव वानखडे आणि ॲड. यशोमती ठाकूर यांच्या मातोश्री पुष्पमाला ठाकूर यांच्या हस्ते गौरी मातेची प्रतिष्ठापना व पूजन करण्यात आले. यावेळी ठाकूर कुटुंबीयांसह काका राजीव ठाकूर, सुपुत्र यशवर्धन, आकांक्षा तसेच मोझरी व परिसरातील नागरिक, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक गीते, मंगलमय वातावरण आणि भक्तिभावाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या पूजन सोहळ्यात शेतकरी, कष्टकरी, मजूर, तरुण, महिला आणि सर्वसामान्य जनतेच्या सुख-समृद्धीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. बळीराजाच्या कष्टाला योग्य मोबदला मिळावा, शेतकरी संकटमुक्त व्हावा, तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि प्रत्येक कुटुंबाच्या जीवनात सुख, समाधान व समृद्धी नांदावी, यासाठी महालक्ष्मी मातेचरणी साकडे घालण्यात आले. यावेळी खासदार बळवंतराव वानखडे यांनीही महालक्ष्मी मातेचे दर्शन घेऊन अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या सुख, शांती, आरोग्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

महालक्ष्मी पूजनाच्या निमित्ताने ठाकूर कुटुंबीय, आप्तेष्ट, नागरिक आणि महिला भगिनींच्या उपस्थितीने मोझरी परिसरात दिवसभर भक्तिमय आणि मंगलमय वातावरण पाहायला मिळाले. पारंपरिक श्रद्धा, संस्कृती, कौटुंबिक जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम या पूजन सोहळ्यात अनुभवायला मिळाला.

# बागडे लेआउट मध्ये बिबट्याची दहशत

## -सीसीटीव्हीमध्ये बिबट झाला कैद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वडाळी परिसरातील बागडे ले आऊटच्या आसपास गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर आढळून आल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोहरा जंगलाच्या लगतचा हा परिसर आहे. १४ सप्टेंबर रोजी मध्यरात्रीनंतर बिबट्या आल्याचे येथील सीसीटीव्हीत कैद झाले आहे. समाज माध्यमांवर सदर व्हिडिओ प्रसारित झाला आहे. १४ सप्टेंबर रोजी रात्री १ वाजून २७ मिनिटांनी राहुल मेश्राम यांच्या घरासमोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या स्पष्टपणे कैद झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राहुल मेश्राम यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा बिबट्या या परिसरात नेहमीच येत असून यापूर्वी त्याने परिसरातील अनेक कुत्र्यांची शिकार केल्याचेही सांगण्यात येत



आहे. बागडे लेआऊट परिसरात तर अनेक ज्येष्ठ नागरिक मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडतात. अशा परिस्थितीत बिबट्याचा वावर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

वन विभागाच्या पथकाने परिसराची पाहणी करून बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवावेत आणि आवश्यक ती बंदोबस्ताची उपाययोजना करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. माहितीनुसार, रात्री बिबट्या आजूबाजूला फिरताना दिसतो. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी परिसरात सामसूम असताना गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर अधिक जाणवत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. बिबट्याच्या हालचाली लक्षात घेता नागरिकांनी रात्री एकटे बाहेर पडू नये, तसेच घरा बाहेर किंवा परिसरात कचरा टाकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मंगरूळ चव्हाळा शिवसेना शाखाप्रमुख पदावर जगदीश कल्हाने यांची नियुक्ती

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शाखाप्रमुख म्हणून जगदिश कल्हाने यांची नियुक्ती नुकतीच तालुकाप्रमुख प्रमोद कोहळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. मंगरूळ चव्हाळा येथे शाखाप्रमुख म्हणून गेल्या पंचवीस वर्षापासून विनोद पिंपळकर हे शाखा प्रमुखाचे काम सांभाळत होते. त्यांच्या काळातच वीस वर्ष शिवसेनेचा सरपंच सुद्धा राहिला आहे. परंतु त्यांच्याच पुढाकारातून जगदिश कल्हाने यांची शिवसेना शाखाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. जगदिश कल्हाने अतिशय मानामिळाऊ व्यक्तिमत्व असून सर्वांसोबत प्रेमाचे संबंध ठेवणारे व जनसामान्याचे काम करणारे नेतृत्व आहे. अशा माणसास शिवसेनेचे शाखाप्रमुख दिल्यामुळे मंगरूळ चव्हाळा शिवसेना शाखेत आनंदाचे वातावरण आहे. सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# नभ प्रकाशन चे रवींद्र डाहाके यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील प्रतिथयश प्रकाशक नभप्रकाशन चे संचालक रवींद्र भीमरावजी डाहाके यांचे आज सकाळी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी ते ५३ वर्षाचे होते.



स्वर्गीय मिलिंद डाहाके व स्वर्गीय रवींद्र डाहाके यांनी नभ प्रकाशनाच्या माध्यमातून १००० च्या वर पुस्तकांची निर्मिती केली असून त्यांनी प्रकाशित केलेल्या अनेक पुस्तकांना शासनाच्या वतीने व विविध सामाजिक संस्थांच्या वतीने पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

रवींद्र डाहाके यांच्या मागे वडील भीमरावजी डाहाके, आई नलिनी , पत्नी माधुरी ,मुली गार्गी व नविका आदिंसह मोठा आप्तपरिवार आहे. रवींद्र डाहाके यांच्यावर आज सायंकाळी हिंदू स्मशानभूमी अमरावती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विद्युत खांब रस्त्याच्या मधोमध

## -वाहतुकीसाठी ठरतोय अडचणीचा

**वरुड/प्रतिनिधीः-** तालुक्यातील एकल विहीर ते करवार मार्गावरील जिचकार रोहित्राजवळील इलेक्ट्रिक खांब रस्त्याच्या मधोमध असल्याने तो वाहतूकीस अडचणीचा ठरत आहे. हा खांब काढण्यासाठी अनेक दिवसांपासून परिसरातील नागरिकांनी महावितरणला लेखी निवेदन दिले आहे.

जामठी, एकल विहीर, लिंगा, करवार येथील शेतकऱ्यांची शेती जास्तीत जास्त याच रस्त्यावर आहे. तसेच तालुक्याच्या ठिकाणी जाण्याकरिता हाच मार्ग असल्याने नागरिकांना आणि शेतकऱ्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. रात्रीच्या वेळी हा खांब



वाहनचालकांना दिसत नसल्याने या खांबावर दुचाकी, ऑटोरिक्षा, बैलगाडी, बस, धडकण्याची भीती आहे. वाहतुकीस अडसर ठरणाऱ्या या खांबामुळे अपघात होऊन जीवितहानी होऊ नये म्हणून हा खांब तत्काळ हटविण्याची मागणी सातत्याने होत आहे. तरीसुद्धा महावितरण विभाग कुंभकर्णी झोपेत आहे.



**महालक्ष्मी दर्शन**
**अमरावती :** सचिन प्रहलाद दोनोडे

# दोन दिव्यांग मुलींच्या विवाहासाठी मंगळसूत्र दान

## - डॉ. प्रीती रोकडे यांनी घेतला पुढाकार

**अचलपूर/प्रतिनिधीः-** वाढदिवस म्हटला की केक, फुले, शुभेच्छा आणि जल्लोषष्ठमात्र नागपूर येथील डॉ. प्रीती रोकडे यांनी आपल्या वाढदिवसाला या रूढ चौकटीला छेद देत माणुसकीचा अनोखा आदर्श घालून दिला. स्वतःसाठी उत्सव साजरा करण्याऐवजी त्यांनी वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद, मूकबधिर दिव्यांग बालगृहातील दोन बेवारस दिव्यांग मुलींच्या आगामी विवाहासाठी चक्क दोन मंगळसूत्रे दान केली. त्यांच्या या संवेदनशील उपक्रमाने बालगृहातील वातावरण भावूक झाले.

तालुक्यातील वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद, मूकबधिर दिव्यांग बालगृह १९९० पासून बेवारस दिव्यांग मुला-मुलींच्या संगोपनासह त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य करीत आहे. या बालगृहातील अनेक दिव्यांग मुला-मुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. नागपूर येथील डॉ.प्रीती रोकडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग मुलांसोबत आनंद साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी बालगृहाच्या अधीक्षिका प्रमिला नघाटे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून वाढदिवस बालगृहात साजरा करण्याची तसेच दिव्यांग मुलांना भेटवस्तू देण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, बालगृहात कुणाचाही वाढदिवस साजरा केला जात नसल्याचे अधीक्षिका नघाटे यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी दिवाळीनंतर बालगृहातील दोन मूकबधिर दिव्यांग मुलींचे विवाह होणार असल्याचे सांगून, त्यांना विवाहासाठी काही मदत करता



आली तर ती अधिक मोलाची ठरेल, असे त्यांनी सुचविले.

हे ऐकताच डॉ. प्रीती यांनी क्षणाचाही विलंब न करता विवाहासाठी मदत करण्याचा निर्णय घेतला. आपल्या पती प्रवीण रोकडे, आई उषा कवाने, वडील रामकृष्ण कवाने तसेच मुलगा आर्यन रोकडे आणि श्रीजीत रोकडे यांना सोबत घेऊन त्या सकाळी अकरा वाजता बालगृहात पोहोचल्या. यावेळी बालगृहातील ममता आणि पद्मा, या दोन्ही मूकबधिर दिव्यांग मुलींच्या आगामी विवाहासाठी त्यांनी त्यांच्या हाती प्रत्येकी एक मंगळसूत्र ठेवले. मंगळसूत्र देताना दोन्ही मुलींना भरभरून आशीर्वाद देत त्या म्हणाल्या, मला मुली नाहीत; पण आजपासून या दोघी माझ्या मुली आहेत.

संस्थेचे संस्थापक शंकरबाबा पापळकर यांच्या दातृत्वाचे त्यांनी कौतुक केले. दान अनेक प्रकारचे असते; परंतु एखाद्या बेवारस दिव्यांग मुलीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या क्षणी तिच्या संसाराच्या स्वप्नाला हातभार लावणे, हे दान खऱ्या अर्थाने अमूल्य आहे, अशी भावना शंकरबाबा यांनी व्यक्त केली. आजपर्यंत जनतेच्या सहकार्यामुळे बालगृहातील सुमारे ३० बेवारस दिव्यांग मुलींचे विवाह पार पडले आहेत.



**मोर्शी :** जेष्ठ गौरी आगमनाच्या पावन पर्वानिमित्त प्रफुल्ल महल्ले यांच्याह घरी गौरी मातेच्या कृपेने ६० वर्षात स्थापना झाली. सुख,शांती समृद्धी, उत्तम आरोग्य आणि भरभराट लाभो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

# येसुर्णा उर्दू शाळेला अखेर दोन कायमस्वरूपी शिक्षक!

## -पालक, शाळा व्यवस्थापन समितीच्या आंदोलनाला यश

### -विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील येसुर्णा येथील जिल्हा परिषद माध्यमिक उर्दू शाळेत शिक्षकांची कमतरता निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला होता. मागील अनेक दिवसांपासून शिक्षक उपलब्ध नसल्याने शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी संबंधित शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देऊन शिक्षकांची मागणी केली. मात्र, कायमस्वरूपी तोडगा काढण्याऐवजी आजूबाजूच्या गावांतील शाळांमधून तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक उपलब्ध करून देण्याची वेळ प्रशासनावर येत होती. त्यामुळे काही दिवसांनी पुन्हा शिक्षकांचा प्रश्न निर्माण होत असल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.



शिक्षकांची ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी, या मागणीसाठी शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी अखेर शाळा बंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. या आंदोलनादरम्यान शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सै. दुराणी सै. शहिद यांनी नरेंद्र पडोळे यांना आंदोलनस्थळी बोलावले. पडोळे आंदोलनस्थळी पोहोचले असता संबंधित केंद्रप्रमुखही उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवून शाळेला कायमस्वरूपी शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी ठामपणे मांडली.

पडोळे यांनी आंदोलनस्थळावरूनच गटशिक्षणाधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून येसुर्णा शाळेतील शिक्षकांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. कायमस्वरूपी दोन शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. या मुदतीत शिक्षक रुजू न झाल्यास सर्व विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांना सोबत घेऊन अचलपूर पंचायत समितीसमोर बेमुदत शाळा भरविण्याचा इशाराही देण्यात आला होता.

पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून येसुर्णा जिल्हा परिषद माध्यमिक उर्दू शाळेत दोन शिक्षक रुजू झाले आहेत. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून शिक्षकांच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. शाळेत नियमित अध्यापन सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित मूलभूत प्रश्नांकडे वारंवार दुर्लक्ष झाल्यास पालकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, ही बाब या प्रकरणातून अधोरेखित झाली आहे. तात्पुरती व्यवस्था करण्यापेक्षा ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे कायमस्वरूपी भरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे गरजेचे आहे. येसुर्णा शाळेला दोन शिक्षक मिळाल्याने सध्या प्रश्न सुटला असला तरी भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा पालक व ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# खगोलशास्त्र प्रश्नमंजुषा स्पर्धेत घुईखेड येथील टावरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची भरारी

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभाग आणि स्टारगेझर क्लब, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय अंतराळ सप्ताह २०२६ निमित्त आयोजित ऑनलाईन खगोलशास्त्र प्रश्नमंजुषा स्पर्धेत श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अंतराळ, ग्रह-तारे, खगोलशास्त्र, अवकाश संशोधन तसेच विज्ञानविषयक विविध प्रश्नांना आत्मविश्वासाने सामोरे जात उत्कृष्ट कामगिरी केली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. स्पर्धेत त्रिशा मनोज ढोके (इयत्ता सातवी) हिने प्रथम क्रमांक पटकावून विशेष यश संपादन केले. तसेच अश्का अनिस शेख (इयत्ता सातवी) हिने तृतीय क्रमांक, मिताली संदीप गावंडे (इयत्ता सातवी) हिने चौथा क्रमांक आणि श्रद्धा प्रदीप लडके (इयत्ता पाचवी) हिनेही चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन, नियमित अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व आकाशाशा संशोधनाविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांची निरीक्षणशक्ती व तार्किक विचारशक्ती विकसित व्हावी, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक प्रकाश मिरासे तथा शिक्षकवृंद, श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड यांच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. भविष्यातही विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी भरारी घ्यावी, अशा शुभेच्छा संस्थापक कृष्णकुमार टावरी यांच्या मार्फत देण्यात आल्या.

**THE AMRAVATI DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD., AMRAVATI**

**TENDER NOTICE**

1) Sealed Percentage Rate Tender are Invited From The Experienced Contractors registered In Appropriate Class By The Amravati District Central Cooperative Bank LTD., Amravati For The Exterior Contraction of The Following Works.
2) Blank Tender Forms Will Be Issued From Of The Amravati District Central Cooperative Bank LTD., Amravati On Working Days From 19.09.2026 Up To 25.09.2026 Between 11 A.M. To 03 P.M. At The Cost Shown As Below Per copy non Refundable Dully Filled Tender With The E.M.D. In Cash Will Be Received At The Office Of The Amravati District Central Cooperative Bank LTD., Amravati
3) Last Date For Submission of Tenders Shall Be 25.09.2026.
4) The Tender Shall Be Opened On The Meeting Day.
5) Right To Reject Any Or All The Tenders Without Assigning Any Reason is Reserved With The Accepting Authority.
6) Quoted colors and All Other Material of Approved Quality And Make Shall Be Procured By The Contractor
7) Tenders Shall Be Filled In At A Percentage Above or Below With Respect To The Estimated Rate.

| SN | Branch | Name of works | Amount put to Tender | Earnest Money Deposit 1% | Security Deposit 2% | Cost of Each Blank Tender Copy | Time of Completion of work |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Daryapur Branch | New Construction ADCC Bank Building, Rest House, Toilet | 202986 | 202986 | 405972 | 10000 | 15 Months |

The Amravati D.C.C. Bank reserves the right to accept or reject any or all the tenders without assigning any reason whatsoever. In case of any queries kindly contact Estate & property Department on Tel No:0721-2663378/79.

Chief Executive Officer
THE AMRAVATI DCC BANK LTD., AMRAVATI

## जाहीर नोटीस (सुचना)

सर्व आमजनतेस सदहू जाहीर नोटीस व्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्रीमती सारिका सुनील आठवले, रा.लुम्बीनी नगर, अमरावती व सौ.कविता अमोल रायबोले, रा.ताजने लाईन,किशोर नगर, अमरावती व श्री प्रतिक इयानिकराव भटकर व श्रीमती सुभद्रा इयानिकराव भटकर, दोघेही रा.समाधान नगर, अमरावती** यांचे संयुक्त मालकी व ताब्यातील खालील वर्णाकित शेत जमीन असून त्याचे वर्णन येणेप्रमाणे -

**शेतजमिनीचे वर्णन**

मौजे- खोलापुर भाग-१, ता.भातकुली, जि.अमरावती येथील भूमापन क्र.३३७, भो- २, एकुण क्षेत्रफळ ० हे ५३ आर, आकारणी रु.२.७० पैसे, शेत सलीम इतर झाडाझुडपांसह या शेताची चतुःसीमा येणेप्रमाणे -

पूर्वेस - शेत सर्वे क्र.३३८ ते ३४२ पश्चिमेस - सर्वे क्र.३३६
उत्तरेस- रोड दक्षिणेस - सर्वे क्र.३५१

तसेच सदहू शेत जमीन ही इयानिक गणपत भटकर यांची असून त्यांचा मृत्यू झाला असून माझे पक्षकार व श्री प्रतिक इयानिकराव भटकर व श्रीमती सुभद्रा इयानिकराव भटकर हे कायदेशिर वारस असल्याने वरील वर्णाकित शेत जमिनीचे कायदेशिर रित्या वारस असून ७/१२ उतारा व महसूल रेकॉर्ड मध्ये माझे पक्षकार यांचे नावाची नोंद झाली आहे.

माझे पक्षकार यांनी व त्यांचे आईनी श्री प्रतिक इयानिकराव भटकर यास त्यांचे वतीने वरील वर्णाकित शेतजमिनी संबंधी कामे करण्याकरिता, सौदा, व्यवहार व कायदेशिर कार्यवाही करण्याकरिता दस्त क्र.१७३९/२०२६ नुसार दिनांक ११/०९/२०२६ रोजी सहदुय्यम निबंध कार्यालय, भातकुली येथे नोंदणीकृत स्पेशल मुखत्यारपत्र/अधिकारपत्र लेख भूल्थापीने करुन घेतला आहे. परंतु माझे पक्षकार यांना माहिती मिळाली आहे की, श्री प्रतिक इयानिकराव भटकर हा माझे पक्षकार यांनी करुन दिलेले स्पेशल मुख्यतार पत्राचा गैरवापर करुन वरील वर्णनांकित शेतजमिनीमध्ये माझा पक्षकार यांचा असलेला अविभाजीत २/४ हिस्सा गैरकायदेशिररित्या विकण्याचा सौदा करुन त्या संदर्भी व्यवहार व दस्त तयार करीत आहे.

करिता माझे पक्षकार यांनी श्री प्रतिक इयानिकराव भटकर, रा.समाधान नगर, ता.जि.अमरावती यास दस्त क्र.१७३९/२०२६ नुसार दिनांक ११/०९/२०२६ रोजी सहदुय्यम निबंधक कार्यालय, भातकुली येथे नोंदणीकृत स्पेशल मुखत्यारपत्र/अधिकारपत्र लेख रद्द केला आहे. करिता माझे पक्षकार यांनी त्यांचे मालकी व हिश्याची वरील वर्णनांकित शेतजमिनी संबंधी श्री प्रतिक इयानिकराव भटकर याचे सोबत कोणीही इसम/व्यक्ती कोणताही व्यवहार करु नये, तसा काही केल्यास तो माझे पक्षकार यांच्यावर लागू व बंधनकारक राहणार नाही व त्याकरिता माझे पक्षकार हयास जबाबदार राहणार नाही. करिता माझे पक्षकार यांनी त्यांचे वतीने स्पेशल मुखत्यारपत्राचा लेख रद्द केल्याबाबत सदरची जाहीर सूचना सर्व आम जनतेकरिता प्रसिध्द करीत आहे.

**दिनांक :- १८/०६/२०२६**

**ॲड.दीपक एस.चौधरी (जैन)**
**मातृ-स्नेह, सत्यनारायण मंदिर जवळ, रंगारी गल्ली, अमरावती**
**मो.- ९७६६४९१४४८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा

**अमरावती/का.प्र.**

खरीप हंगाम २०२६ मध्ये पावसाच्या तुटीमुळे शेतकरी आणि ग्रामीण जनता अडचणीत आली असून, अमरावती जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त घोषित करून प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने १६ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी आंदोलन करण्यात आले.




किसान सभेचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

राज्याच्या पर्जन्य नोंदणी प्रणालीतील आकडेवारीनुसार अनेक तालुक्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात पावसाची तूट असल्याचा दावा किसान सभेने केला. सरासरीच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळाचे निकष लागू करून शेतकरी आणि ग्रामीण जनतेला तातडीने मदत द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. कर्नाटक सरकारने दुष्काळ जाहीर करून उपाययोजना सुरू केल्याचा दाखलाही किसान सभेने दिला.

आंदोलनादरम्यान मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यासाठी निकष व चौकशी, पीक नुकसानीची तातडीने भरपाई, पीक विम्याची अग्रीम रक्कम, कर्जमाफी व कर्जवसुलीला स्थगिती, नवीन पीक कर्ज, पिण्याचे व सिंचनाचे पाणी, वीज, अन्नसुरक्षा, शेतमालाची शासकीय खरेदी, विशेष दुष्काळ पॅकेज, पर्यावरण तसेच भूसंपादनातील पारदर्शकता आदी मागण्यांचा समावेश आहे.

खरीप २०२६ मधील पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे व सर्वेक्षण करून प्रतिहेक्टर ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील व बागायती पिकांसाठी दुप्पट, तर फळबागांसाठी तिप्पट भरपाई द्यावी आणि नुकसानभरपाईवरील मर्यादा रद्द कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली. पीक विमा योजनेंतर्गत खरीप २०२६ साठी ५० टक्के अग्रीम रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे आदेश विमा कंपन्यांना द्यावेत. आत्महत्याग्रस्त शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना २५ लाख रुपये सानुग्रह मदत आणि त्यांच्या वारसांना शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी किसान सभेने केली.

३० सप्टेंबर पर्यंतची सर्व पात्र कर्जप्रकरणे कर्जमाफीच्या कक्षेत आणावीत तसेच कर्जाचा भरणा केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात दोन लाख रुपये जमा करावेत, अशी मागणी करण्यात आली. खासगी कंपन्या, मायक्रो फायनान्स, ट्रॅक्टर फायनान्स, सावकारी तसेच राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांच्या कर्जवसुलीला स्थगिती द्यावी आणि कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नवीन पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असेही निवेदनात म्हटले आहे.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी व शेतमजुरांच्या पाल्यांचे शैक्षणिक, परीक्षा व वसतिगृह शुल्क माफ करावे, मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, रेशनमधून नियमित व वाढीव धान्यपुरवठा करावा आणि प्रत्येक व्यक्तीला अतिरिक्त पाच किलो धान्य मोफत द्यावे, अशी मागणी करण्यात आली. शेतमालाची एमएसपी (ण२ह्व५०ड्ढ) दराने संपूर्ण खरेदी करावी तसेच कापूस, सोयाबीन, डाळी आणि धानासाठी शासकीय खरेदी केंद्रे सुरू करावीत. प्रत्येक दुष्काळग्रस्त जिल्ह्यासाठी ५०० कोटी रुपयांचे विशेष दुष्काळ पॅकेज जाहीर करावे, वन्यप्राण्यांपासून होणाऱ्या शेती नुकसानीसाठी किमान एकरी ३० हजार रुपये भरपाई द्यावी आणि ई-पीक पाहणीचे जुने सॉफ्टवेअर शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही करण्यात आली. आंदोलनात प्रा. साहेबराव विधळे, अशोक सोनारकर, सुशील ढोले, प्रकाश सोनोने, लक्ष्मणराव धाकडे, मनोहर वाढनकर, किसन लांजेवार, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, सुधीर बारबुदे, पवन भाकरे, सुनील घटाळे, अनिकेत खुळे, जितेंद्र कोरडे, चंद्रकांत वडसकर, सतीश चौधरी, सागर दुर्योधन, जयेंद्र भोगे, राहुल मंगळे, राम जोशी, राजेंद्र दुबे, विष्णु कुऱ्हाडे, संजय सुने यांच्यासह विविध तालुक्यांतील कार्यकर्ते सहभागी झाले.

## आज आझाद हिंद मंडळाचा 'श्री श्याम कीर्तन' सोहळा

**अमरावती/का.प्र.**

आझाद हिंद मंडळ, बुधवारा, अमरावतीच्या वतीने मंडळाच्या ९९ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीच्या निमित्ताने शनिवार, १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता 'श्री श्याम कीर्तन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या भक्तिमय कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक छोटू सिह रावणा (प्रसिद्ध गायक – तीन बाण के धारी) यांच्यासह मयंक छांगणी आणि सुमित बावरा हे भजनगायक भक्तिगीतांची मेजवानी सादर करणार आहेत.

'एक श्याम खाटू श्याम बाबा के नाम...' या भक्तिमय भावनेने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात श्री श्याम भक्तांना आध्यात्मिक आणि संगीतमय अनुभव घेता येणार आहे. त्यामुळे अमरावती शहरासह परिसरातील भाविकांमध्ये कार्यक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. भाविकांसाठी विशेष पार्किंग व्यवस्था कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन आझाद हिंद मंडळाच्या वतीने पार्किंगची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. वाहनतळासाठी पुढील ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत.

नेहरू मैदान गांधी चौक येथील वाहनतळ रामकृष्ण क्रीडा विद्यालयाचे प्रांगण हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रांगण भाविकांनी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आपली वाहने निर्धारित पार्किंगस्थळीच उभी करून पार्किंग व्यवस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन आझाद हिंद मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. शनिवारची ही भक्तिमय संध्या श्री श्याम भक्तांसाठी अविस्मरणीय ठरणार आहे.

## नेरपिंगळाईत घराला लागलेल्या आगीत संसाराची राखरांगोळी

**लेहेगाव/वार्ताहर**

दुपारच्या सुमारास अचानक लागलेल्या आगीने एका कुटुंबाचा वर्षानुवर्षे उभा केलेला संसार क्षणात उद्ध्वस्त झाल्याची हृदयद्रावक घटना नेरपिंगळाई येथील सावकरपुरा, वार्ड क्रमांक १ मध्ये घडली. येथील रहिवासी अजबराव भालेराव यांच्या घराला बुधवारी १६ सप्टेंबर दुपारी साडेचार ते पाच वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत घरातील संपूर्ण कपडे, संसारोपयोगी साहित्य, १ लाख १० हजार रुपयांची रोख रक्कम तसेच सोने-नाणे जळून खाक झाल्याची माहिती आहे.

आग लागली त्यावेळी अजबराव भालेराव यांचे कुटुंब बाहेरगावी गेलेले होते, तर अजबराव भालेराव स्वतः शेतात गेले होते. त्यामुळे घरात कोणीही नसताना अचानक आग भडकली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने घरातील संसारोपयोगी साहित्य आणि मौल्यवान वस्तू आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. अजबराव भालेराव यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, या दुर्दैवी आगीमुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे.



### रोख रकमेसह कपडे व सोने जळून खाक लाखो रुपयाचे नुकसान

घरातील आवश्यक वस्तू, कपडे, बचतीची रोख रक्कम आणि सोने-नाणे जळून गेल्याने वर्षानुवर्षे कष्टाने उभा केलेला संसार क्षणात राखेत बदलला असून कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे. घराला आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीचा प्रयत्न केला. मात्र आगीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

वृत्त लिहीपर्यंत या घटनेचा शासकीय पंचनामा झालेला नव्हता. प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा आणि आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या भालेराव कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातून होत आहे. सदर आगीत घर जळालेल्या आपत्तग्रस्त कुटुंबाला मोर्शी पंचायत समितीच्या माजी उपसभापती सोनाली नवले यांनी भेट देऊन या आपतग्रस्त पीडित कुटुंबाला तातडीने पाच हजार रुपयाची मदत केली.

या आगीत अजबराव भालेराव यांच्या कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संकटात सापडलेल्या कुटुंबाला मदतीचा हात मिळावा, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## नगर परिषदेच्या ताफ्यात 'सक्शन व जेटिंग' मशीन

### जुळ्या शहरात स्वच्छता मोहिमेला मिळणार गती

**अचलपूर/वार्ताहर**

राज्य शासनाच्या वतीने अचलपूर नगरपालिकेला अत्यंत अत्याधुनिक 'सक्शन व जेटिंग' (मल व नाली उपसा) मशीनयुक्त नवीन वाहन प्राप्त झाले आहे. या वाहनाचा शुभारंभ कार्यक्रम अचलपूर नगरपरिषदेत मान्यवरांच्या हस्ते उत्साहात पडला. नवीन टाटा कंपनीच्या वाहनाचा शुभारंभ नगराध्यक्ष रूपाली अभय माथने यांच्या शुभहस्ते व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



यावेळी आरोग्य सभापती शमशेर खान बिसमील्ला खान, नियोजन व विकास सभापती दर्शना मोहनसिंह ठाकूर, नगरसेविका अपर्णा रोडे, नगरसेवक ल.ज. दीक्षित, फिरोज खान, असलम वंजारा, अभय माथने, कलीम शाह, मुख्याधिकारी धिरज गोहाड, आरोग्य अधिकारी रविश रामटेके, अमोल वऱ्हाडे आणि यांसह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आधुनिक वाहनामुळे अचलपूर - परतवाडा शहरातील प्रत्येक प्रभागातील व वार्डातील बंद पडलेल्या अथवा तुंबलेल्या नाल्यांची स्वच्छता करणे तसेच शोषखड्डयांची (शौचालय टाकी) सफाई करणे अत्यंत सोपे होणार आहे. या मशीनच्या मदतीने जलद आणि प्रभावीपणे गाळ व कचरा उपसला जाईल, ज्यामुळे नागरिकांना दुर्गंधी व साथीच्या रोगांपासून मोठा दिलासा मिळणार आहे. हे नवीन वाहन ताफ्यात दाखल झाल्याने अचलपूर शहराच्या स्वच्छता अभियानाला नवी दिशा आणि गती मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## कबड्डी स्पर्धेत श्रीराम हायस्कूलचा विजयी झेंडा

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भातकुली तालुकास्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडली.

मातोश्री अनुसया विद्यामंदिर, वाठोडा शुक्लेश्वर येथे झालेल्या या स्पर्धेत श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, टाकरखेडा शंभू येथील १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करीत विजेतेपद पटकावले.

या विजयामुळे संघाची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेदरम्यान श्रीराम हायस्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळासह आक्रमक चढाया आणि भक्कम बचावाचे प्रदर्शन केले. विजयी



### संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

संघात शिवराज जामूनकर, विनोद माथनकर, नमन लांडगे, तुळशीराम बारस्कर, नैतिक बांडबुचे, युवराज बारस्कर व अरविंद कासदेकर यांचा समावेश आहे. या खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक संतोष देशमुख व अतुल घुरडे यांचे मार्गदर्शन लाभले.

संघाच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा नीलंबरी देशमुख, उपाध्यक्ष विशाल देशमुख, सचिव स्वाती देशमुख, सदस्य इंदु देशमुख व प्रदीप देशमुख तसेच प्राचार्य उमेश सोलव यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले.

यावेळी शिक्षक सविता बेलसरे, शैलेश डहाके, सुनील प्रांजळे, नरेंद्र सांगोले, सुरज देशमुख, संगीता लोहेकर, रिता धनैया, प्रशांत मालवे तसेच शिक्षकेतर कर्मचारी दीपक हंबर्डे व सुनंदा देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

श्रीराम हायस्कूलच्या कबड्डी संघाच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## 'एक गाव, एक गणपती'ची ३० वर्षांची परंपरा कायम

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अंजनगाव बारी परिसरातील १७ गावांनी गेल्या ३० वर्षांपासून 'एक गाव, एक गणपती' ही परंपरा जपली आहे. गावातील नागरिक एकत्र येऊन एकाच गणेशमूर्तीची स्थापना करीत असल्याने गणेशोत्सवात सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचे दर्शन घडत आहे. या उपक्रमाबद्दल संबंधित पोलीस प्रशासनाकडून गावातील ग्रामप्रमुखांचा गौरवही करण्यात आला आहे.



या उपक्रमात पार्डी (देवी), उतखेड, अऱ्हाड-कुऱ्हाड, वडगाव जिरे, मोगरा, कस्तुर, भानखेड, गोविंदपूर, वळद, मासोद, हाताला, इंदला, अलियाबाद, टिमटाळा, खिरसाना, अडगाव (बु.) तसेच मांजरी-म्हसला-रहिमापूर या तीन गावांचा संयुक्त गणपती अशा गावांचा समावेश आहे.

'एक गाव, एक गणपती'मुळे गणेशोत्सव काळात पोलीस प्रशासनावरील बंदोबस्ताचा ताण कमी होतो. अनेक गावांमध्ये केवळ एक-दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत विसर्जन सोहळा शांततेत पार पडतो. दहा दिवसांच्या उत्सवात भजन, कीर्तन, प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच स्पर्धा परीक्षांसंबंधी उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये महिला, पुरुष आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

यंदाच्या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने अनंत चतुर्दशीला परिसरातील गणेश मंडळांनी मिरवणुका काढून गणेशमूर्तींचे कोंडेश्वर तलावावर भावपूर्ण विसर्जन केले.

लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळ, न्यू आझाद गणेशोत्सव मंडळ, श्री गुरुदेव गणेशोत्सव मंडळ, चंदनशेष गणेशोत्सव मंडळ, अकरावा महारुद्र हनुमान मंदिर गणेशोत्सव मंडळ तसेच विविध भजनी मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात सहभाग घेतला.

विसर्जन सोहळा शांततेत पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक बंदोबस्त ठेवला होता. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडून कोंडेश्वर तलाव परिसरात आवश्यक व्यवस्था करून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी दक्षता घेण्यात आली.

## संक्षिप्त

### ऑपरेशन कवचअंतर्गत दुचाकीस्वारांना हेल्मेट वाटप

**आसेगाव पूर्णा** - आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याच्या वतीने 'ऑपरेशन कवच'अंतर्गत १७ सप्टेंबर रोजी दुचाकीस्वारांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले. दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करून स्वतःच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याबाबत यावेळी जनजागृती करण्यात आली. रस्ते अपघातांमध्ये दुचाकीस्वारांच्या डोक्याला गंभीर दुखापत होण्याचे प्रमाण लक्षात घेता हेल्मेट वापरणे अत्यंत आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले. वाहतूक नियमांचे पालन करावे, वेगावर नियंत्रण ठेवावे तसेच दुचाकी चालविताना हेल्मेटचा नियमित वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमावेळी परिक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती वैशाली भोये, आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सतीश खेडेकर तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलिसांच्या या उपक्रमाचे दुचाकीस्वारांनी स्वागत केले.



### ऋषिपंचमीचा भक्तिमय सोहळा उत्साहात

**अमरावती** - न्यू बायपास रोड, मंगलधाम कॉलनी, राधिका नगर येथील विठ्ठल-रुख्मिणी मंदिराजवळ लता दिवाकर ठाकरे यांच्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे यंदाही ऋषिपंचमीचा कार्यक्रम थाटामाटात व भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी ठाकरे परिवारासह भाविक भक्तांनी महाराजांच्या चरणी बळीराजासाठी साकडे घातले. यंदा शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब तसेच कष्टकरी बांधवांना भरभराटीचे व यशाचे वर्ष लाभावे, त्यांच्या कष्टाला चांगले फळ मिळावे आणि सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी मनोभावे प्रार्थना महाराजांच्या चरणी करण्यात आली. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी आयोजक लता ठाकरे, अभिजीत ठाकरे, श्रुती ठाकरे, प्रणव ठाकरे, पूजा ठाकरे यांच्यासह समस्त ठाकरे परिवार व भाविक भक्तांची उपस्थिती होती.



### प्रा. ज्ञानेश्वर गटकर शुक्रवारी दूरदर्शनवर

**अमरावती** - आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) एक्स्पर्ट प्रा. ज्ञानेश्वर गजानन गटकर यांची मुलाखत शुक्रवार २५ सप्टेंबर दुपारी १२ वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'हॅलो सह्याद्री' या कार्यक्रमातून प्रक्षेपित केली जाणार आहे. ख्यातनाम निवेदक नितीन भट यांनी डॉ. गटकर यांच्याशी संवाद साधला आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी, आव्हानं आणि भविष्य' हा मुलाखतीचा विषय आहे. नागपूर दूरदर्शनच्या नुकतेच मुलाखतीचे चित्रीकरण पार पडले. 'ज्ञानपथ' या दिवाळी अंकाचे संपादक म्हणूनही ते काम बघतात. अनेक संस्था आणि समित्यांचे ते पदाधिकारी असलेल्या प्रा.गटकर यांचा 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (कृत्रिम बुद्धिमत्ता) या विषयाचा सखोल अभ्यास आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानाचा वेगाने झालेला प्रसार, मानवी बुद्धिमत्ता आणि ए.आय. तंत्रज्ञानाची बुद्धीमत्ता यातील मूलभूत फरक, यामुळे भारतात होत असलेले क्रांतीकारी बदल, तरुणाईला रोजगाराच्या क्षेत्रात ए.आय. काय देणार, शेती, व्यवसाय, शिक्षण क्षेत्रासाठी या तंत्रज्ञानाची उपयुक्तता, प्रादेशिक भाषांसाठी वरदान, एआयमुळे नोकऱ्या जाण्याची भीती कितपत खरी आह, कोणत्या क्षेत्रातल्या नोकऱ्या धोक्यात येऊ शकतात किंवा कोणत्या क्षेत्रातल्या नोकऱ्या सुरक्षित राहतील, एआयच्या वापरातून तयार होणारे फेक व्हिडिओ, बातम्या, आवाजाची नक्कल या फसवणुकीपासून कसं वाचावं, एआयमुळे माणसाची धोक्यात आलेली प्रायव्हसी, भविष्यकाळात एआयचे जग कुठे असेल आदी विषयांवर प्रा. गटकर या मुलाखतीतून भाष्य करणार आहेत. या कार्यक्रमाच्या निर्मात्या रचना पोपटकर-गजभिये असून निर्मिती सहाय्य मिलिंद नेटके यांचे आहे. हा कार्यक्रम आवर्जून बघावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### कस्तुराबाई जैन विद्यालयात कार्यशाळा

**शिराळा** - महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा द्वारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा येथे विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक मातीचे गणपती तयार करण्याचे शिकवण्यात आले. विद्यालयातील कलाशिक्षक चव्हाण यांचे मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना मातीच्या विविध कलाकृती हाताने तयार करण्याचे शिकवण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी हातांनी मातीचे गणपती, बैल जोडी व पणत्या तयार केल्या यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस आर देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक मातीचे गणपती घरी बसवण्याचे आवाहन केले व निर्माल्य व्यवस्थापनाची माहिती दिली. यावेळी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### 'ध्येयनिर्मिती : आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' विषयावर व्याख्यान

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जीवतंत्रशास्त्र विभागातर्फे 'ध्येयनिर्मिती : आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर नुकतेच विशेष व्याख्यान संपन्न झाले. विद्यापीठाच्या सेवानिवृत्त सहा. कुलसचिव डॉ. स्मिता साठे यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैयक्तिक व व्यावसायिक ध्येय निश्चित करणे, त्यांचा पाठपुरावा करणे आणि ती प्रभावीपणे साध्य करण्यासाठी वैज्ञानिक नियोजन आणि आध्यात्मिक ज्ञानाचा मेळ कसा घातल्या जातो, हे सउदाहरण सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.प्रशांत ठाकरे, सुदर्शन कोवे, अनघा उंदिरवाडे, मैथिली उगले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# १० किलो गांजासह दोन तस्करांना अटक

## बडनेरा रोडवर कारवाई; फरार आसिफ पंजाचा शोध सुरू

### -ओडिशातून गांजा आणला अमरावतीत



**अमरावती/प्रतिनिधीः-** ओडिशातील झारसुगुडा येथून गांजा खरेदी करून अमरावतीत आणणाऱ्या दोघांना गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने बडनेरा रोडवरील बगिया टी-पॉइंट परिसरात सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून तब्बल १० किलो गांजा जप्त करण्यात आला. तनवीर खान हाशिम खान (वय २२, रा. हैदरपुरा) आणि फैजान शाह अमिन शाह (वय १९, रा. रहमत नगर, अमरावती) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत.

गुन्हे शाखा युनिट-२ला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती. त्यानुसार तनवीर खान आणि फैजान शाह हे अमरावतीतील आसिफ पंजा याच्यासाठी झारसुगुडा (ओडिशा) येथून गांजा खरेदी करून आणत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष बडनेरा रोडवरील बगिया टी-पॉइंट येथे सापळा रचला. दोघे संशयित तेथे आढळून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्याकडे १० किलो गांजा आढळून आला. याप्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणातील आसिफ पंजा हा फरार असून, त्याचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली ☞(पान २ वर)

# पैशांच्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

## चाकूने डोक्यासह चेहऱ्यावर वार

### गंभीर अवस्थेत उपचारासाठी नागपूरला हलविले



**अमरावती/प्रतिनिधीः-** पैशांच्या व्यवहारावरून आधी झालेल्या वादाचे पर्यवसान चाकूहल्ल्यात झाल्याची घटना काँग्रेसनगर रोड परिसरात गुरुवारी मध्यरात्री घडली. शेख सोहेल शेख सलीम (वय ३६, रा. अकोटफैल) याच्यावर पाच ते सहा जणांनी हल्ला केल्याचा आरोप असून, या हल्ल्यात त्याच्या डोक्यासह चेहऱ्यावर चाकूने वार करण्यात आले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, शेख सोहेल आणि संशयित आरोपींची रेल्वेने बडनेरा-अकोला दरम्यान ये-जा होती. रेल्वे प्रवासादरम्यान पाकीटमारी करून मिळणाऱ्या पैशांच्या वाटणीवरून त्यांच्यात वाद असल्याची माहिती पोलिसांच्या चौकशीतून समोर आली आहे. याच पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोहेल आणि बादल बागवाले यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी सोहेलने बादलला मारहाण केल्याची माहिती आहे. या घटनेनंतर गुरुवारी मध्यरात्री दोन ते तीन वाजताच्या सुमारास सोहेल काँग्रेसनगर रोड परिसरात थांबला असताना बादल बागवाले, हरिष बोबडे यांच्यासह पाच ते सहा जण तेथे आले. त्यांनी सोहेलवर हल्ला केल्याचा आरोप आहे. हल्ल्यात चाकूने वार झाल्याने तो गंभीर जखमी झाला.

घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमीला रुग्णालयात दाखल केले. प्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. इतर आरोपींचा शोध सुरू असून, हल्ल्यामागील नेमके कारण आणि पूर्वीच्या वादाची पार्श्वभूमी तपासली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत.

# लाथ मारून ढकलल्याने जखमी वृद्धाचा मृत्यू

## पिता-पुत्रावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेताकडे फेरफटका मारण्यासाठी गेलेल्या ६० वर्षीय वृद्धाचा दोन व्यक्तींशी झालेला वाद जीवघेणा ठरला. हातातील काठी ओढून वाद घातल्यानंतर लाथ मारून जोरात ढकलल्याने वृद्ध खाली पडले आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रुग्णालयात उपचारासाठी नेल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुलतानपुर बसस्थानक परिसरात १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ही घटना घडली. गजानन हाडके (वय ६०, रा. सुलतानपुर, ता. नांदगाव खंडेश्वर) असे मृत वृद्धाचे नाव आहे. या प्रकरणात त्यांचा मुलगा अक्षय गजानन हाडके (वय ३३) याने दिलेल्या फिर्यादीवरून नानाजी भीमराव बनसोड आणि प्रफुल नानाजी बनसोड (वय ३०, दोघेही रा. सुलतानपुर) यांच्याविरुद्ध पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, गजानन हाडके हे नेहमीप्रमाणे शेतात चक्कर मारण्यासाठी घराबाहेर पडले होते. सायंकाळी पावणेसहा ते सहा वाजताच्या दरम्यान ते सुलतानपुर बसस्थानकाच्या पश्चिमेकडील भागातून जात असताना भीमराव बनसोड याने त्यांच्या हातातील काठी ओढली. त्यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. वाद सुरू असतानाच प्रफुल बनसोड तेथे आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्याने गजानन हाडके यांना लाथ मारून जोरात ढकलल्याचा आरोप आहे. त्यामुळे हाडके खाली कोसळले आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने नांदगाव खंडेश्वर येथील कारमोरे रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. घटनेनंतर तळेगाव ☞(पान २ वर)

# यास्मीननगर चौकात चाकू घेऊन फिरणारा आरोपी अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील यास्मीननगर चौक परिसरात चाकू घेऊन फिरणाऱ्या एका इसमास पोलिसांनी अटक केली. ही कारवाई पोलिसांनी केलेल्या गस्तीच्या वेळी करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, शेख इमरान शेख कासम (वय ३७, रा. गुलिस्ताननगर, अमरावती) हा यास्मीननगर चौक परिसरात संशयास्पदरीत्या चाकू घेऊन फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे धारदार चाकू मिळून आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चाकू जप्त केला. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्टच्या कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी धारदार शस्त्र घेऊन फिरणाऱ्या आरोपीविरुद्ध पोलिसांनी ही कारवाई केली. परिसरात शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलिसांकडून गस्त वाढविण्यात आली असून संशयास्पद हालचाली करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नागपुरी गेट पोलिस करीत आहेत.

# तडीपार आरोपीला अटक


## -राजापेठ पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** दोन वर्षांसाठी अमरावती शहर व ग्रामीण परिसरातून तडीपार करण्यात आलेला इसम पोलिसांच्या हाती लागला आहे. आदित्य रमेश आमटे (वय २३, रा. सरोज कॉलनी, सुतगिरणी रोड, अमरावती) याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १४२ अन्वये कारवाई करण्यात आली. १८ सप्टेंबर रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या आदेशानुसार राजापेठ पोलीस ठाण्याचे डीबी पथक हद्दीत गस्त घालत होते. यावेळी तडीपार इसम आदित्य आमटे हा पोलिसांना आढळून आला. तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ८१२/२०२६ नुसार कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सार्वजनिक उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये ☞(पान २ वर)

# चार ठिकाणी अवैध धंद्यांवर धाडी; पाच जणांवर गुन्हे

## दारूसह जुगार साहित्य जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अवैध दारूविक्री आणि जुगारधंद्यांवर ग्रामीण पोलिसांनी कारवाईचा वेग वाढविला आहे. 'ऑपरेशन कवच'अंतर्गत १७ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत केलेल्या कारवाईत पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत पाच जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई करत देशी दारूच्या ३४ पावट्या, जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण २ हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी गौरखेडा परिसरात कारवाई करून संजय सहदेव वानखडे (वय ३६) याच्याविरुद्ध अवैध दारूविक्रीचा ☞(पान २ वर)

# दुचाकी चोर जेरबंद

## चोरीची दुचाकी शोधताना दुसरे वाहनही सापडले




**अमरावती/प्रतिनिधीः-** चैतन्य कॉलनी परिसरातून गायब झालेल्या दुचाकीचा माग काढताना फ्रेजरपुरा पोलिसांच्या तपासाला यश आले. पोलिसांनी सतीश भिकाजी बहाळ (वय ३५, रा. बार्शीटाकळी, जि. अकोला) याला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून चोरीच्या दोन दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. जप्त वाहनांची किंमत सुमारे ८५ हजार रुपये आहे.

महादेव खोरी येथील अनिल रामकृष्ण विलायतकर (वय ५३) हे १ एप्रिल रोजी कामानिमित्त चैतन्य कॉलनी येथे गेले होते. त्यांनी आपली चॉकलेटी रंगाची होंडा ॲक्टिव्हा ५-जी (एमएच २७-सीएल-२६७८) तेथे उभी केली होती. काम आटोपून परतल्यानंतर वाहन जागेवर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिसरात शोध घेऊनही वाहन मिळाले नाही. अखेर त्यांनी फ्रेजरपुरा पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलीस ठाण्यात कलम ३०५(ब) बीएनएस अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपास पथकाने घटनास्थळाची पाहणी करत परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. चोरीस गेलेल्या वाहनाचा माग काढण्यासाठी तांत्रिक तपास सुरू असतानाच पोलिसांना संशयिताबाबत ☞(पान २ वर)

# सराईत गुन्हेगार तडीपार

## -राजापेठ पोलिसांची मोठी कारवाई





**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कठोर पावले उचलली जात आहेत. याच मोहिमे अंतर्गत राजापेठ पोलिसांनी परिसरातील कुख्यात आणि सराईत गुन्हेगार अनुज ढवळे याच्यावर कडक कारवाई करत त्याला शहर आणि ग्रामीण हद्दीतून २ वर्षांसाठी तडीपार केले आहे.माहिती नुसार, आरोपी अनुज उमेश ढवळे (वय २२, रा. सरोज कॉलनी) याच्या विरोधात राजापेठ पोलीस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, दंगल भडकवणे, जबरी चोरी यांसारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या सततच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.पोलीस उपायुक्त यांनी त्याला २ वर्षांच्या कालावधीसाठी शहर व ग्रामीण हद्दीतून हद्दपार करण्याचा आदेश जारी केला आहे. तसेच विक्की उर्फ गणेश मधुकर खडसे (वय ३०, रा. कलोती नगर ) याच्यावर कलम १४२ अन्वये कारवाई करून त्याला ताब्यात घेण्यात आले.अक्षय मारोतराव इंगोले याच्या विरोधात मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस आयुक्त राकेश ओला,उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे, पोलीस कर्मचारी मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खंटे, रवि लिखितकर, अंकुश काळे, अमोल खंडझोड, प्रशांत बेलोकार, रफीक खान, आबिद शेख, सतीश टपके, आकाश यादव, अर्जुन कदम, पंकज गाले आणि अमोल देशमुख यांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

# शहरात 'मराठी कारण आणि महाराष्ट्र धर्म' शिबिर आज

## मराठी अभ्यास केंद्राचा पुढाकार



**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठी भाषा, संस्कृती आणि शाळा वाचवण्याच्या मोठ्या उद्देशाने आज शनिवार,१९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात 'मराठी कारण आणि महाराष्ट्र धर्म' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात शुक्रवारी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांनी माहिती दिली.

डॉ. पवार यांनी आरोप केला की, महाराष्ट्रात मराठी भाषेचे अस्तित्वच धोक्यात आणले जात आहे. मराठी बोलण्यास नकार देणे, मराठी ऐवजी हिंदी-गुजरातीची सक्ती करणे, तसेच छठ पूजा आणि कावड यात्रेची संस्कृती महाराष्ट्रात आणली जात आहे. विकासाच्या नावाखाली विनाशकारी प्रकल्प राबवले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.ते म्हणाले, महाराष्ट्राची शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचारांची पुरोगामी परंपरा जपण्यासाठी हे 'मराठी कारण' आणि 'महाराष्ट्र धर्म' आंदोलन असल्याचा दावा त्यांनी केला.या शिबिरात डॉ. दीपक पवार हे 'संयुक्त महाराष्ट्राचा दुसरा लढा' या विषयावर, डॉ. प्रकाश परब हे 'भाषा आणि धर्मकारण' या विषयावर, प्रथमेश पाटील हे 'महाराष्ट्रातील विनाशकारी प्रकल्प' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. महाराष्ट्राच्या जनतेच्या हितासाठी हे शिबिर आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.धनाढ्य गुजर-मारवाडी आणि उत्तर भारतीयांचे वर्चस्ववादी स्थलांतर महाराष्ट्रात होत ☞(पान २ वर)





**अमरावती/प्रतिनिधीः-**अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी त्यांच्या गाडगे नगर स्थित निवासस्थानी तमाम स्नेहीजण व अमरावतीकरांची मोठी गर्दी दिसून आली. यावेळी आमदार महोदयांनी सर्वांची भेट घेत , त्यांच्याशी संवाद साधत शुभेच्छाचा स्वीकार केला. आ. सुलभा खोडके यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी शहरातील समाजकारण, राजकारण, सहकार, प्रशासन,शिक्षण , उद्योग , व्यापार, क्रीडा, पत्रकारिता , साहित्य. विश्वस्त मंडळे, तसेच विविध सामाजिक संघटना व संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्नेहीजण , हितचिंतकांनी मोठी उपस्थिती होती.

# अंजनगाव सुर्जी नगर परिषदेची घनकचरा निविदा वादात

## न.प.च्या नगरसेवकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निष्पक्ष चौकशीची मागणी



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगर परिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाची निविदा सध्या चांगलीच वादात सापडली आहे. पूर्वीची निविदा रद्द करून नव्याने निविदा काढण्यात आली असली, तरी शर्ती व अटींमध्ये कोणताही बदल करण्यात आला नसल्याचा गंभीर आरोप नगरसेवकांनी केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करणारे निवेदन नगरसेविका सिमा गजानन विजेकर यांच्यासह ८ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद अंजनगाव सुर्जी यांना लेखी पत्र व निवेदने देऊन सदर निविदेतील शर्ती व अटी पारदर्शक, निष्पक्ष व सर्व पात्र निविदाधारकांना समान संधी मिळतील अशा पद्धतीने ठेवाव्यात, अशी मागणी करण्यात आली होती.मात्र वारंवार निवेदने देऊनही निविदा रद्द करून केवळ नव्याने काढण्यात आली, परंतु अटी-शर्तींमध्ये आवश्यक बदल करण्यात आला नाही. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया विशिष्ट निविदाधारकास लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने राबविली जात असल्याचा संशय निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनकर्त्यांनी याबाबत दोन निविदाधारकांची नावे नमूद करून संशय व्यक्त केला आहे.सदर कामास दि. २३/०८/२०२५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना निविदा आतापर्यंत का काढण्यात आली नव्हती, याची चौकशी करून कारवाई ☞(पान २ वर)

# आदिवासींच्या मागण्यासाठी विद्रोही संघटना आक्रमक

## -२८ पासून मंत्रालयात उपोषणाचा इशारा




**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा येथील वनग्राम आणि जमिनीच्या मालकी हक्काबाबत जिल्हाधिकारी कार्यालयावर केलेल्या उपोषणादरम्यान केवळ आश्वासन मिळाल्याने आता विद्रोही संघटनेने थेट मुंबई मंत्रालयात उपोषण करण्याचा इशारा आज शुक्रवार १८ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत दिला आहे. संघटनेचे अध्यक्ष रामकिशन गन्नू कास्देकर आणि सचिन गोपाल गोरले यांनी सांगितले की, २८ सप्टेंबर पासून मुंबई मंत्रालयात उपोषण सुरू करण्यात येणार आहे. चिखलदरा हे ग्राम वनग्राम आहे. १९६० साली सी.पी. अँड बेरार, निजाम स्टेट, हैद्राबाद स्टेट, मुंबई स्टेट मिळून महाराष्ट्र राज्य तयार झाले. तेव्हापासून या सर्व जमिनी वनजमिनी म्हणून घोषित आहेत.वनजमिनीची खरेदी, विक्री किंवा इनामी ☞(पान २ वर)